




# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, मंगळवार २४ मार्च २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०







# भोंदू अशोक खरात प्रकरणावरून विधानसभेत गदारोळ

## विरोधक आक्रमक, भास्कर जाधवांनी काढली मंत्र्यांची लाज

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रात सध्या स्वयंघोषित ज्योतिषी आणि भोंदूबाबा अशोक खरात याच्या लैंगिक शोषणाच्या व अघोरी कृत्यांच्या प्रकरणाने राजकीय वातावरण कमालीचे तापले आहे. या प्रकरणाचे पडसाद आता थेट राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात उमटले असून, विरोधकांनी या मुद्द्यावरून सरकारला धारेवर धरले आहे. भोंदू खरातसोबतचे लागेबांधे समोर आल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रुपाली चाकणकर यांना त्यांच्या राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला असून, यामुळे सत्ताधारी पक्षाची मोठी अडचण झाली आहे.सोमवारी (२३ मार्च) विधिमंडळाच्या कामकाजाला सुरुवात होताच, काँग्रेसचे गटनेते विजय वडेट्टीवार, नाना पटोले आणि शिवसेना (ठाकरे गट) आमदार भास्कर जाधव यांनी अशोक खरात प्रकरणावर जोरदार चर्चा घडवून आणली.



रुपाली चाकणकर या खरातला आपला गुरू मानत होत्या आणि त्यांची पाद्यपूजा करतानाचे तसेच खरातवर छत्री धरतानाचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. यावरून विरोधकांनी सरकारवर टीकेची झोड उठवली. केवळ एका राजीनाम्याने हे प्रकरण शांत होणार नाही, तर खरातला संरक्षण देणा-या मंत्र्यांची आणि अधिका-यांचीही चौकशी व्हावी, अशी मागणी विजय वडेट्टीवार यांनी केली.या चर्चेदरम्यान आमदार भास्कर जाधव यांनी अत्यंत आक्रमक पवित्रा घेत सत्ताधा-यांवर बोचरी टीका केली. महाराष्ट्राला संतांची आणि सुधारकांची थोर परंपरा असताना, सत्तेत बसलेली माणसे अशा भोंदू बाबांच्या पाया पडतात, हे लाजिरवाणे असल्याचे त्यांनी म्हटले.



भास्कर जाधव यांनी थेट मंत्र्यांच्या नैतिकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, या भोंदूगिरीला खतपाणी घालणा-यांना सत्तेवर राहण्याचा अधिकार नाही, अशा शब्दांत सरकारची लाज काढली.

अशोक खरात याच्यावर नाशिकमध्ये बलात्काराचे आणि गर्भपाताचे गंभीर गुन्हे दाखल झाले असून, एसआयटी कडून त्याची कसून चौकशी सुरू आहे. खरातने ओष्णोजल आणि भविष्य सांगण्याच्या नावाखाली अनेक महिलांचे शोषण केल्याचे समोर आले आहे. या संपूर्ण रॅकेटमध्ये अनेक मोठे नेते आणि अधिकारी सामील असल्याचा आरोप विरोधकांनी केला असून, दोषींवर कठोर कारवाई होईपर्यंत विधिमंडळ चालू न देण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

# अशोक खरात प्रकरणी कोणालाही सोडणार नाही-देवेंद्र फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात सध्या स्वयंघोषित ज्योतिषी, भोंदूबाबा अशोक खरात याच्या काळ्या कारनाम्यांनी धुमाकूळ घातला आहे. अशोक खरातमुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला प्रदेशाध्यक्ष रुपाली चाकणकर यांना त्यांच्या राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा सुद्धा राजीनामा द्यावा लागला आहे. चाकणकर



या अशोक खरातला गुरू मानत होत्या, त्यांचे अनेक फोटो सुद्धा या भोंदूसोबत असल्याने त्यांना त्यांच्या पदावरून पायउतार व्हावे लागले आहे. या भोंदूसोबत अनेक नेतेमंडळींचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत असल्याने खळबळ उडाली आहे. हाच मुद्दा सोमवारी (ता. २३ मार्च) विधानसभेत विरोधकांनी लावून धरला. सोमवारी (ता. २३ मार्च) विधिमंडळ अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या शेवटच्या आठवड्याच्या कामकाजाला सुरुवात झालेली असताना विधानसभेत हा मुद्दा उपस्थित करण्यात आला. यावेळी काँग्रेसचे गटनेते विजय वडेट्टीवार, आमदार नाना पटोले आणि शिवसेना ठाकरे गटाचे आमदार भास्कर जाधव यांनी हा मुद्दा उपस्थित केला. यावेळी भास्कर जाधवांनी थेट मंत्र्यांचीच लाज काढली आहे. यावेळी काँग्रेस गटनेते विजय वडेट्टीवार यांनी स्थगन प्रस्तावाच्या माध्यमातून मुद्दा उपस्थित करत म्हटले की, स्वतःला देवाचा अवतार सांगून आणि ज्योतिषशास्त्राच्या नावाखाली लोकांची दिशाभूल करणा-या अशोक खरातचे १०० हून अधिक आक्षेपार्ह व्हिडिओ समोर आले आहेत. अशा भोंदू बाबांमुळे महाराष्ट्राच्या प्रतिमेला तडा जात आहे. या बाबाने महिलांचे लैंगिक शोषण केले आहे. या खरात वर कारवाई होउ नये म्हणून एका ह?टेलमध्ये तीन उच्चपदस्थ



अधिकारी बैठक घेत होते, ही माहिती अत्यंत धक्कादायक आहे, असे वडेट्टीवारांनी म्हटले. विरोधकांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यावर राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर दिले. या प्रकरणी मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट भाष्य करत म्हटले की, या संदर्भात मी सभागृहाला अवगत करू इच्छितो की, या संदर्भातली कारवाई ही आपल्या पोलिसांनी प्रो-अक्टिव्हली केलेली आहे. याचा ट्रॅप तयार करून ती केलेली आहे. यामध्ये महिला इन्व्हाल्व्हड असल्यामुळे त्या त्यांची फसवणूकच झाली होती पण त्या समोर यायला (पान २ वर)

## शिंदे गटाचे सर्व मंत्री राजीनामा देणार?

# महायुतीतून बाहेर पाडण्याचे दिले संकेत



**मुंबई / प्रतिनिधी-** सातारा जिल्हा परिषद निवडणुकीनंतर महायुतीतील अंतर्गत वाद आता टोकाला पोहोचला असून संतप्त झालेल्या शिंदेसेनेच्या मंत्र्यांनी थेट राजीनाम्याची धमकी दिल्याची माहिती समोर येत आहे. साता-याचे पालकमंत्री शंभूराज देसाई आणि इतर शिवसेना मंत्र्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेउन आपली तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. सातारा जिल्हा परिषद निवडणुकीवरून योग्य कारवाई झाली नाही तर आम्ही राजीनामा देउ, अशी भूमिका शिवसेना आमदारांनी एकनाथ शिंदे यांच्यासमोर मांडली. सातत्याने आमची गळचेपी होत आहे यावर बोलले पाहिजे, अशी मागणी देखील शिवसेना आमदारांनी केल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. शिवसेना मंत्र्यांची नाराजी पाहून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अत्यंत महत्त्वाची भूमिका घेतल्याची माहिती मिळत आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असताना साता-यातील या प्रकरणावरून आक्रमक भूमिका घेण्याचे आदेश शिंदेंनी आपल्या मंत्री आणि आमदारांना दिल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

# अजितदादांच्या विमान अपघाताच्या तपासात हलगर्जी होतेय-चेतन तुपे

**मुंबई / प्रतिनिधी-** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताच्या चौकशीला विलंब होत असून अजूनही व्हीएसआर कंपनीच्या मालकावर कारवाई झालेली नाही. व्हीएसआर कंपनीविषयी तक्रारी असूनही कंपनीवर सरकार मेहरबान का आहे? या कंपनीला अद्याप काळ्या यादीत का टाकले नाही? असे सवाल करत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या चेतन तुपे यांनी सोमवारी विधानसभेत अजितदादांच्या विमान अपघाताच्या तपासात हलगर्जी होत असल्याचा आरोप केला. दादांच्या विमान अपघाताचे सत्य समोर येत नाही तोपर्यंत आम्ही शांत बसणार नाही असा इशाराही त्यांनी दिला. २८ जानेवारी २०२६ रोजी मुंबईहून बारामतीला निघालेल्या अजित पवार यांच्या विमानाला अपघात झाला. या अपघातात अजित पवार यांच्यासह पाच जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. अजित पवारांच्या मृत्यू प्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या जयंत पाटील यांनी (पान २ वर)





# अमोल मिटकरींची लक्षवेधक कृती

**मुंबई-** महाराष्ट्र विधान परिषदेतील ९ आमदारांचा कार्यकाळ आज संपणार आहे. यात राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांचाही समावेश आहे. तत्पूर्वी, त्यांनी आज विधानभवनाच्या पाय-यांवर केलेल्या एका भावनिक कृतीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. आमदारकीच्या शेवटच्या दिवशी ते आज अजित पवारांचा फोटो घेउन एकटेच बसले.

# रिमोटवर चालणारा साप दाखवून भोंदू खरात घाबरवायचा

## विवाहितेवर बलात्कारानंतर गर्भपात

**नाशिक/मुंबई/प्रतिनिधी :** भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात रोज नवनवीन खुलासे समोर येत आहेत. त्यात आता पीडितांच्या



तक्रारीत आणखी धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत. आरोपी खरात हा नकली साप व वाघाचे कातडे वापरून लोकांमध्ये भीती निर्माण करत असे. रिमोटवर चालणारा हा साप हालताना दिसल्यावर उपायांसाठी येणा-यांना अदभूत वाटत असे, अशाप्रकारे तो फसवणूक करीत असे. ईशान्येश्वर मंदिराच्या नावाखाली अघोरी कृत्ये करून लोकांकडून पैसे उकळले जात असल्याचा आरोप आहे. इतकेच नव्हे, तर महिलांना गुंगीकारक पदार्थ देउन त्यांना वश करून लैंगिक शोषण केले जात असल्याचेही तक्रारीत स्पष्ट करण्यात आले आहे.

**विवाहानंतरसुद्धा बलात्कार, गर्भपात-** यासंदर्भात अन्य एका पीडितेने दिलेल्या फिर्यादीनुसार विकृत अशोक खरात याने तिचा विवाह झाल्यानंतरही वारंवार बळजबरी केली तसेच त्यानंतर गोळ्या देउन गर्भपातही केल्याचा आरोप या (पान २ वर)

# घरगुती सिलिंडरमध्ये 14.2 किलोऐवजी फक्त 10 किलो गॅस भरणार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** अमेरिका-इस्त्रायल आणि इराण यांच्यातील संघर्षाचा थेट परिणाम कच्च्या तेलाच्या आणि एलपीजीच्या पुरवठ्यावर झाला असून संपूर्ण जगाला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. सध्या भारतातही एलपीजीचा तुटवडा निर्माण झाले असून मोठ्या प्रमाणात देशभरातील हाटेल व्यावसायिकांना आपला व्यवसाय बंद करण्याची वेळ आली. याच पार्श्वभूमीवर घरगुती गॅस सिलिंडरचे वजन १४.२ किलोवरून १० किलो केले जाणार असल्याची माहिती सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. दरम्यान, केंद्र सरकारने यावर आता अधिकृत स्पष्टीकरण दिले आहे. पेट्रोलियम मंत्रालयाच्या सहसचिव सुजाता शर्मा यांनी स्पष्ट केले की, 'घरगुती एलपीजी सिलिंडरचे वजन कमी



करण्याचा कोणताही प्रस्ताव सरकारसमोर नाही. नागरिकांनी अशा चुकीच्या बातम्यांवर विश्वास ठेवू नये. देशातील पेट्रोल पंपांवर इंधनाचा पुरेसा साठा असून पुरवठा सामान्यपणे सुरू आहे.' मध्य पूर्वेतील युद्धामुळे गॅस पुरवठा साखळी विस्कळीत झाली आहे. भारत आपल्या गरजेच्या सुमारे ६० टक्के एलपीजी आयात करतो. त्यामुळे भविष्यातील टंचाई टाळण्यासाठी सरकारने व्यावसायिक गॅस पुरवठ्यावर काही प्रमाणात नियंत्रण आणले असून, घरगुती ग्राहकांना गॅसचा तुटवडा भासू नये, यासाठी विशेष खबरदारी घेतली जात आहे. मात्र, सरकारने घरगुती सिलिंडरच्या वजनात घट करण्याचा कोणताही निर्णय घेतला नाही. त्यामुळे नागरिकांनी अफवांना बळी पडू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. देशातील इंधन स्थितीवर बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसदेत आश्वस्त (पान २ वर)

# आधी गळा दाबला अन् मग 50 किमी दूर जाउन डॉक्टर पत्नीसह कारला लावली आग

**सागर/वृत्तसंस्था :** मध्य प्रदेशातील सागर जिल्ह्यात कारमध्ये जळून महिलेचा मृत्यू झाल्याचं समोर आले होते. मात्र या प्रकरणात भयंकर हत्याकांड उघड झाले आहे. जी घटना एखादा अपघात असल्याचं सांगितले जात होते, तो एक सुनियोजित हत्येचा कट असल्याचं तपासात उघड झाले. आरोपी डॉक्टर पतीने आधीच घरी पत्नीचा गळा दाबून खून केला होता. त्यानंतर पुरावे मिटवण्यासाठी त्याने ५० किलोमीटर दूर जाउन कारवर पेट्रोल टाकून पत्नीसह तिला आग लावली. माहितीनुसार, या घटनेतील मृत महिलेचं नाव सीमा कुर्मी असं आहे तर आरोपी पती डॉक्टर निलेश कुर्मी असं आहे. पोलिसांनी निलेशला २ साथीदार रामकृष्ण आणि शुभम यांच्यासह अटक केली आहे. तपासात मुख्य आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली. २० मार्चच्या रात्री २ वाजता निलेश घरी परतला होता. रात्री उशिरा घरी आल्याने पत्नी सीमाने त्याला



प्रश्न विचारले. ज्यातून या दोघांमध्ये वाद झाला. रागाच्या भरात निलेशने सीमाचा गळा दाबला. त्यानंतर सीमा बेशुद्ध झाली, त्यामुळे आरोपी घाबरला आणि हे कृत्य लपवण्यासाठी त्याने षडयंत्र रचले. त्याने (पान २ वर)

# तर्काला तिलांजली देउन अजब तीर्थ पिण्यासाठी खरातच्या नादी लागणे हे भीषण

**मुंबई/प्रतिनिधी :** ज्या महाराष्ट्रात राज्यकर्ते संताचा आशीर्वाद घ्यायचे, जिथे लोकमान्य टिळकांसारखे नेते भगवद्गीतेचा अर्थ लावणारा गीतारहस्य सारखा ग्रंथ लिहायचे, ज्या महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाणांसारखे नेते आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्यात संवाद असायचा, त्या महाराष्ट्रातले नेते तर्काला तिलांजली देउन कुठले तरी अजब तीर्थ प्राशन करण्यासाठी अशोक खरातसारख्याच्या भजनी लागतात हे भीषण आहे.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी भोंदू अशोक खरात व त्याच्या नादी लागलेल्या राजकारण्यांवर तीव्र संताप व्यक्त केला आहे. महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाणांसारखे नेते व तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्यात संवाद असायचा,. पण आज त्याच महाराष्ट्रातील नेते तर्कालराज ठाकरे आपल्या पोस्टमध्ये म्हणतात, अशोक खरात प्रकरणातले हिडीस तपशील वाचून, शब्दशः गरगरल्यासारखे झाले.

अवघ्या काही दिवसांपूर्वी १९ मार्च २०२६ ला आमच्या पक्षाच्या गुढी पाडवा मेळाव्यातून, महाराष्ट्राला किती सशक्त परंपरा लाभली आहे आणि या महाराष्ट्राने किती अद्वितीय माणसं या देशाला दिली आहेत याचं सादरीकरण केलं होतं. त्यात संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम ते संत गाडगेबाबांपर्यंतचा ते अगदी आमचे आजोबा प्रबोधनकार ठाकरे या सगळ्यांनी मराठी मनाची कशी मशागत केली हे दाखवले होते. आणि त्याच महाराष्ट्रात जेंव्हा अशोक खरातसारखा नीच माणूस, राजकारण्यांच्या आशीर्वादाने धुमाकूळ



घालतो तेंव्हा खरंच, कुठे नेउन ठेवला आहे महाराष्ट्र हा प्रश्न पडतो.

महाराष्ट्रात अंधश्रद्धा निर्मूलनाचा आणि एकूणच विवेकाचा आवाज उठवला जायचा आणि त्यामुळेच डिसेंबर २०१३ ला महाराष्ट्र विधानसभेत अंधश्रद्धा निर्मूलन विधेयक पारित झाले होते. त्यावेळेस ज्या आमदारांनी हे विधेयक पारित केले असेल त्यातले अनेक जण आजदेखील आमदार असतील आणि त्यातले अनेकजण या प्रकरणात अडकले असतील. हा किती दुर्दैवी विरोधाभास आहे आणि महाराष्ट्राचं किती अधःपतन झाले आहे याचे हे द्योतक आहे.

राज ठाकरे म्हणाले, हा खरात स्त्रियांचे शोषण करतोय, ते झाले तरी चालेल, पण त्याच्या बदल्यात कुठल्यातरी शक्तीने तो आपले भले करेल असा अजब विश्वास आणि यासाठी लागणारा कोडगेपणा हे दोन्ही या राज्यात कुठून आला आहे हेच कळत नाही.

आधी आमदार खासदारकीची तिकिटे मिळवण्याची धडपड. मग जिंकून येण्यासाठी वाट्टेल ते, मग मंत्रिपद. ते नाही मिळालं तर सध्याच्या सत्ताधा-यांच्या डोळ्यात भरण्यासाठी आणि शक्यतो निष्ठा विकण्यासाठीची धडपड. मग त्यातून मंत्रिपद मिळाले की झाले, मग पुन्हा ते टिकाव म्हणून धडपड. आणि सत्ताधारी रोज नवीन कोणाला तरी आत घेतच असतात तो जर आला तर माझे काय याची घोर चिंता. यातच महाराष्ट्राचे संपूर्ण राजकीय भावविश्व अडकले आहे.

आणि या असल्या पोकळ चिंतांमध्ये हे इतके गुंतले आहेत की खरात काय किंवा अजून कोणी आलं आणि त्याने चमत्काराची खात्री दिली की त्याच्या भजनी लागायला हे मोकळे. त्यात हल्ली महाराष्ट्रात काही अधिकारी हे मंर्त्यांचे सगळ्या प्रकारचे (पान २ वर)

## अशोक खरात प्रकरण

# फोटो, व्हिडिओ व्हायरल करणा-यांविरोधात होणार कारवाई!

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यभर गाजत असलेल्या अशोक खरात प्रकरणात आता सायबर गुन्हेगारीवर नियंत्रण आणण्यासाठी पोलिस प्रशासनाने कठोर पावले उचलली आहेत. या प्रकरणातील पीडित महिलांचे फोटो,



व्हिडिओ तसेच आक्षेपार्ह मजकूर सोशल मीडियावर व्हायरल करणा-यांविरोधात नाशिक सायबर पोलिसांनी थेट गुन्हे दाखल करण्याचा इशारा दिला आहे.

या प्रकरणामुळे संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडाली असून पोलिसांनी मुख्य आरोपी अशोक खरातला अटक केली आहे. त्याचबरोबर त्याच्या ट्रस्टशी संबंधित असलेल्या रुपाली चाकणकर यांनाही राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला आहे. तपासादरम्यान अनेक धक्कादायक बाबी समोर आल्या असून काही विकृत मानसिकतेचे लोक कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि मार्फिंग तंत्रज्ञानाचा वापर करून महिलांचे बनावट आणि अश्लील फोटो तयार करत असल्याचे उघड झाले आहे.विशेष म्हणजे, या प्रकरणाशी कोणताही संबंध नसलेल्या निरपराध महिलांचे फोटोही चुकीच्या पद्धतीने वापरले जात आहेत. यामुळे त्यांच्या सामाजिक प्रतिष्ठेला मोठा धक्का बसत असून पोलिसांनी या प्रकाराला अत्यंत गंभीरतेने घेतले आहे. सायबर विभागाने सोशल मीडियावरील संशयास्पद पोस्ट्सवर बारकाईने लक्ष ठेवण्यास सुरुवात केली आहे. कायद्यानुसार कोणत्याही लैंगिक अत्याचारातील पीडितेची ओळख उघड करणे हा गंभीर गुन्हा आहे. तरीही व्हाट्सएप, फेसबुक आणि इंस्टाग्रामसारख्या माध्यमांवर अफवा आणि दिशाभूल करणारी माहिती मोठ्या प्रमाणावर पसरत आहे. पीडितांच्या सन्मानाचे रक्षण करणे ही आमची प्राथमिकता आहे. चुकीची माहिती पसरवणा-यांना कोणतीही सवलत दिली जाणार नाही, असा स्पष्ट इशारा पोलिसांनी दिला आहे.




# महापालिकेत अग्निसुरक्षा बळकटीसाठी बैठक





**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या अध्यक्षतेखाली आज सोमवार, दि. २३ मार्च २०२६ रोजी महानगरपालिका कॉन्फरन्स हॉल येथे अग्निशमन विभागाची सविस्तर आढावा बैठक पार पडली. शहरातील वाढती लोकसंख्या, नागरी विस्तार आणि त्यानुषंगाने उद्भवणाऱ्या अग्निसुरक्षा आव्हानांच्या पार्श्वभूमीवर ही बैठक अत्यंत महत्त्वपूर्ण ठरली.

बैठकीच्या प्रारंभी अग्निशमन विभागाच्या विद्यमान कार्यप्रणालीचा सखोल आढावा सादर करण्यात आला. शहरातील विविध भागांमध्ये मागील कालावधीत घडलेल्या आगीच्या घटनांचे विश्लेषण, त्यावर करण्यात आलेली कार्यवाही, प्रतिसादाचा कालावधी तसेच बचावकार्याची परिणामकारकता याबाबत माहिती देण्यात आली. तसेच, आपत्कालीन परिस्थितीत अग्निशमन दलाने दाखविलेल्या तत्परतेबद्दल समाधान व्यक्त करण्यात आले.

यावेळी शहरातील अग्निसुरक्षा उपाययोजना अधिक सक्षम करण्यावर विशेष भर देण्यात आला. उंच इमारती, व्यापारी संकुले, शासकीय व निमशासकीय कार्यालये तसेच गर्दीची ठिकाणे येथे अग्निसुरक्षा नियमांचे काटेकोर पालन होत आहे का, याची तपासणी अधिक नियमितपणे करण्याच्या सूचना देण्यात आल्या. अग्निशमन उपकरणांची उपलब्धता, त्यांची नियमित तपासणी व देखभाल, तसेच नव्या अत्याधुनिक यंत्रसामग्रीच्या खरेदीबाबतही चर्चा झाली.आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी अग्निशमन विभागाच्या मनुष्यबळाबाबत विशेष लक्ष देण्याचे निर्देश दिले. रिक्त पदे लवकरात लवकर भरून काढणे, कर्मचाऱ्यांना नियमित प्रशिक्षण देणे, तसेच अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून कार्यक्षमता वाढविणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. आपत्कालीन परिस्थितीत समन्वय अधिक प्रभावी राहावा यासाठी इतर विभागांशी सुसूत्रता राखण्याचेही निर्देश देण्यात आले.तसेच नागरिकांमध्ये अग्निसुरक्षेबाबत जनजागृती करण्यासाठी विशेष मोहिमा राबविण्याची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली. शाळा, महाविद्यालये, औद्योगिक आस्थापना आणि निवासी संकुलांमध्ये प्रात्यक्षिके घेऊन आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देण्याबाबतही सूचना देण्यात आल्या. नागरिकांनीही अग्निसुरक्षा नियमांचे पालन करून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले.बैठकीत आपत्कालीन कॉलला प्रतिसाद देण्याचा वेळ कमी करण्यासाठी नियंत्रण कक्ष अधिक सक्षम करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. तसेच शहरातील प्रमुख ठिकाणी अग्निशमन केंद्रांची संख्या वाढविण्याबाबतही सकारात्मक चर्चा झाली. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून अग्निशमन सेवेला अधिक गतिमान आणि प्रभावी बनविण्यावर भर देण्यात आला.

शेवटी आयुक्तांनी अग्निशमन विभागाने सदैव सतर्क, सज्ज आणि जबाबदार राहून नागरिकांच्या जीवित व मालमत्तेच्या संरक्षणासाठी सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे स्पष्ट निर्देश दिले. या बैठकीमुळे शहरातील अग्निसुरक्षा यंत्रणा अधिक बळकट होण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.बैठकीस अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त नरेंद्र वानखडे, अग्निशमन विभागाचे अधिक्षक अजय पंधरे, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, कर्मचारी तसेच संबंधित विभागांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## उच्च प्राथमिक शाळा क्र. २, मसानगंज येथे आयुक्तांची पाहणी

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महानगरपालिकेच्या आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी आज महानगरपालिका उच्च प्राथमिक हिंदी शाळा क्र.२, मसानगंज येथे शाळेची जुनी इमारत आणि परिसरातील स्वच्छतेची पाहणी केली.पाहणीदरम्यान निदर्शनास आले की शाळेची इमारत अनेक ठिकाणी धोकादायक स्थितीत असून काही ठिकाणी मोडकळीस आलेली आहे. ही परिस्थिती विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी गंभीर धोकादायक आहे. तसेच या कारणास्तव शाळेत विद्यार्थ्यांची संख्या अपेक्षेनुसार वाढत नसल्याचे आढळले.आयुक्तांनी या परिस्थितीवर त्वरित लक्ष देण्यासाठी शाळेचे बिल्डिंग ऑडिट करून तात्काळ अहवाल सादर करण्याचे आदेश महानगरपालिकेचे अभियंता लक्ष्मण पावडे यांना दिले. या अहवालानंतर शाळेच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक योग्य तो उपाय लवकरात लवकर राबवण्याचे निर्देश देखील देण्यात आले.

याचबरोबर, आयुक्तांनी शाळेच्या आवारातील आणि परिसरातील स्वच्छतेची देखील सविस्तर पाहणी केली. पाहणीदरम्यान आढळले की शाळेच्या आवारात कचरा टाकला जात असल्याचे निदर्शनास आले. यावर त्वरित कारवाईसाठी आयुक्तांनी मसानगंज स्वच्छता निरीक्षक शेख यांना शाळेच्या आवारात कचरा टाकू नये असे कडक आदेश दिले. तसेच शाळेच्या आवारात कचरा टाकल्या जाणाऱ्या ठिकाणी वॉल-कंपाऊंड तयार करून कचरा व्यवस्थापनासाठी योग्य उपाययोजना करण्याचे आदेश दिले आहेत.

आयुक्तांच्या भेटीवेळी मसानगंज नवनिर्वाचित नगरसेवक दिपक साहू व शिक्षणाधिकारी डॉ. प्रकाश मेश्राम उपस्थित होते. आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी शाळेच्या सुरक्षिततेसाठी, विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी व परिसरातील स्वच्छतेसाठी तातडीने आणि योग्य ती कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. आयुक्तांनी परिसरातील लोकांनाही शाळेच्या परिसरात स्वच्छता राखण्यास प्रवृत्त करण्याचे आवाहन केले असून, शाळा व परिसर सुरक्षित, स्वच्छ व विद्यार्थ्यांसाठी अनुकूल वातावरण प्रदान करण्यासाठी महानगरपालिकेचे पूर्ण लक्ष राहील असे सांगितले.

पान १ व १० वरून

## अशोक खरात प्रकरणी कोणालाही

तयार नव्हत्या. त्यावेळेस त्यांचं योग्य पद्धतीनं त्यांना धीर देउन आणि अशा पद्धतीनं आता काही महिलांनी तक्रार केलेली आहे. उर्वरित अजून काही महिला या संदर्भात तक्रार करतील. मी केवळ आपल्याला एवढंच सांगतो की, या संदर्भात कारवाई जरी आता झाली, तरी देखील याची तयारी आधीपासून सुरू होती. त्यांच्या अटकेच्या अगोदरच म्हणजे साधारणपणे १० तारखेला, १०/३ ला दुस-या जिल्ह्यातून आपण एका कंप्लेंटचा उपयोग करून त्यांचा एलओसी देखील काढून ठेवला होता की त्यांना बाहेर पळता येउ नये, अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली. तसेच, या संदर्भात पूर्णपणे कारवाई आपण करतो आहोत. मी या सभागृहामध्ये उद्या याचे सविस्तर निवेदन करेन. कारण आजही या संपूर्ण प्रकरणाची चौकशी सुरू आहे. त्यामुळे दोन्ही बाजूला माझी विनंती आहे की, हा आपल्या कोणाकरता राजकारणाचा प्रश्न नाहीये, हा महिलांच्या डिग्निटीचा प्रश्न आहे. अशा प्रकारे महिलांचा दुरु पयोग करणे आणि त्यांना काहीतरी वेगळ्या पद्धतीचे भासवून, वेगळ्या शक्ती आहेत असे सांगून आणि जणू काही त्या जे काही समर्पण करतायत, ते करणे हेच त्यांचे इतिकर्तव्य आहे अशा पद्धतीचा त्यांचा ब्रेन व?शिंग करणे, अशा अनेक गोष्टी याच्यामध्ये करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे निश्चितपणे याचे गांभीर्य लक्षात घेउन उद्या या संदर्भात मी जे काही तुम्ही ठरवाल पण याचे सविस्तर, अगदी सखोल निवेदन मी करेन. मी नेहमी क्लीन चिट देत नाही, जो क्लीन असतो त्यालाच क्लीन चिट मिळते. अशी कुठलीच चिट माझ्याकडे नाहीये आणि याच्यात तर ज्याचा दुरान्वयानेही संबंध असेल, त्यालाही सोडले जाणार नाही, असे आ□ासन देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे.

## अजितदादांच्या विमान अपघाताच्या

विधानसभेत नियम २९३ अन्वये चर्चा उपस्थित केली आहे. या चर्चेत सहभागी होताना तुपे यांनी विमान अपघाताच्या चौकशीला होत असलेल्या विलंबाबद्दल संताप व्यक्त केला. यावेळी त्यांना अजितदादांच्या आठवणीने गहिवरून आले.

चेतन तुपे यांनी यावेळी संपूर्ण घटनाक्रमाचा तपशील देत विविध शंका उपस्थित केल्या. मुंबईत सकाळी साडेसात वाजेपर्यंत रस्त्यावर कुठेही वाहतूक कोंडी नसते. मग अशावेळी नियोजित वैमानिक वाहतूक कोंडीत अडकला म्हणून ऐनवेळी विमानाचा पायलट आणि क्रू का बदलण्यात आला? ऐनवेळी पायलट बदलणे हे संशयास्पद आहे. अजित पवार यांच्यासारखे महत्वाचे व्यक्ती प्रवास करणार म्हणून उड्डाणापूर्वी विमान उड्डाणासाठी पात्र ठरवले जाते. मग दादांचे विमान पात्र ठरवणारा एअरक्राफ्ट मेंटेनन्स इंजिनिअर कोण? त्याचे नाव काय? की एका विमानाऐवजी दुसरे विमान दिले, हे महाराष्ट्राला समजले पाहिजे.

त्या दिवशी बारामती विमानतळाची दृश्यमानता कमी होती तर वैमानिकाने विमान उतरवण्याचा हट्ट का धरला? त्यासाठी वैमानिकावर कुणाचा दबाव होता का? विमानात पुरेसे इंधन होते तर मग विमान पुण्याच्या विमानतळावर का नेण्यात आले नाही? बारामती एटीसीने विमानाला लँडिंगची परवानगी का दिली? रडारच्या सिग्नलवरून विमान अचानक गायब कसे झाले? अशा प्रश्नांच्या फैरी झाडताना तुपे यांनी व्हीआरएस कंपनीचे मालक आणि नियोजित वैमानिक यांची नार्को टेस्ट करण्याची मागणी केली.

विमान अपघाताच्या ठिकाणी अजितदादा वापरत असलेले मोबाईल आणि त्यांचे घड्याळ सुस्थितीत आढळून आले. मोबाईल आणि घड्याळ सापडते तर विमानातील ब्लॅकब?क्स जळला यावर महाराष्ट्राने वि□ास का ठेवावा? असा सवाल करत चेतन तुपे यांनी विमान अपघाताचे तांत्रिक विश्लेषण होउन फ?रेन्सिक ऑडिट करण्याची मागणी केली. आमच्या नेत्याच्या विमानाला झालेल्या अपघाताची उत्तरे महाराष्ट्राला मिळाली पाहिजेत. ही उत्तरे मिळत नाहीत तोपर्यंत महाराष्ट्राच्या मनाला शांती लाभणार नाही. आमची लढाई न्याय आणि सत्याची आहे. त्यामुळे आम्हाला जोपर्यंत न्याय मिळत नाही तोपर्यंत आम्ही लढत राहू, असा इशाराही तुपे यांनी दिला.

## रिमोटवर चालणारा साप

फिर्यादीत करण्यात आला आहे. रविवारी ३३ वर्षीय महिलेने पोलिस ठाण्यात हजर राहून आपल्यावरील आपबिती कथन केली. त्यात तिने धक्कादायक आरोप केले आहेत. त्यानुसार सन २०१३ मध्ये विवाह जुळविण्याच्या काळात तिच्या कुटुंबीयांनी ओळखीच्या व्यक्तींच्या सांगण्यावरून खरातचा सल्ला घेतला होता. यावेळी खरात याने स्वतःला ज्योतिषी व 'अवतारी पुरुष' भासवून संबंधित महिलेचा विश्वास संपादन केला. विवाहानंतरही कौटुंबिक अडचणींवर उपाय सांगण्याच्या नावाखाली तो संपर्कात राहिला. लग्न मोडल्यानंतर दुसरे लग्न करण्यासाठीही खरातने पुन्हा महिलेला बोलावून घेत तिच्यावर अत्याचार केला.

खरातच्या दुष्कृत्यांचा आणि विकृतीचा आणखी एक पुरावा पुढे आला आहे. पीडितेच्या तक्रारीनंतर पोलिसांनी नरबळी व जादुटोणा प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला. हा गुन्हा नोव्हेंबर २०२३ ते डिसेंबर २०२५ या कालावधीत घडल्याचे फिर्यादीत म्हटले असून, त्यात खरातच्या विकृतीची परिसीमा गाठली गेली आहे. फिर्यादीनुसार, अशोक एकनाथ खरात (६७) याने कॅनडा कार्नरच्या ओकस प्रापर्टीज कार्यालयात गर्भवती महिलेवर 'पूजा विधी'च्या नावाखाली अमानुष अत्याचार केले. दरम्यान, याप्रकरणात चाकणकर यांना अटक करण्याची मागणी होत आहे.

**एसआयटी तपासाला वेग...** दरम्यान, नवी तक्रार दाखल केल्यानंतर या प्रकरणात पोलिसांना खरातकडून काही माहिती आवश्यक असल्याने त्याचा ताबा घेण्यासाठी एसआयटी पथकाला पत्र दिले. त्यानंतर दुपारी खरातला क्राइम ब्रँचच्या ताब्यात देण्यात आले. रात्री उशिरापर्यंत त्याची चौकशी सुरू होती. या प्रकरणाच्या गांभीर्यामुळे विशेष तपास पथक अधिक सक्रिय झाले असून, तपास केंद्र अन्यत्र हलविण्यात आले आहे. एसआयटी पथकात नवीन अधिका-यांचा समावेश करण्यात आला असून, विशेषतः महिला अधिका-यांचा समावेश करून पीडित महिलांशी विश्वासाने संवाद साधण्याचा प्रयत्न केला जात आहे.

## घरगुती सिलिंडरमध्ये 14.2

केले की, सरकार परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे. 'होर्मुज सामुद्रधुनीमार्गे होणारी जहाजांची वाहतूक आव्हानात्मक झाली असली तरी, भारत आपल्या उर्जा गरजा पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील आहे. आपण आता २७ ऐवजी ४१ देशांकडून इंधन आयात करत आहोत.' महत्त्वाचे म्हणजे, भारताकडे सध्या ५३ लाख मेट्रिक टन धोरणात्मक तेलसाठा असून तो ६५ लाखांपर्यंत नेण्याचे लक्ष्य आहे. तसेच देशांतर्गत एलपीजीचे उत्पादन वाढवण्यावर भर दिला जात आहे. इंधन आयातीसाठी केवळ आखाती देशांवर अवलंबून न राहता इतर देशांकडूनही पुरवठा सुनिश्चित केला जात आहे.

## आधी गळा दाबला अन् मग 50 किमी

रामकृष्ण आणि शुभम या दोघांना बोलावून घेतले आणि सीमाला हृदयविकाराचा झटका आल्याचे सांगत तिला घेउन हास्पिटलला जायचे असल्याची बतावणी केली. त्यानंतर या तिघांनी सीमाला कारमध्ये बसवले.

हा प्रकार सुरू असताना मुलीला जाग आली. तिने आरोपीला विचारले असता त्याने आईला डाक्टरकडे नेतोय, दरवाजा लाव असं सांगितले. त्यानंतर आरोपी सागरच्या दिशेने निघाला. रस्त्यात त्याने सासरे आणि मेहुण्याला फोन करून सीमाची तब्येत बिघडल्याचे सांगितले. परंतु षडयंत्र भलतेच काही होते. पहाटे ४ च्या सुमारास गढाकोटा रोडवरील चनाटोरियाजवळ निर्जनस्थळी कार पोहचली. त्याने कार बाजूला घेत पत्नीच्या शरीरावर आणि कारवर पेट्रोल टाकून दोघांना आग लावली. आग लागल्यानंतर तो साथीदारांसह तिथेच कार जळताना पाहत होता. कुणीही सीमाला वाचवण्याचा प्रयत्न केला नाही. या घटनेबाबत आरोपीने पोलीस आणि नातेवाईकांना वेगवेगळ्या कहाण्या सांगितल्या. कधी हार्ट अटॅक, कधी अपघात तर कधी सीएनजी ब्लास्ट...पोलिसांना सुरुवातीपासून या प्रकरणात संशय येत होता. घटनास्थळी जळालेली माचिस, कारची स्थिती आणि तांत्रिक तपासणीनंतर अनेक तथ्ये समोर आले आणि त्यातून या घटनेचा पर्दाफाश झाला.

तपासात काय झालं उघड?

पोलिसांनी घटनेचा तपास केला असता त्यात निलेशचे एका युवतीसोबत अफेअर सुरू असल्याचं समोर आले. ज्यातून पती पत्नी यांच्यात बराच काळापासून वाद होता. पत्नीने विरोध केल्यानंतर निलेशने तिचा काटा काढण्याचं ठरवले. पोलिसांनी आरोपीच्या घरचे सीसीटीव्ही फुटेज तपासले परंतु त्यात काही सापडले नाही. सीमाचा मृत्यू गळा दाबून झाला की जळाल्याने झाला याबाबत पोस्टमोर्टम रिपोर्टची वाट पाहिली जात आहे. सध्या या प्रकरणी पोलिसांनी मुख्य आरोपी निलेशसह दोघांना अटक केली आहे. या तिघांविरोधात हत्या आणि पुरावे मिटवण्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## तर्काला तिलांजली देउन अजब

सल्लागार आणि नियोजनकार झाले आहेत. त्या अधिका-यांना पण कसेही करून सत्तेला चिकटून रहायचे आहे.

**आजही राज्यात तर्काचा आवाज मोठा-** या सगळ्याचा महाराष्ट्राच्या समाजमनावर काय परिणाम होतोय याचा विचार आतातरी होणार आहे का ? माध्यमं सध्या खरात प्रकरणाचा रोज पाठपुरावा करत आहेत हे चांगले आहे पण म्हणून त्यांनी जनतेला पुन्हा एकदा आपण कोण होतो याचे दर्शन घडवायला हवं असे मला मनापासून वाटते. गुढी पाडव्याच्या मेळाव्यातून मी हा महाराष्ट्र कोणी घडवला आहे याचे दर्शन मुद्दामून करवले होते, ती माझी समज काय आहे हे दाखवण्यासाठी नाही. तर आत्ताच्या तरुण पिढीला हे कळावे म्हणून. माझ्यापरीने हे काम मी करत राहणार आहेच.पण महाराष्ट्रातील जनतेने विचार करावा. हे असले लोकप्रतिनिधी तुम्ही निवडून देणार आहात. महाराष्ट्रातील गावागावांत आजही कीर्तने होतात, ज्ञानेश्वरीचे पठण होतं, आजही या राज्यात तर्काचा आवाज मोठा आहे. पण जर तुम्ही या असल्या नाठाळांना आपले नेते मानणार असाल तर महाराष्ट्राचं काही खरं नाही हे नक्की, असे राज ठाकरे म्हणाले.

**मुख्यमंत्र्यावरही साधला निशाणा-** राज्याचे मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस हे म्हणाले की, हे प्रकरण आम्हीच शोधून काढले आणि याचा तपास सुरु केला आहे. जर तुम्हाला याचे श्रेय द्यायचं असेल तर मग हे प्रकरण घडत होतं आणि तुमच्या घटक पक्षातील अनेक नावांभोवती संशयाची सुई फिरत आहे, तेंव्हा हे सगळे घडत असताना याचा कुठेच सुगावा का लागला नाही म्हणून दोषी धरायचं ? माझ्या तर कानावर असे पण येते की कोणाच्या तरी महत्वकांक्षांचे पंख छाटण्यासाठी या प्रकरणाचा वापर केला जात आहे. याचा अर्थ असा की एकदा का समोरच्याने शरणागती पत्करली आणि काही काळ तरी कुरघोड्या थांबवल्या की हे सगळे प्रकरण बासनात गुंडाळले जाईल.

## विदर्भातील वन्यजीवांचे रक्षण

ठाणेसाठी ५ कोटी निधी देण्यात आला. मात्र विदर्भासाठी कुठलाही निधी देण्यात आला नाही. या संदर्भात जेव्हा आम्ही लोकप्रतिनिधी म्हणून आवाज उचलला, माध्यमांनीही लक्ष वेधले असता विदर्भासाठी २ कोटी निधी देण्यात आले, मात्र अजूनही निधी वितरित झाला नसल्याचे आ. संजय खोडके म्हणाले.

विदर्भामध्ये सर्वात जास्त वने असलेले क्षेत्र म्हणून ताडोबा ,पेंच, मेळघाट सारखे वन्य भाग असून पोहरा जंगल हे अमरावती शहराला लागून आहे. तेथील वन्यजीव तर शहरात भटकंती करत असल्याचे अनेकदा समोर आले आहे. त्यामुळे अशा अधिक वन क्षेत्र असलेल्या भागात प्रभावी उपाययोजना करण्याची नितांत गरज आहे. पोहरा भागातील वनविकासाच्या संदर्भात मागे वन विभागाच्या निधीतील व्याजाचा जो ७ कोटी निधी होता, तो जुन्नर ला खर्च करण्यात आला असल्याचे सुद्धा आ. संजय खोडके सभागृहात म्हणाले. त्यामुळे वन्यजीव संरक्षण दुरुस्ती विधेयक पारित करीत असतांना विदर्भाशी दुजाभाव होता कामा नये. अशी विनंती सुद्धा आ. संजय खोडके यांनी सभागृहासमक्ष करीत महाराष्ट्र विधानसभेच्या वन्यजीव संरक्षण दुरुस्ती विधेयक २०२६ चे समर्थन करीत पाठिंबा जाहीर केला आहे.

## चना खरेदी वरून वाद

नियमानुसार खरेदी होत असल्याचे स्पष्ट केले तर दुसरीकडे प्रहार संघटनेने पुन्हा असा प्रकार घडल्यास आंदोलन छेडण्याचा इशारा दिला. या संपूर्ण प्रकारामुळे काही काळासाठी शेतकऱ्यांमध्ये संभ्रमाने नाराजीचे वातावरण निर्माण झाले होते.

## भारत मुक्ती मोर्चाची जिल्हाधिकारी

मोर्चा काढून रोष प्रगट करण्यात आला. आता २३ एप्रिल रोजी भारत बंद पुकारण्यात आलेला आहे. मोर्चा मध्ये संतोष कौतिककर, सुनील डहाके पाटील ,डॉ. पंचशीला मोहोड, सुधाकर टोकसे, बाबा मोहोड, गजानन गावंडे, समीर ढगे ,गौर किटुकले, राजकुमार वानखडे ,राजेश हिवराळे, दामोदर खापरे, अर्जुन मुंदरे नाजूक पुंडकर ,वर्षा जवंजाळ, वंदना गोंडाणे, नलिनी इंगळे, अमित लांजेवार आदींचा सहभाग होता.

## अडीच वर्षांच्या बालीकेवर

ती ऐकण्यास अक्षम होती. रुग्ण दोन वर्षाची झाल्यानंतर तिच्या कुटुंबियांना समजले की ती ऐकू शकत नाही . सुरुवातीला रुग्ण जिल्हा सामान्य रुग्णालय अमरावती येथे ऑडियोलॉजिस्ट गोपाळ जयवाल यांच्याकडून तपासणी केल्यानंतर रुग्णास सूपर स्पेशालिटी हॉस्पिटलला शस्त्रक्रियेसाठी पाठवण्यात आले. सूपर स्पेशालिटी रुग्णालयात रुग्णाच्या सर्व तपासण्या करण्यात आल्या व रुग्णास ऑडिओलॉजिस्ट लक्ष्मण मोरे यांच्याकडे तपासणीसाठी पाठवण्यात आले व तदनंतर शेवटी दिनांक १६ मार्च २०२६ रोजी शस्त्रक्रिया करण्यात आली. सदर शस्त्रक्रिये मधे पारंपारिक तसेच अत्याधुनिक तंत्रज्ञान जसे स्मार्ट नेव नावाचे वायरलेस उपकरण वापरण्यात आले.

सदर जटिल शस्त्रक्रिया रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ .अमोल नरोटे यांच्या मार्गदर्शनाखाली इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय नागपूर येथील कान-नाक-घसा विभागप्रमुख डॉ. जीवन वेदी व सूपर स्पेशालिटी हॉस्पिटल चे विशेष कार्य अधिकारी तसेच इ.एन.टी सर्जन डॉ. मंगेश मेंढे , ऑडियोलॉजिस्ट लक्ष्मण मोरे, बालरोग तज्ञ डॉ नितीन बर्डिया , बधिरीकरण तज्ज्ञ डॉ. बाळकृष्ण बागवाले, डॉ. संजय महातपुरे, रेडिओलॉजिस्ट डॉ. शशांक दूरशिट्टीवार, यांच्या मार्फत करण्यात आली. सदर शस्त्रक्रिये मधे वैद्यकीय अधिकारी डॉ. उज्वला मोहोड, शितल बोंडे, ऋषिकेश धस, डॉ. पायल रोकडे, डॉ. दिव्यांनी मुंदाने, नेहा लासुरकर,अधिसेविका चंदा खोडके याच्या मार्गदर्शनाखाली न्यूरो इंचार्ज सिस्टर दिपाली देशमुख, अलका मोहड ,वैशाली नागराळे, अपेक्षा वाघमारे, रेखा विश्वकर्मा, मनीषा रामटेके, तेजल बोंडगे, स्नेहल काळे, विजय गवई, यश गवई, अभिषेक निचत, पुष्पा तायडे, शुभांगी टिंगणे, तृप्ती बोरकर, दीक्षा गवई,जोत्स्ना कांबळे,फार्मासिस्ट योगेश वाडेकर, बायोमेडिकल इंजिनिअर अमोल वाडेकर, प्रशांत शिरे , आकाश काळे, वेदांत इंदुरकर, ज्ञानेश लांजेवर, राहुल कवनपुरे यांचे शस्त्रक्रियेत विशेष सहकार्य होते.

## भातकुली येथे दुचाकी चोरांना

त्वरित तपास सुरु केला. गुप्त माहिती आणि तांत्रिक कौशल्यांचा वापर करून त्यांनी अवघ्या तीन तासांत आरोपींना पकडले. तपासात हेही समोर आले की, गौरव ढोणे याच्यावर आधीच ११ वाहन चोरीचे प्रकरणे नोंदविल्या गेले आहेत. पोलीस आता या प्रकरणात इतर गुन्ह्यांचा मागोवा घेण्याची तयारी करत आहेत. ही जलद कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त श्याम घुगे, एसीपी संजय खताळे आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक रविंद्र राजुलवार यांच्या मार्गदर्शनाखाली केली गेली. पोलीस उपनिरीक्षक रविंद्र टाले, हवालदार प्रशांत यादव, भगवान गिरी, प्रदीप ठाकरे, विवेक मोहोड, दलित लोखंडे, त्रिशुल लांडे, तसेच चा. पो. शि. सागर राठोड यांनी तपासात महत्त्वाची भूमिका बजावली.

## प्लॉट व्यवसायात नफ्याचे आमिष

असा विश्वास दिला. २६ नोव्हेंबर २०२० ते १४ सप्टेंबर २०२१ दरम्यान अभिजीत यांनी रोख व चेकद्वारे एकूण ३८ लाख ७० हजार रुपये आरोपींना सुपूर्द केले. काही काळानंतर ना तर अपेक्षित नफा मिळाला, ना मूळ रक्कम परत आली. त्यामुळे अभिजीत गुल्हाने यांना आपली आर्थिक फसवणुक झाल्याचे लक्षात आले. याप्रकरणात राजापेठ पोलीस स्टेशनने विविध कलमांअंतर्गत पिता-पुत्रांविरुद्ध गुन्हा नोंदवला असून, पुढील तपास सुरू आहे.

## वडाळीत बाळासाहेब ठाकरे

महापौर, मनपा आयुक्त आणि विरोधी पक्षनेता यांना लिखित पत्रही देण्यात आले आहे. आठ दिवस उलटूनही काम सुरू झाले नाही. म्हणून आज पुन्हा निवेदन देण्यात आले. यावर लवकर निर्णय घेण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. निवेदन देताना शिवसेना जिल्हाप्रमुख संतोष बद्रे, शहर प्रमुख सुनील राऊत, अजय महल्ले, समीर कोरपे, सुरेश चव्हाण, वेदांत तालंन, रुद्र तिवारी, अण्णा उमक ,राजेश पाठक, अमर करो सिया, सुरज बरडे, चेतन डेंडूले आदि उपस्थित होते.

## लग्नाचे आश्वासन देऊन

विश्वास संपादन केला. यानंतर या विश्वासाचा गैरफायदा घेत आरोपीने पीडितेवर अनेक वेळा अत्याचार केल्याचे समोर आले आहे. प्रकरण अधिक गंभीर तेव्हा झाले, जेव्हा आरोपीने पीडितेला तिच्या पतीपासून घटस्फोट घेण्यासाठी दबाव टाकण्यास सुरुवात केली. मानसिक छळ आणि धमक्यांमुळे पीडितेची परिस्थिती अधिकच बिकट झाली. सततच्या त्रासाला कंटाळून पीडितेने अखेर बडनेरा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत आरोपीविरुद्ध लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार आणि धमकावल्याच्या कलमांखाली गुन्हा नोंदवला आहे.

## पत्नीवर केला ध्राणघातक हल्ला,

नईमुद्दीन पठाण सह सदफ काजी आणि इतरांविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

## अत्याचारी भोंदूबाबा खरातविरोधात

घटनांमुळे कायदा व सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. पीडित महिलांना तात्काळ न्याय मिळावा, तसेच अशा प्रकारच्या गुन्ह्यांवर आळा घालण्यासाठी कठोर उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणी करण्यात आली.

या आंदोलनात भैय्याजी पवार, अनिकेत डेंगळे, वैभव देशमुख, आशिष यादव, प्रियाल मोहोड, कौस्तुभ देशमुख, श्रेयस धर्माळे, वेदांत केने, मोहित भेंडे, धनंजय बोबडे, चैतन्य गायकवाड, आकाश दुराटकर, आकाश गेडाम, शुभम बांबल, मनन अत्री, शंतनु हिवसे, शंतनु देशमुख, कृणाल गावंडे व इतर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रूपाली चाकणकर व भोंदूबाबा

महिला आयोगाच्या अध्यक्ष पदावर असताना त्यांचा अशा गंभीर फसवणुकीत सहभाग असणे हे महिलांसाठी अत्यंत लज्जास्पद व धक्कादायक आहे. या प्रकरणात इतर काही नेत्यांचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सहभाग असल्याचेही वायरल होत असलेल्या व्हिडिओद्वारे स्पष्ट झाले आहे. अशोक खरात याने आतापर्यंत किती महिलांना ब्लॅकमेल करून त्यांचे आर्थिक व शारीरिक शोषण केले आहे याची चौकशी होणे आवश्यक आहे. सदर प्रकरणी दोन महिन्यापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तक्रार दाखल झाली होती. तरीही कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे रूपाली चाकणकर व इतर संबंधित नेत्यांवर तात्काळ गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात यावी. संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष सखोल चौकशी करून दोषीवर कठोर कार्यवाही करण्यात येण्याची मागणी करण्यात आली आहे. जोडे मारो आंदोलन करणाऱ्यांमध्ये शहराध्यक्ष जयश्री वानखडे, नगरसेविका डॉ.अर्चना आत्राम, रश्मी जटाले, आरती पिंपळे, सीमा तिवारी,किरण चांदवडकर, भारती क्षीरसागर, शेख शाहीन ,वंदना निरगुडे आदींचा सहभाग होता.

## मनपात शहीद दिनानिमित्त अभिवादन

तेजवाणी यांच्या हस्ते क्रांतिकारकांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमास सभागृह नेते चेतन गावंडे, विरोधी पक्षनेते विलास इंगोले, नगरसेवक मनिष बजाज, नगरसेविका गौरी मेघवानी, अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, उपायुक्त नरेंद्र वानखडे,उपायुक्त योगेश पिठे, मुख्य लेखापरीक्षक श्यामसुंदर देव, मुख्य लेखाधिकारी दत्तात्रय फिस्के, सहाय्यक आयुक्त भूषण पुसतकर, कार्यालय अधिक्षक गुलशन मिरानी, प्रमोद मोहोड, भुषण खडेकार, शिवा फुटाणे तसेच अन्य अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी सर्जेराव गलपट हे भगतसिंग यांच्या वेशभूषेत उपस्थित होते.

## जिल्ह्यात एलप्रीज्ञी.गॅसचा

नियुक्त केलेल्या खालील अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा. यामध्ये जिल्हा हेल्पलाईन क्रमांक ७२१९१११४२४ असून, अमरावती शहरासाठी प्रविण राऊत (९६७३१६१९७५), मोर्शी तालुक्यासाठी सागर बगाडे (८६००८५६४३१), नांदगाव खंडेश्वर तालुक्यासाठी शीतल राठोड (९४२१८६९९९५), वरुड तालुक्यासाठी निखील नलावडे (९८२२५०८४०३), अंजनगाव सुर्जी तालुक्यासाठी रणजीत रामाघरे (९५११७१५१९२), तिवसा व अमरावती ग्रामीण तालुक्यासाठी शीतल आंबटकर (९०११३४१२८७), भातकुली तालुक्यासाठी मोनाली भोवरे (९५५२८७१५७२), धामणगाव रेल्वे तालुक्यासाठी प्रवीण भागवत (७०३८६०६३८५), अचलपूर तालुक्यासाठी राहुल केदारे (९६६५७४४८४९), चांदुर रेल्वे तालुक्यासाठी विश्वनाथ पखाले (९६७३५६१९६४), धारणी तालुक्यासाठी रमेश वाढवे (९४०३५३२१९०), चिखलदरा तालुक्यासाठी गणेश इंगळे (७५०७९५३५५५), दर्यापूर तालुक्यासाठी वैभव महाजन (९४०४२०७६०२) आणि चांदूर बाजार तालुक्यासाठी जितेंद्र पाटील (९३५६७४२५२८) यांची नेमणूक करण्यात आली आहे, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी निनाद लांडे यांनी केले आहे.

अकोला । वाशिम । बुलडाणा

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

■ मंगळवार, २४ मार्च २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

# महानगरात झोपडपट्टीधारकांना दिलासा की केवळ घोषणाबाजी

## ८१ झोपडपट्ट्यांचे सर्व्हेक्षण मंजूर; ३० वर्षांचे पट्टे देण्याचा निर्णय, प्रस्ताव शासनाच्या दारात





***अकोला :** शहरातील झोपडपट्टी आणि गावठाण विस्तार भागातील हजारो कुटुंबांच्या भवितव्याशी निगडित असलेला महत्त्वाचा निर्णय अकोला महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत सोमवारी घेण्यात आला. ८१ झोपडपट्ट्यांचे खासगी एजन्सीद्वारे सर्व्हेक्षण करून अतिक्रमण धारकांना ३० वर्षांच्या कालावधीसाठी जमिनीचे पट्टे देण्याच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली.*

*या निर्णयामुळे वर्षानुवर्षे अनिश्चिततेत राहणाऱ्या कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार असला, तरी प्रत्यक्ष अंमलबजावणी कितपत गतीने होणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.*

महापौर शारदा खेडकर यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात झालेल्या बैठकीत प्रधानमंत्री आवास योजना टप्पा दोन अंतर्गत हा महत्त्वाचा विषय चर्चेला आला. शहरातील शासकीय तसेच मनपाच्या जागांवर पट्टे वाटप करण्यासाठी खासगी अभिकर्ता नेमण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. झोपडपट्टीधारकांना कायदेशीर हक्क मिळवून देण्यासाठी सर्वेक्षणाची प्रक्रिया जलद आणि अचूक होणे आवश्यक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

सभेत केवळ झोपडपट्टी प्रश्नावरच नव्हे, तर गुंठेवारीतील अनधिकृत बांधकामांच्या प्रश्नावरही चर्चा रंगली. अनेक नागरिकांची घरे अजूनही कायदेशीर चौकटीबाहेर असल्याने त्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर गुंठेवारी भागातील बांधकामे नियमबद्ध करण्यासाठीची मुदत ३० जून २०२६ पर्यंत वाढवून देण्याचा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला.

या चर्चेत स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल, स्वीकृत नगरसेवक सुनील इन्नानी, नगरसेवक आशिष पवित्रकार, मंजुषा शेळके, निलेश देव, पराग गवई, सागर भारुका, हरीश अलीमचंदानी, सुनील मेश्राम, गिरीश गोखले, निलोफर खान आणि आझाद खान यांनी सहभाग घेतला. लोकप्रतिनिधींनी शहरातील विकासकामांबरोबरच मूलभूत सुविधांच्या प्रश्नांवरही प्रशासनाला धारेवर धरले.

झोपडपट्टी पुनर्वसनासोबतच नगरोत्थान महाअभियान, नागरी दलित्तेर वस्ती सुधार कार्यक्रम, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी सुधार योजना आणि नाविन्यपूर्ण योजनांतील विविध प्रस्तावांनाही सभेत मंजुरी देण्यात आली. दरम्यान, मोठमोठे निर्णय कागदावर घेतले जात असले, तरी त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी वेळेत होणे हीच खरी कसोटी ठरणार आहे. शहरातील नागरिकांना दिलासा देणाऱ्या या घोषणांचा प्रत्यक्ष लाभ कधी मिळतो, हेच आता पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### “ मच्छर अगरबत्ती आणि गढूळ पाणी घेऊनच सभागृहात हजेरी

शहरातील डासांच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे नागरिक त्रस्त असताना प्रशासन मात्र निष्क्रिय असल्याचा आरोप करत काँग्रेसचे नगरसेवक आझाद खान यांनी थेट सभागृहात मच्छर अगरबत्ती आणि गढूळ पाण्याची बाटली आणली. साचलेले पाणी, अस्वच्छ नाले आणि दुर्लक्षित भूखंड यामुळे परिस्थिती गंभीर झाल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. उपरोधिक पद्धतीने उपायुक्त विजय पारतवार यांना ही सामग्री देत त्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले.

---

### “ डीपीआर ७ हजार घरांचा, प्रत्यक्षात फक्त ३ हजारच

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत शहरासाठी ७ हजार घरकुलांचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला होता. मात्र प्रत्यक्षात केवळ ३ हजार घरकुलांचेच बांधकाम पूर्ण झाले असल्याची बाब सभेत उघड झाली. नगरसेवक निलेश देव यांनी हा मुद्दा उपस्थित करत प्रशासनाच्या कामगिरीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. बिर्ला कॉलनीतील रहिवाशांचाही यामध्ये समावेश करावा, अशी मागणीही त्यांनी केली.

---

### “ शहरात १० हजार घरकुलांचे लक्ष्य; कर्जाचा मार्गही मोकळा

प्रधानमंत्री आवास योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात शहरासाठी तब्बल १० हजार घरकुलांचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. या योजनेअंतर्गत झोपडपट्टी व अतिक्रमण धारकांना केवळ घरकुलच नव्हे, तर जमिनीचे पट्टे मिळाल्यानंतर नकाशा मंजुरी आणि बँक कर्जाचा मार्गही मोकळा होणार असल्याची माहिती महापौर शारदा खेडकर आणि स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांनी दिली.

## नवतेजस्विनी महोत्सव २०२६ अंतर्गत माविम प्रदर्शनाचे भव्य उद्घाटन संपन्न



■ **प्रतिनिधी | कारंजा** ■

महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) वाशिम अंतर्गत आयोजित नवतेजस्विनी महोत्सव २०२६ निमित्त महिला बचत गटांच्या उत्पादनांच्या भव्य प्रदर्शनाचे उद्घाटन दिनांक २१ मार्च २०२६ रोजी बाबासाहेब धाबेकर सभागृह येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.

सदर उद्घाटन समारंभाचे उद्घाटक खासदार संजय देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून मा.आमदार सईताई डहाके तसेच आमदार किरण सरनाईक, कारंजा नगरपरिषद येथील नगरसेवक, नगरसेविका आणि कृषी उत्पन्न बाजार समितीमधील संचालक मंडळ उपस्थित होते. तसेच कार्यक्रमास विशेष उपस्थिती म्हणून आकाश वर्मा , उपविभागीय अधिकारी, (भा. प्र. से.) तसेच मा.कैलास देवरे (उपविभागीय अधिकारी) व रवी महाले (तहसीलदार), श्रीमती वर्षा खोब्रागडे यांनी कार्यक्रमाची शोभा वाढवीली.

## जीवनात यशस्वी होण्यासाठी वाचन आवश्यक

### जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांचे प्रतिपादन

**वाशिम :** वाचनाने माणूस समृद्ध होतो. प्रत्येक यशस्वी माणसाची यशोगाथा बघितल्यास वाचन हा त्यांच्या यशस्वीतेचा अविभाज्य भाग आहे हे प्रामुख्याने दिसून येते. वाचनातून विचारांच आदान प्रदान होते. तान तणावातून मुक्ती मिळण्यासाठीही वाचन गरजेचे आहे. त्यामुळेच जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर आपण प्रत्येकाने वाचनाची सवय लावली पाहिजेत , असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.

दि. २३ मार्च रोजी स्थानिक शासकीय जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात पार पडलेल्या ग्रंथोत्सव २०२५ च्या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानावरून जिल्हाधिकारी



कुंभेजकर हे बोलत होते.

उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई आणि जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत आयोजित या ग्रंथोत्सवाचे उद्घाटन जेष्ठ कवी इंद्रजीत भालेराव यांच्या हस्ते झाले.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी अत्यंत हृदयस्पर्शी शब्दांत सांगितले, पुस्तक हे केवळ कागदांचे संकलन नसून ते विचारांचे विश्व आहे. वाचनातूनच माणसाला जीवनाची योग्य दिशा सापडते. त्यांनी पुढे वाचनाची उपयुक्तता स्पष्ट करताना नमूद केले की, व्यक्तीची वैचारिक जडणघडण घडवण्यासाठी वाचन हे मूलभूत साधन आहे. ज्ञानाची देवाण-घेवाण, विचारांची समृद्धी आणि समाजाची प्रगती यासाठी वाचनसंस्कृती रुजणे अत्यावश्यक आहे. ग्रामीण भागातील ग्रंथालयांनी पुस्तकांची शास्त्रीय वर्गवारी करावी, महिलांचे, बालकांचे, ज्येष्ठांचे वेगळे दालन उभरावे. जेणेकरून वाचकांना अपेक्षित साहित्य सहज उपलब्ध होईल, असे आवाहन त्यांनी केले. तसेच, मी वर्षभरात चाळीस पुस्तकांचे वाचन करत असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले आणि वाचन हेच माझ्या यशाचे गमक असल्याचे सांगितले.

ग्रंथोत्सवाची सुरुवात सकाळी ९ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथून निघालेल्या भव्य ग्रंथदिंडीने झाली. ज्ञानाच्या मशालीने उजळलेली ही दिंडी म्हणजे वाचनसंस्कृतीचा जणू उत्सवच ठरला.

## राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने नंदकिशोर भोयर सन्मानित



■ **प्रतिनिधी | कारंजा** ■

शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत पदवीधर शिक्षक नंदकिशोर भोयर यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. नैसर्गिक मानवाधिकार सुरक्षा परिषद फोरम या संस्थेच्या वतीने २२ मार्च २०२६ रोजी धुळे येथे झालेल्या भव्य पुरस्कार सोहळ्यात त्यांचा सन्मान करण्यात आला.

या सोहळ्यात राष्ट्रीय अध्यक्ष गोरखजी देवरे आणि महाराष्ट्र अध्यक्ष प्रफुल पाटील यांच्या हस्ते भोयर यांना गौरविण्यात आले. कार्यक्रमाला रामदादा भराणे, मंजुळा गावीत, तसेच पोलीस आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली. नंदकिशोर भोयर हे कारंजा पंचायत समिती अंतर्गत जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळा, सुकळी येथे विज्ञान पदवीधर शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. शिक्षणासोबतच त्यांनी सामाजिक बांधिलकी जपत अनेक उपक्रम राबवले आहेत. १९९३ पासून केंद्रच्या माध्यमातून त्यांनी युवकांना व्यासपीठ उपलब्ध करून दिले.

## हरिष सारडा यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यासाठी उसळला जनसागर

■ **प्रतिनिधी | वाशिम** ■

जिल्ह्याचे जलयोद्धा मा. हरीश सारडा यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. समाजसेवी सारडा यांच्या निवासस्थानी वाढदिवस शुभेच्छा देण्यासाठी मोठा सागर उसळला होता. विविध राजकीय पक्ष सामाजिक संघटना सहकार क्षेत्र सामाजिक क्षेत्र औद्योगिक क्षेत्र समाजसेवक यांनी त्याचा सत्कार केला.



हरीश सारडा यांचे राजकीय जीवन संघर्षमय राहिले. सुरवात राम जन्मभूमी आंदोलनापासून सुरवात झाली. त्या काळी हिंदू टोळक्याचा म्होरक्या म्हणून आरोप झाले व तडीपारीची कार्यवाही झाली. त्या नंतर मा. बाळासाहेब ठाकरे यांच्या विचाराशी एकरूप होऊन शिवसेना मध्ये सक्रिय झाले. सक्रिय असताना मा शिवसेना प्रमुख यांचे सोबत अत्यंत जिव्हाळायचे संबंध निर्माण झाले. मा. शिवसेनाप्रमुख वाशीम येथे आले असता त्यांच्या सभेचे सूत्रसंचालन करण्याचे भाग्य लाभले. त्या नंतर मा.दिवाकरराव जी रावते यांनी मानस पुत्र चा दर्जा देऊन त्यांच्या विदर्भातील कापूस दिंडी चे संपूर्ण नियोजन करण्यात प्रमुख भूमिका देऊ केली. तसेच वाशीम जिल्हाची संघटनातमक जबाबदारी दिली. या कारणास्तव वाशीम मध्ये शिवसेनेचा प्रथम खासदार म्हणून मा. पुंडलिकराव गवळी निवडून आनन्यात कष्ट घेतले.वाशीम जिल्हापरिषद मध्ये उपाध्यक्ष म्हणून अनिता दहात्रे यांच्या निवडीमध्ये सुद्धा महत्वाची भूमिका होती. तसेच समूर्ण विदर्भात संघटना बांधण्यात महत्वपूर्ण योगदान आहे. मा. राजेंद्र पाटणी यांचे प्रथम विधानपरिषद चे तिकीट आणण्यामध्ये सिंहाचा वाटा. तसेच कारंजा विधानसभा निवडणुकीत विजया मध्ये महत्वपूर्ण भूमिका. विरोधकांशी थेट भिडण्यात अग्रेसर असल्या मुळे विरोधकांकडून अपप्रचार करण्यात येतो. भ्रष्टाचाराच्या विरोधात सतत आवाज उठवल्या मुळे भ्रष्टाचारी लोकांच्या मनात दहशत निर्माण झालेली आहे.

सध्या वाशीम जिल्हायाचा वैनगंगा नळगंगा नदी जोड प्रकलपात समावेश करण्यासाठी संघर्ष समिती स्थापन करून वाशीम जिल्ह्याचा समावेश करवून घेतला असला तरी अजून संघर्ष सुरूच आहे कारण वाशीम जिल्ह्यातील फक्त काही गावांचा समावेश आहे. या प्रकल्पात जिल्ह्यातील किमान ३ तालुक्याचा समावेश असावा या करिता अजूनही संघर्ष सुरुच आहे व कोणत्याही दबावाला न जुमानता सुरुच राहिल असे त्यानी स्पष्ट केले.

## अपघात नियंत्रणासाठी ठोस उपाययोजना कराव्या

**वाशिम :** जिल्ह्यातील वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर अपघात नियंत्रणासाठी ठोस व प्रभावी उपाययोजना राबविणे अत्यंत आवश्यक आहे,असे प्रतिपादन प्रादेशिक परिवहन अधिकारी, अकोला रवींद्र भुयार यांनी केले.

दि. २३ मार्च २०२६ रोजी उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, वाशिम येथे भेट देऊन विविध कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी त्यांनी सावरगाव बर्डे येथे उभारण्यात येत असलेल्या परिवहन वाहनांच्या योग्यता प्रमाणपत्र चाचणीसाठीच्या इन्स्पेक्शन अँड सर्टिफिकेशन सेंटरच्या बांधकाम स्थळाची पाहणी केली. अत्याधुनिक सुविधा व तंत्रज्ञानाने सुसज्ज असलेले हे केंद्र लवकरच कार्यान्वित होणार असून, त्याद्वारे सुरक्षित वाहनांचे प्रमाणीकरण सुलभ होणार आहे.

## नानाजी देशमुख कृषी संजीवनी टप्प्याची कृषी अधिकारी कार्यालयाकडून अंमलबजावणी

■ **प्रतिनिधी | मानोरा** ■

तालुक्यातील ग्रापं खंबाळा येथे जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय वाशिम उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालय वाशिम यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका कृषि अधिकारी कार्यालय मानोरा यांच्या माध्यमातून चालू असलेल्या नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा २.० अंतर्गत श्रमदानाचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी मंडळ कृषी अधिकारी उमेश राठोड यांनी मृद व जलसंधारण चे महत्व पटवून सांगितले आणि फार्मर कप स्पर्धा मध्ये सर्व गावकऱ्यांनी सहभाग नोंदविण्याचे आवाहन केले. यावेळी श्रमदानामध्ये तळ्यातील गाळ काढत गावामध्ये व शेतामध्ये घेण्यात आलेला कार्यक्रम त्यामध्ये



शेतकऱ्याने व गावकऱ्यांनी व ग्राम कृषी विकास समितीने भरभरून उत्साह दाखवला.

प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी प्रभात फेरी काढून ङपर्यावरण संरक्षण हीच खरी सेवा. नैसर्गिक संपत्ती आहे राष्ट्राची खरी संपत्ती. ङएक पाऊल निसर्गासाठी हजार पाऊले प्रगतीसाठी.ङ ङपाणी आहे अमृत त्याची करा जपवणूक.ङ अशा प्रकारची नारे देत मुलांची जनजागृतीसाठी खंबाळा या गावातून रॅली काढण्यात आली यामध्ये सहभागी सरपंच सौ नंदिनी विष्णु ससाणे, उपसरपंच अर्जुन गिरकर, सहाय्यक कृषी अधिकारी गोविंद भोसले गावातील ग्रामपंचायत समिती व गावातील नागरिक (NRM COORDINATOR) हर्षद घुगे व समूह सहाय्यक दिनेश भगत साहेब आणि गावातील सर्व गावकरी मंडळी उपस्थित होते.

## राजस्थानी महिला मंडळाच्या वतीने गणगौर उत्सव उत्साहात संपन्न



**मंगरूळपीर :** तालुक्यातील शेलुबाजार येथील राजस्थानी महिला मंडळाच्या वतीने दरवर्षी साजरा होणारा गणगोरत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. गणगोर या सणाची सुरुवात होळीच्या दुसऱ्या दिवशी म्हणजेच रंगपंचमीच्या दिवशी पासून तर पाडव्यापर्यंत असा पंधरा दिवस चालणार गणगोर सण हा घरोघरी साजरा केला जातो.

यामध्ये सप्तमीच्या दिवशी शीतला मातेचे पूजन केले जाते व इसर गौरारुपी कुंड्यांमध्ये धान टाकले जाते व त्या दिवसापासून दररोज ईसर गौरा जी म्हणजे शंकर-पार्वती यांचे पूजन करून मारवाडी गीत गायले जातात. तसेच पाडव्याच्या दुसऱ्या दिवशी संपूर्ण गावांमधून इसर गौराजी यांची मिरवणूक ढोल ताशाच्या गजरात काढली जाते. या मिरवणुकीमध्ये गावातील सर्व राजस्थानी महिला मंडळ तरुणी मोठ्या उत्साहात सहभागी होतात.

## टीईटी उत्तीर्ण शिक्षकांची जिल्हा परिषद प्रशासनाकडे पदोन्नती करण्याची मागणी

■ **प्रतिनिधी | वाशिम** ■

१ सप्टेंबर २०२५ च्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार त्याचप्रमाणे उच्च न्यायालयाच्या विविध खंडपीठांच्या अनेक निकालानुसार तसेच महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव यांचे १९ जानेवारी २०२६ चे पत्र आणि प्राथमिक शिक्षण संचालक यांचे ९ फेब्रुवारी २०२६ चे पत्र यानुसार शिक्षक संवर्गातून पदोन्नती देण्यासाठी टीईटी किंवा सीटीईटी या परीक्षेत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.त्याशिवाय कोणत्याही शिक्षकास पदोन्नती मिळणार नाही असे स्पष्टपणे सांगण्यात आले आहे.नोकरीत राहण्यासाठी दोन वर्षांमध्ये टीईटी उत्तीर्ण होणे आवश्यक असल्याचे सांगितले आहे.तर ज्यांची सेवा पाच वर्ष पेक्षा कमी राहिली आहे.अशा सेवाज्येष्ठ शिक्षकांना टीईटी परीक्षेतून सूट देण्यात आली आहे.परंतु सेवाजेष्ठ शिक्षकांना सुद्धा पदोन्नतीसाठी टीईटी उत्तीर्ण होणे अनिवार्य करण्यात आले आहे.त्या अनुषंगाने महाराष्ट्रातील विविध जिल्हा परिषदा मध्ये पदोन्नती प्रक्रिया सुरू




करण्यात आली आहे.

महाराष्ट्रातील अहिल्यानगर या जिल्ह्याने पदोन्नती करण्यात पहिला क्रमांक लावला आहे.त्यानंतर जळगाव जिल्ह्याने सुद्धा ही पदोन्नती टीईटी शिक्षक संवर्गातून केली आहे.

वाशिम जिल्ह्यामध्ये सुद्धा पदोन्नतीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली असल्याचे समजते.

टीईटी उत्तीर्ण झालेल्या शिक्षकांनी त्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी वाशिम यांना आणि प्राथमिक शिक्षणाधिकारी संजय ससाने यांच्याकडे पदोन्नती करण्यासंदर्भात निवेदन दिले आहे.त्या निवेदनातून जिल्ह्यामध्ये पदोन्नतीच्या रिक्त असलेल्या शिक्षण विस्तार अधिकारी,केंद्रप्रमुख आणि उच्च श्रेणी मुख्याध्यापक आदी पदोन्नतीने भरावयाची पदे तात्काळ भरावीत अशी मागणी केली आहे.

समायोजनाच्या आधी पदोन्नती केल्यास जिल्ह्यामध्ये अतिरिक्त असलेले शिक्षक त्या रिक्त जागावर समायोजित होतील अशी सुद्धा निवेदनातून मागणी त्यांनी केलेली आहे.परंतु जिल्ह्यात जे टीईटी उत्तीर्ण नसलेले सेवाजेष्ठ शिक्षक आहेत. त्यांनी २०२७ पर्यंत टीईटी मधून सूट देऊन पदोन्नती करावी अशी मागणी केलेली आहे.तर ज्या शिक्षकांनी नुकतीच सीटीईटी परीक्षा दिली आहे. परंतु आज रोजी उत्तीर्ण नाहीत अशा शिक्षकांचे म्हणणे आहे की, आमचा निकाल काही दिवसात येऊ शकतो. त्यामुळे ही पदोन्नती प्रक्रिया थांबवावी म्हणून त्यांनी सुद्धा प्रशासनाकडे विनंती केली आहे. उच्च न्यायालयाकडे सुद्धा पदोन्नती प्रक्रिया थांबवण्यासाठी प्रयत्न होत असल्याची चर्चा आहे.परंतु टीईटी उत्तीर्ण झालेल्या शिक्षकांचे म्हणणे आहे की,आम्ही सर्वोच्च न्यायालय आणि शासनाच्या नियमाचे अनुपालन करून सर्वप्रथम परीक्षा दिली आणि उत्तीर्ण झालो आहोत,म्हणून शासन नियमानुसार आमच्या मधून ही पदोन्नती प्रक्रिया करावी. अशी मागणी त्यांनी केली आहे.प्रशासन जर ही पदोन्नती प्रक्रिया पुढे ढकलत असेल तर आम्हाला सुद्धा उच्च न्यायालया मध्ये दाद मागण्यासाठी जावे लागेल असे प्रतिपादन टीईटी पात्रता धारक शिक्षकांनी केले आहे.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ११६ ■ मंगळवार २४ मार्च २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.००रु




### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मंत्री बावनकुळे, राज्यमंत्री भोयर, जयस्वाल, यांची उपस्थिती

## वर्ध्याचा दानशूर...

# दत्ता मेघे पवनारच्या मातीत विलीन झाले

## जन्मगावी पवनार येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार





फोटो- राहूल तेलरांधे



■ गोरगरिबांचा खरा कैवारी हरपला, ही अत्यंत दुःखद बाब आहे. दत्ताजी मेघे यांनी हजारो युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देत अनेक कुटुंबांना उभारी दिली. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून वाटचाल करत त्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले. विविध विचारधारांच्या समाजकार्यकर्त्यांशी त्यांनी जिव्हाळ्याचे संबंध ठेवले. त्यांच्या कार्यामुळे वर्धा जिल्ह्याचा गौरव राज्यभर वाढला. ते खऱ्या अर्थाने लोकमान्य नेते होते. त्यांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी भरून निघणे अशक्य आहे. त्यांच्या स्मृतीस माझे शतशः वंदन.- **अतुल वांदिले** (राका शरद पवार गट, जिल्हाध्यक्ष)

■ दत्ताजी मेघे यांच्या निधनाने एका महान युगाचा अंत झाला आहे. राजकीय मतभेदांच्या पलीकडे जाऊन सर्वांशी जिव्हाळ्याचे नाते जपणारे ते ऋषितुल्य व्यक्तिमत्व होते. शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रात त्यांनी उभे केलेले कार्य आजही समाजासाठी दिशादर्शक ठरत आहे. अनेक कार्यकर्त्यांना त्यांनी पितृतुल्य मार्गदर्शन दिले आणि त्यांना घडवले. त्यांच्या साधेपणामुळे आणि सर्वसमावेशक वृत्तीमुळे ते प्रत्येकाच्या मनात घर करून राहिले. त्यांच्या जाण्याने वर्धा जिल्ह्यासह संपूर्ण विदर्भाची मोठी हानी झाली आहे. वैयक्तिकरित्या मीही एक मार्गदर्शक गमावला आहे. त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन अर्पण करतो.

**आमदार सुमित वानखेडे**

■ **समाजकारणाचा सच्चा सिपाही' हरपला**

दत्ताजी मेघे यांनी माझ्यासारखे अनेक आमदार-खासदार घडविले. त्यांनी राजकारणापेक्षा समाजकारणाला प्राधान्य दिले. त्यांच्या जाण्याने वर्ध्याचे भरून न निघणारे नुकसान झाले आहे.

दत्ताजी मेघे यांच्या निधनाची बातमी अतिशय धक्कादायक आहे. दोन दिवसांपूर्वीच त्यांची भेट झाली होती. नेहमीप्रमाणे त्यांनी हसतमुखाने संवाद साधत तब्येतीची विचारपूस केली. त्या क्षणी हा शेवटचा संवाद ठरेल, याची कल्पनाही नव्हती. त्यांच्या जाण्याने मन सुन्न झाले आहे.-**पालकमंत्री डॉ,पंकज भोयर**

■ दत्ताजी मेघे हे केवळ राजकीय नेते नव्हते, तर सर्वसामान्य जनतेचा आधार होते. प्रत्येकाच्या सुख-दुःखात ते कायम सहभागी होत. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात आपुलकी, साधेपणा आणि कार्यतत्परता यांचा सुंदर संगम होता.त्यांच्या निधनाने वर्धा जिल्ह्याची मोठी हानी झाली असून एक आधारवड हरपला आहे. त्यांच्या कार्याची आणि विचारांची परंपरा कायम प्रेरणा देत राहील. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली. - **खासदार अमर काळे**

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा जिल्ह्याच्या राजकीय व सामाजिक आकाशातील तेजस्वी तारा हरपला माजी खासदार तथा माजी राज्यमंत्री दत्ताजी मेघे यांच्या निधनाने संपूर्ण जिल्हा शोकसागरात बुडाला आहे. 'वर्ध्याचा लाडका नेता' म्हणून जनमानसात घर केलेल्या या थोर नेत्याच्या पार्थिवावर त्यांच्या जन्मभूमी पवनार येथे सोमवारी संध्याकाळी ७ वाजता शासकीय इतमामात अत्यंत भावपूर्ण वातावरणात सागर मेघे यांनी मुखाग्नी दिली,

नागपूर येथे हृदयविकाराच्या धक्क्याने झालेल्या त्यांच्या आकस्मिक निधनाने केवळ एक नेता नव्हे, तर समाजकारणाचा खंबीर आधारवडच हरपल्याची भावना सर्वत्र व्यक्त होत आहे.

अंत्यसंस्काराच्या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पार्थिवावर पुष्पचक्र अर्पण करून भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. त्यांच्या सोबत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी , महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पालकमंत्री पंकज भोयर, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

पवनारच्या भूमीत हजारो नागरिक, कार्यकर्ते आणि चाहत्यांनी उसळून येत आपल्या लाडक्या नेत्याला अखेरचा निरोप दिला. शासकीय मानवंदना, पोलिसांच्या बंदुकींच्या सलामीने वातावरण अधिकच हळवे झाले. प्रत्येकाच्या डोळ्यात अश्रू आणि ओठांवर एकच शब्द दत्ताजी, तुम्ही परत या.

कुटुंबीयांमध्ये शालिनीताई मेघे, पुत्र सागर मेघे, आमदार समीर मेघे यांचे सांत्वन करताना अनेक नेते भावुक झाले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी कुटुंबीयांना धीर देताना हे नुकसान कधीही भरून न निघणारे आहे, अशा शब्दांत भावना व्यक्त केल्या.

**मान्यवरांची उपस्थिती, भावनांचा पूर**

यावेळी राजकीय, प्रशासकीय आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी हजेरी लावली. हजारो लोकांनी पुष्पवृष्टी करत आपल्या नेत्याला अखेरचा निरोप दिला. पवनारची माती आज जणू अश्रूंनी ओलीचिंब झाली होती.

सेवेच्या वाटेवर चालणारा नेता दत्ताजी मेघे हे केवळ राजकारणी नव्हते, तर ते समाजकारणाचे जिवंत उदाहरण होते. ग्रामविकास, शिक्षण, आरोग्य या क्षेत्रांत त्यांनी दिलेले योगदान अमूल्य आहे. त्यांच्या कार्यातून हजारो कुटुंबांना नवे आयुष्य मिळाले.

आज त्यांच्या जाण्याने वर्धा जिल्हा जणू पोरका झाला आहे,

पवनारच्या मातीत विलीन होताना दत्ताजी मेघे यांनी पुन्हा एकदा दाखवून दिले,

खरा नेता तोच, जो शेवटपर्यंत जनतेच्या हृदयात जिवंत राहतो,

---

## विदर्भाची प्रती पंढरी' घोराड येथे अन्नसेवेचा पवित्र प्रारंभ

# गुढीपाडव्याच्या मंगल क्षणी अन्नछत्राचे पुन्हा उघडले दरवाजे; भाविकांत आनंदाची लहर

**सेलू जनमाध्यम :** विदर्भाची 'प्रती पंढरी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पवित्र तीर्थक्षेत्र घोराड येथे गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर अन्नदानाच्या पुण्यकार्याला नवसंजीवनी मिळाली. विठ्ठल-रुख्माई देवस्थानात गुरुवार, दि. १९ रोजी अन्नछत्राचा विधिवत शुभारंभ मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने पार पडला.



या अन्नछत्राचे उद्घाटन पंढरी केशवराव धोंगडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी देवस्थानचे अध्यक्ष नानाजी खराबे, सचिव डॉ. सुरेश धंदरे, ट्रस्टी पळसराम गोमासे, पत्रकार विजय माहुरे, बारसु निमजे, श्रीधर झाडे यांच्यासह गावातील अनेक भाविक भक्त उपस्थित होते. संपूर्ण परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

काही काळ बंद पडलेले हे अन्नछत्र पुन्हा सुरू झाल्याने भाविकांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंद स्पष्ट दिसत होता. विशेषतः बाहेरगावाहून येणाऱ्या वारकऱ्यांसाठी व भक्तांसाठी ही अन्नसेवा मोठा आधार ठरणार आहे. अन्नदान हीच खरी ईश्वरसेवा या भावनेतून पुन्हा सुरू झालेल्या या उपक्रमासाठी अनेक दानदाते पुढे येत असून, घोराडच्या या सेवाभावी परंपरेला नवचैतन्य लाभत आहे. श्रद्धा, सेवा आणि समर्पण यांची त्रिवेणी येथे पुन्हा एकदा अनुभवायला मिळत आहे.

---

# धरण शेजारी तरी घागरी रिकाम्या

## कोट्यवधींची योजना ठप्प; बोरी (कोकाटे) गावात पाण्यासाठी महिलांची दररोजची झुंज

**सेलू जनमाध्यम :** एकीकडे डोळ्यांसमोर पाण्याने भरलेले बोर धरण आणि दुसरीकडे थेंबासाठी व्याकूळ झालेलं बोरी (कोकाटे) गाव! ही विडंबनात्मक परिस्थिती आज गावकऱ्यांच्या जिव्हारी लागली आहे. धरणाच्या कुशीत वसलेलं हे गाव सध्या तीव्र पाणीटंचाईच्या छायेत जगत असून, प्रशासनाच्या निष्क्रियतेवर संतापाचा उद्रेक होत आहे. गावासाठी उभारण्यात आलेली नळ पाणीपुरवठा योजना तब्बल १४ वर्षांपासून धुळ खात पडली आहे. कोट्यवधी रुपयांचा खर्च करून उभारलेली पाण्याची



टाकी आजही कोरडीच आहे. कधी पाणी साठवलंच गेलं नाही, त्यामुळे या योजनेचा गावकऱ्यांना काडीचाही फायदा झाला नाही. आश्वासनांचे बुडबुडे फुटले, पण नळातून एक थेंबही वाहिला नाही, हीच आजची वस्तुस्थिती दरम्यान, शांतिनगर परिसरात परिस्थिती अधिकच गंभीर बनली आहे. दोन हातपंपांपैकी एक पूर्णपणे बंद पडलेला, तर दुसऱ्यावर संपूर्ण वस्तीचा जीव अडकलेला.

पहाटेच्या अंधारापासूनच महिलांच्या रांगा लागतात. घागरी, बादल्या घेऊन तासन्तास उभं राहणं हा त्यांच्या आयुष्याचा भाग बनला आहे. पाण्यासाठीची ही रोजची धावपळ त्यांच्या संसारावर, आरोग्यावर आणि जगण्यावर घाला घालत आहे.धरण शेजारी असूनही आम्हाला पाण्यासाठी वणवण फिरावं लागतं, यापेक्षा मोठं दुर्दैव काय असा प्रश्न ग्रामस्थ विचारत आहेत. दुरुस्तीच्या नावाखाली वारंवार खर्च होतो, पण नळयोजना

---

# कंत्राटदारांचा एल्गार; सार्वजनिक बांधकाम विभागासमोर ठिय्या

**वर्धा जनमाध्यम :** निविदा प्रक्रियेत कथित अनियमितता आणि प्रलंबित देयकांच्या प्रश्नावरून जिल्ह्यातील कंत्राटदारांनी अखेर आक्रमक पवित्रा घेत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन छेडले. सोमवार (२३ मार्च) रोजी कार्यकारी अभियंत्यांच्या दालनासमोर बसत आंदोलनकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत आपल्या मागण्या प्रशासनासमोर मांडल्या.

निविदा प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव असून 'मॅनेजमेंट'च्या



नावाखाली पक्षपातपूर्ण पद्धतीने कामे दिली जात असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. ही पद्धत तात्काळ बंद करून ३३-३३-३४ या प्रमाणानुसार पारदर्शक टेंडर प्रक्रिया राबवावी, अशी ठाम मागणी कंत्राटदारांनी केली. तसेच मजूर संस्थांना कुशल कामे देऊ नयेत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

गेल्या दोन वर्षांपासून प्रलंबित असलेली देयके तातडीने, विशेषतः मार्चपूर्वी अदा करावीत, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही देण्यात आला. प्रशासनाच्या उदासीन भूमिकेमुळे कंत्राटदारांमध्ये नाराजीचे वातावरण असल्याचे आंदोलनातून स्पष्ट झाले.

आंदोलनकर्त्यांच्या मागण्यांचे निवेदन उपअभियंता मुत्तेलवार यांनी स्वीकारले असून लवकरच याबाबत सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन दिल्याची माहिती देण्यात आली.

या आंदोलनात किशोर मिटकरी, अजय घवघवे, संदीप ताकसांडे, मुन्ना झाडे, प्रशांत धोटे, पिंटू सातपुते, निक्की चव्हाण, विशाल शेंडे, प्रमोद चव्हाण, अरविंद कोकाटे, संजय शेरजे, बाबा जाकीर, महेश जगताप, दीपक पागूळ, रमेश भगत, सुनील शेरजे, नागेश सरदार, राजेश हाडोळे, शारिक अली, पोहनिश परिहार आदी कंत्राटदार मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

---

# नवा शासन निर्णय सैनिकांची थट्टा; जय हिंद फाऊंडेशनचा आरोप

**वर्धा जनमाध्यम :** माजी सैनिक, जवान आणि वीरपत्नींसाठी शासकीय जमीन वाटपाचा निर्णय राज्य सरकारने जाहीर केला असला, तरी तो प्रत्यक्षात फसवा ठरत असल्याचा आरोप जय हिंद फाऊंडेशनचे राष्ट्रीय संचालक बिपीन मोघे यांनी केला आहे. १० फेब्रुवारी २०२६ रोजी निर्गमित शासन निर्णय हा कालबाह्य अटींवर आधारित असल्याने पात्र लाभार्थ्यांना त्याचा फायदा मिळणे कठीण असल्याचे त्यांनी सांगितले.या निर्णयात माजी सैनिकांसाठी वार्षिक उत्पन्नाची मर्यादा केवळ १ लाख रुपये ठेवण्यात आली आहे. सध्याच्या

■ सरकारने सैनिकांच्या भावनांशी खेळू नये. उत्पन्नाची अट वास्तववादी केली नाही आणि अतिक्रमित जमिनी परत मिळवून दिल्या नाहीत, तर हा निर्णय केवळ कागदावरच राहील. यामुळे माजी सैनिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. शासनाने त्वरीत दुरुस्ती न केल्यास आंदोलनाचा मार्ग अवलंबावा लागेल,

**बिपीन मोघे,** राष्ट्रीय संचालक, जय हिंद फाऊंडेशन

महागाईच्या आणि सातव्या वेतन आयोगाच्या पार्श्वभूमीवर ही अट अव्यवहार्य ठरत असल्याचे मोघे यांनी नमूद केले. ही मर्यादा किमान ८ ते १० लाख रुपये करण्यात यावी, अन्यथा सामान्य सैनिक या योजनेपासून वंचित राहतील, असेही त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, यापूर्वी माजी सैनिकांना देण्यात आलेल्या जमिनींवर भूमाफियांनी अतिक्रमण केल्याच्या तक्रारी असून प्रशासनाकडून त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. त्यामुळे शासनाने हा निर्णय तातडीने रद्द करून आवश्यक सुधारणा कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

---


# कार्यालय ग्रामपंचायत नांदगाव (बोर) पं. सं. हिंगणघाट जिल्हा वर्धा

## निविदा सूचना

सर्व सांगणिकृत कंत्राटदारास सूचित करण्यात येते की, ग्राम पंचायत नांदगाव (बोर) येथे सामान्य निधि योजना सन २०२४-२५ व २०२५-२६ अंतर्गत मंजूर कामाकरिता पंजीबद्ध कंत्राटदाराकडून निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्रं. | योजनेचे नाव | कामाचे नाव | प्रकलण किमंत | तांत्रिक मंजूरी क्र. | निविदा फी | १% अनामत रक्कम | कामाचा कालावधी | निविदा स्वीकृतीचा दिनांक | निविदा उघडण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | SAMANY NIDHI | CONSTRUCTION OF RAPTA SLAB AND GATE TO SCHOOL PREMISES | २७२००० | TS NO. DE/854/2024-25 | १००० | २७२० | ३ महीने | २४/०३/२०२६ ते ३०/०३/२०२६ | ३०/०३/२०२६ |
| २ | SAMANY NIDHI | CONSTRUCTION OF COMPOUND WALL TO SCHOOL PREMISES | ३३२००० | TS NO. DE/855/2024-25 | १००० | ३३२० | ३ महीने | २४/०३/२०२६ ते ३०/०३/२०२६ | ३०/०३/२०२६ |
| ३ | SAMANY NIDHI | BALANCE WORLE OF G.P. BULDING | १५२००० | TS NO. DE/857/2024-25 | १००० | १५२० | ३ महीने | २४/०३/२०२६ ते ३०/०३/२०२६ | ३०/०३/२०२६ |
| ४ | SAMANY NIDHI | CONSTRUCTION OF COMPOUND WALL TO GRAMPANCHAYAT NANDGAON (B) | ४६३००० | TS NO. DE/869/2024-25 | १००० | ४६३० | ३ महीने | २४/०३/२०२६ ते ३०/०३/२०२६ | ३०/०३/२०२६ |
| ५ | SAMANY NIDHI | CONSTRUCTION OF COMPOUND WALL TO BALWADI PRMISES | ४७५००० | TS NO. DE/421/2024-25 | १००० | ४७५० | ३ महीने | २४/०३/२०२६ ते ३०/०३/२०२६ | ३०/०३/२०२६ |
| ६ | SAMANY NIDHI | BALAUCE WORLE OF G.P. BHAWAN | १७१७०० | TS NO. DE/422/2024-25 | १००० | १७१७ | ३ महीने | २४/०३/२०२६ ते ३०/०३/२०२६ | ३०/०३/२०२६ |
| ७ | SAMANY NIDHI | BALAUCE WORLE OF G.P. BHAWAN | ११९००० | TS NO. DE/423/2024-25 | १००० | ११९० | ३ महीने | २४/०३/२०२६ ते ३०/०३/२०२६ | ३०/०३/२०२६ |
| ८ | SAMANY NIDHI | Construction Of Cement Concret Drain | १४२००० | TS NO. DE/430/2024-25 | १००० | १४२० | ३ महीने | २४/०३/२०२६ ते ३०/०३/२०२६ | ३०/०३/२०२६ |
| ९ | SAMANY NIDHI SAMANY NIDHI | सन-२०२६-२७ करिता स्ट्रीट लाईट साहित्य सह ठेकेदारी पद्धतीने निविदा मंजूर करणे. | ३०२५०० | 2026-27 | १००० | ३०२५ | ०१/०४/२०२६ ते ३१/०३/२०२७ | २४/०३/२०२६ ते ३०/०३/२०२६ | ३०/०३/२०२६ |

**अटी व नियम** :-१) सविस्तर अटी व शर्ती ग्रामपंचायत च्या नोटिस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहे.
२) ग्रामपंचायत ने कोणतेही कारण न देता प्राप्त निविदा पैकी कोणतेही किवा सर्व निविदा फेटाळण्याचा अधिकार राखून ठेवीत आहे.
३) अमानत रक्कम व निविदा फी प्रत्यक्ष कार्यालयात येऊन भरणा करावा

**स्वा.**
**ग्राम पंचायत अधिकारी**
**ग्रा. पं. नांदगाव (बोर)**

**स्वा.**
**प्रशासक ग्रा. पं. नांदगाव (बोर)**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय



## विधान भवनातून

### नागपूर पीएम ई-बस सेवा चालक वाहकांचे प्रशिक्षण न्यायालयाच्या निर्देशानुसार

**मुंबई/प्रतिनिधी :** नागपूर येथील पीएम ई बस सेवा योजनेअंतर्गत नागपूर शहरासाठी १५० बस मंजूर असून या बस साठी चालक व वाहकांचे प्रशिक्षण मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या निर्देशानुसार घेतले जाईल, असे उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत यांनी विधान परिषदेत सांगितले. सदस्य अमित गोरखे यांनी या विषयी विधान परिषदेत प्रश्न उपस्थित केला होता.मंत्री डॉ. उदय सामंत म्हणाले, ई-बस सेवेला राज्य शासनाने प्राधान्य दिले आहे. पीएम ई-बससेवा योजनेंतर्गत राज्यातील २२ नगरपालिकांसाठी १५५९ बसेस मंजूर आहेत. यामधील १५० बसेस नागपूरसाठी आहेत. नागपूरसाठी मंजूर बस सुरू करण्याची कार्यवाही सुरू असल्याचेही मंत्री डॉ. उदय सामंत यांनी सांगितले.

### नवी मुंबई विमानतळ परिसरातील नागरी सुविधांबाबत बैठक

**मुंबई/प्रतिनिधी :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरातील नागरी सुविधाबाबत बैठक घेण्यात येईल अशी माहिती मंत्री डा.उदय सामंत यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली.याबाबत सदस्य सत्यजित तांबे यांनी प्रश्न उपस्थित केला. तर सदस्य सचिन अहिर यांनी उपप्रश्न उपस्थित केला.मंत्री डा.उदय सामंत म्हणाले, मुंबईतील देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय विमानतळांवरील वाढता ताण कमी करण्यासाठी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाची उभारणी करण्यात आली आहे. विमानतळाशी जोडणी अधिक मजबूत करण्यासाठी मेट्रो आणि रस्ते प्रकल्पांवर भर दिला जात आहे. या विमानतळ परिसरातील नागरी सुविधांचा विकास टप्याटप्प्याने सुरू असून प्रवाशांना अधिक सुलभ सेवा उपलब्ध करून देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. ज्या ठिकाणी काही उणीवा आहेत, त्या दूर करण्यासाठी संबंधित विभागांमध्ये समन्वय वाढवून आवश्यक निर्णय घेतले जात असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

### वणीच्या सर्वांगीण विकासासाठी टीपी योजनेतून मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधा

**मुंबई/प्रतिनिधी :** यवतमाळ जिल्ह्यातील वणी शहराचे झपाट्याने वाढ होत आहे. वणी शहराचा नियोजनबद्ध व सर्वांगीण विकास साधण्यासाठी टाउन प्लॅनिंग (टीपी) योजना प्रभावी ठरत आहे. या माध्यमातून पायाभूत सुविधा मोठ्या प्रमाणात उभारल्या जात असल्याची माहिती राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी विधानसभेत दिली.या अनुषंगाने सदस्य संजय देरकर यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती. या चर्चेत सदस्य राजेश पवार यांनी सहभाग घेतला.राज्यमंत्री श्रीमती मिसाळ यांनी सांगितले की, टीपी योजनेद्वारे रस्ते, दवाखाने, बगीचे, मैदाने, ईडब्ल्यूएस गृहनिर्माण आदींसाठी आवश्यक जागा उपलब्ध होत असून नगरपरिषदेला विनामूल्य क्षेत्रही मिळाले आहे. टीपी योजनांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला असून वणी नगरपरिषदेस विशेष साहाय्य व अमृत योजनेतूनही मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. राज्य शासनाकडून पायाभूत सुविधांसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर असून विविध कामे सुरू आहेत. भविष्यातही आवश्यक निधी देण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

### टीबी निदानासाठी आवश्यक काट्रिजेसचा दुप्पट साठा उपलब्ध

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई महानगरपालिका क्षेत्रात क्षयरोग निदानासाठी आवश्यक असलेल्या काट्रिजेसचा पुरेसा साठा उपलब्ध असून कोणतीही टंचाई नसल्याची माहिती मंत्री उदय सामंत यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. याबाबत सदस्य पंकज भुजबळ यांनी प्रश्न उपस्थित केला. मंत्री डॉ.उदय सामंत म्हणाले, राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत २०२२ ते २०२५ या कालावधीत मुंबईत १ लाख ७५ हजार चाचण्या करण्यात आल्या. या काळात टीबीचे प्रमाण ११ टक्क्यांवरून ८ टक्क्यांपर्यंत खाली आले. तसेच औषध-प्रतिरोधक टीबी रुग्णांच्या उपचारासाठी बीपाल्म उपचार पद्धतीही कार्यान्वित करण्यात आली आहे.सीबी-नॅट आणि ट्रू-नॅट या दोन्ही चाचण्या क्षयरोग निदानासाठी समान स्वरूपाचे कार्य करीत असल्याने, तसेच आवश्यकतेनुसार थुंकी तपासणी आणि स्पुटम स्मिअर मायक्रोस्कोपी नियमितपणे केली जात असल्याने निदान प्रक्रियेत कोणताही विलंब झाला नाही. पर्यायी सुविधा उपलब्ध करून रुग्णांचे वेळेत निदान व उपचार सुरू ठेवण्यात आले. केंद्र शासनाकडून जानेवारी २०२६ पासून सीबी-नॅट काट्रिजेसचा पुरवठा पुन्हा नियमितपणे सुरू झाला असून मुंबई महानगरपालिका क्षेत्रात आता कोणतीही कमतरता नसल्याचे मंत्री उदय सामंत यांनी स्पष्ट केले.

### स्कायवॉकच्या दोन्ही बाजूस सरकते जिने

**मुंबई/प्रतिनिधी :** वांद्रे पूर्व ते म्हाडा कार्यालय येथील स्कायवाकच्या दोन्ही बाजूस सरकते जिने लावण्यात येतील, असे उद्योग मंत्री डा. उदय सामंत यांनी विधान परिषदेत सांगितले. सदस्य अड. अनिल परब यांनी या विषयी विधान परिषदेत प्रश्न उपस्थित केला होता. मंत्री डा.उदय सामंत म्हणाले, वांद्रे पूर्व ते म्हाडा कार्यालय येथील स्कायवाक काम पूर्ण झाले असून हा स्कायव?क २६ जानेवारी २०२६ पासून वापरासाठी खुला करण्यात आली आहे. या मार्गावरून लोकांची ये-जा सुलभरित्या सुरू झाली असल्याचे त्यांनी सांगितले. तथापि अड. अनिल परब यांनी मागणी केल्यानुसार या स्कायवाकच्या दोन्ही बाजूला सरकते जिने लावण्यात येतील, असे मंत्री डा. सामंत यांनी सांगितले.

### निरा देवधर प्रकल्पातून 43 हजार हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार

**मुंबई/प्रतिनिधी :** निरा देवधर प्रकल्पामुळे भोर, खंडाळा, फलटण आणि माळशिरस या चार तालुक्यांतील एकूण ४३,०५० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे अशी माहिती जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी विधानसभेत दिली.आमदार उत्तमराव जानकर यांनी याबाबतची लक्षवेधी उपस्थित केली होती. मंत्री डॉ. विखे पाटील यांनी स्पष्ट केले की, निरा देवधर आणि गुंजवणी धरणाचे कालवे पूर्ण होईपर्यंत समन्यायी तत्त्वावर तात्पुरत्या स्वरूपात पाणी वाटप मंजूर करण्यात आले आहे. माळशिरस तालुक्यातील १६ दुष्काळग्रस्त गावांसाठी सहकारी उपसा सिंचन योजनेऐवजी आता शासकीय उपसा सिंचन योजना राबवण्यात येणार आहे. २७ ऑक्टोबर २०२५ च्या शासन निर्णयानुसार याला मंजुरी मिळाली असून, सध्या या कामाचे सर्वेक्षण क्षेत्रीय स्तरावर प्रगतीपथावर आहे. लवकरच याचा समावेश सुधारित प्रशासकीय मान्यता अहवालात केला जाईल. मंत्री डा. विखे पाटील म्हणाले की, निरा देवधर मुख्य कालव्याचे १ ते ६५ कि.मी. पर्यंतचे काम पारंपारिक पद्धतीने पूर्ण झाले असून २०१६-१७ पासून नियमित पाणी सोडले जात आहे.

### म्हाडा लोगो गैरवापरप्रकरणी गुन्हा दाखल करण्याचे आदेश

**मुंबई/प्रतिनिधी :** म्हाडाच्या लोगोच्या गैरवापरप्रकरणी संबंधित विकासकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याचे आदेश म्हाडाचे उपाध्यक्ष यांना देण्यात येतील असे मंत्री शंभूराज देसाई यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले. याबाबत सदस्य प्रसाद लाड यांनी प्रश्न उपस्थित केला. तर सदस्य अनिल परब, प्रविण दरेकर यांनी उपप्रश्न उपस्थित केले. मंत्री शंभूराज देसाई म्हणाले, म्हाडाच्या नाव व बोधचिन्हाचा वापर केवळ विशिष्ट दोन प्रकल्पांच्या जाहिरातीपुरताच सशर्त परवानगीने करण्यात आला होता. मात्र, त्याव्यतिरिक्त इतर प्रकल्पांमध्येही लोगोचा वापर झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर म्हाडाकडून संबंधित विकासकांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली. सद्यास्थितीत इतर कोणत्याही प्रकल्पात म्हाडाच्या लोगोचा वापर होत नसल्याचे संबंधित विकासकांनी लेखी कळविले असून, तसे म्हाडा प्राधिकरणानेही स्पष्ट केले आहे. अनधिकृत लोगो वापर झाल्याच्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर या प्रकरणात चौकशीअंती जे निष्कर्ष समोर येतील, त्यानुसार संबंधितांवर पुढील कारवाई केली जाईल.

# रुपाली चाकणकर अशोक खरातच्या जास्त जवळ गेल्या

**मुंबई/प्रतिनिधी :** नाशिकचा भोंदूबाबा अशोक खरातविरोधात आजही राज्यभर तुफान चर्चा झाली. त्याने केलेल्या कारनाम्याविषयी त्याच्यावर प्रचंड टीका होत आहे. दरम्यान, यावरून राजकीय नेत्यांनी प्रचंड चिखलफेक केली. अर्थसंकल्पीय अधिवेशात दोन्ही सभागृहांमध्ये विरोधी पक्षांतील नेत्यांनी हा मुद्दा उचलून धरला होता. तर, सभागृहाबाहेरही नेत्यांनी यावर आपली मते प्रदर्शित केली. दुसरीकडे सातारा जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या आणि उपाध्यक्ष पदाच्या निवडणुकीवरून प्रचंड गोंधळ झाला. आज दिवसभरात या प्रकरणांवरून नेते मंडळींनी दिलेल्या प्रतिक्रिया पाहुयात.



**स्वतःला वाघ म्हणून घेणारे शेपटी घालून बसलेत - अनिल परब**

सत्ताधारी मंत्री म्हणजेच सरकार पोलिसांचा मार खात आहे. मंत्रीच मार खात आहेत, तर सामान्य नागरिकांना काय न्याय देणार आहात? काही वर्षांपूर्वी आमचा स्वाभिमान दुखावला गेला. अजित पवार आम्हाला निधी देत नाही. आम्ही वाघाचे बच्चे आहोत म्हणून बाहेर पडला. आता मार खाल्ला तरी भारतीय जनता पक्षाचे नाव घ्यायला घाबरता. कुठे गेला तुमचा स्वाभिमान. शिवसेना शिंदे गटासह राष्ट्रवादी कॉंग्रेसचे मंत्री मार खात असतील तर संरक्षण कोण कुणाचे करणार ? स्वतःला वाघ म्हणून घेणारे शेपटी घालून बसले आहेत. आज शहीद दिन आहे. सत्ता सोडा. सत्तेला लाथ मारून बाहेर पडा, असे आव्हान परब यांनी दिले.

**रुपाली चाकणकर अशोक खरातच्या जास्त जवळ गेल्या होत्या - जितेंद्र आव्हाड**

परमेश्वराने मला वाचवलं. अनेकवेळा मला आमंत्रण आलं होतं, अनेकांनी मला सांगितलं तिथे जाउन येउया. पण माझी गाडी तिथे कधी वळली नाही, नाहीतर माझा फोटो पहिला दाखवला असता. बाकीचे राहिले असते लांब. महाराष्ट्र वेगळ्या ढाच्यातून गेलाय. बुद्धांचं नाव घेतो तेव्हा बुद्ध एका व्यवस्थेविरुद्ध लढले. भेदभावाविरोधात लढले, महावीर जैन, बसवेश्वर आण्णा, ज्ञानेश्वर महाराज, महात्मा फुले, शिवाजी महाराज लढले. हे सर्व अनिष्ट प्रथेविरोधात लढले. पण गेल्या काही वर्षांत काळ्या जादूला महाराष्ट्रात राजाश्रय मिळाला. अशोक खरात हा एप्स्टिनचा बाप आहे. त्याला तिथे राजाश्रय मिळाला अन् यालाही. रुपाली चाकणकर त्याच्या जास्तच जवळ गेल्या होत्या. त्यांचे घरगुती संबंध होते. पण महत्त्वाच्या पदावर असल्यावर भोगावं लागतं. ते त्यांना भोगावं लागलं, असं जितेंद्र आव्हाड म्हणाले.

### अशोक खरातचे कारनामे सुरु असताना फडणवीस झोपा काढत होते का? - हर्षवर्धन सपकाळ

नाशिकचा विकृत भोंदूबाबा अशोक खरात याचे प्रकरण आपणच बाहेर काढले अशा फुशारक्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मारत आहेत. मुख्यमंर्त्याच्या प्रत्येक शब्दात अहंकार ठासून भरलेला दिसतो. फक्त मलाच ज्ञान, बुद्धी आहे असा त्यांचा समज असून इतर सर्वांना ते मुर्ख समजतात. मुळात एपस्टीन फाईल्सवरून लक्ष भरकटवण्यासाठी अशोक खरात फाईल उघडण्याचा त्यांचा कांगावा असावा. भोंदू अशोक खरात प्रकरण होउच कसे दिले? मागील पाच वर्षाच्या काळात फडणवीसच गृहमंत्री होते, त्यावेळी फडणवीस झोपा काढत होते का? असा प्रश्न कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

### भाजपाबरोबरच्या युतीत आम्हाला काही कटू अनुभव आले शंभूराज देसाई यांचे मोठे वक्तव्य

शिवसेना प्रमुख स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे, अटल बिहारी वाजपेयी यांनी केलेली शिवसेना-भाजपा युती टिकवावी म्हणून आम्ही ती भूमिका घेतली. आता त्या युतीमध्ये आम्हाला कालच्या सारखे काही कटू अनुभव आले. पण ते सोडून द्या. ते योग्य त्या व्यासपीठावर आम्ही मांडू आणि ते दुरुस्त देखील होतील. पण अशा पद्धतीने आम्हाला कुठेही डिवचण्याचा प्रयत्न करू नका. आम्ही वस्तुस्थिती निदर्शनास आणली याचा अर्थ आम्ही हदबल आहोत असं नाही-, असं शंभूराज देसाई यांनी स्पष्ट केलं आहे.

### वित्तीय स्वरूपाच्या पदासाठी कोणतीही पदवी ग्राह्य-राज्यमंत्री आशिष जयस्वाल

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील विविध शासकीय व निमशासकीय कार्यालयांमधील वित्तीय स्वरूपाच्या जबाबदारीच्या पदांसाठी केवळ वाणिज्य शाखेची अट न ठेवता कोणतीही पदवी ग्राह्य धरण्याचा निर्णय गुणवत्ताधारक उमेदवार मिळावेत आणि रिक्तपदे भरली जावीत, यासाठी घेण्यात आल्याचे राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले. याबाबत सदस्य निरंजन डावखरे यांनी प्रश्न उपस्थित केला. राज्यमंत्री आशिष जयस्वाल म्हणाले, २०१२ पूर्वी अशा पदांसाठी कोणतीही विशिष्ट शाखेची अट नव्हती. मात्र, २०१२ नंतर अटी घालण्यात आल्या. त्यानंतरच्या काळात गुणवत्ता असलेले उमेदवार पुरेशा प्रमाणात मिळत नसल्याने, अनेक पदे रिक्तराहत असल्याचे निदर्शनास आले. भारताचे लेखा नियंत्रक व महालेखापाल, आयआरएस, जीएसटी यांसारख्या इतर महत्त्वाच्या सेवांमध्ये वाणिज्य शाखेची सक्ती नसल्याचा दाखला देत, राज्यानेही त्या धर्तीवर धोरण अवलंबल्याचे त्यांनी नमूद केले. संबंधित पदांवरील काम केवळ अकाउंटिंगपुरते मर्यादित नसून ते सर्वसमावेशक कार्यालयीन कामकाजाशी संबंधित असल्याने विविध विषयांचे ज्ञान असलेले उमेदवार आवश्यक ठरतात, असेही त्यांनी स्पष्ट केले. सद्य?स्थितीत महाराष्ट्र लेखा व कोषागारे संचालनालयांतर्गत, सामान्य प्रशासन विभागाच्या नियमानुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरली जाणारी कनिष्ठ लेखापाल आणि लिपिक-टंकलेखक हीच गट-क संवर्गातील पदे आहेत, ज्यासाठी सेवाप्रवेश नियमांत बदल करून कोणतीही पदवी ही शैक्षणिक अर्हता करण्यात आली आहे, असे त्यांनी यावेळी सांगितले.

**गुणवत्ताधारक उमेदवार मिळावेत यासाठी निर्णय**

### चंद्रपूरमधील सहकारी संस्थांतील धान खरेदी व्यवहारांची चौकशी - मंत्री छगन भुजबळ

**मुंबई/प्रतिनिधी :** किमान आधारभूत किंमत (एमएसपी) योजनेअंतर्गत शेतक-यांच्या हितासाठी केंद्र व राज्य शासनामार्फत धान खरेदी केली जाते. या प्रक्रियेत शेतक-यांना हमीभाव मिळावा आणि त्यांची फसवणूक होउ नये यासाठी यंत्रणा कार्यरत आहे. तसेच चंद्रपूरमधील धान खरेदीबाबत सहकारी संस्थातील व्यवहारांची प्रधान सचिव सहकार,पणन व वस्त्रोद्योग आणि महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्या. मुंबई यांच्याकडून चौकशी करण्यात येत असल्याची माहिती अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी दिली. आमदार रामदास मसराम यांनी याबाबत लक्षवेधी यावेळी उपस्थित केली होती. मंत्री छगन भुजबळ म्हणाले की, किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत केंद्र शासन निरनिराळ्या पिकांच्या किमान आधारभूत किमती जाहिर करते. आधारभूत किमतीचा लाभ शेतक-यांना होण्याच्या दृष्टीने व त्यांना हमी भावापेक्षा कमी किमतीने धान्य विकावे लागू नये, म्हणून राज्य शासनातर्फे धानाची, भरडधान्याची (ज्वारी, बाजरी, मका व रागी) खरेदी करण्यात येते. गडचिरोली जिल्ह्यामध्ये जिल्हा पणन कार्यालय व प्रादेशिक व्यावस्थापक कार्यालय गडचिरोली व उप प्रादेशिक व्यवस्थापक कार्यालय अहेरी यांच्यामार्फत योजनेची अंमलबजावणी केली जाते. मंत्री छगन भुजबळ म्हणाले की, सन २०२१-२२ मध्ये आरमोरी तालुक्यातील मौजा कासावी व आप्टा येथे बनावट सातबाराद्वारे बोगस शेतक-यांकडून धान खरेदी करून शासनाची फसवणूक केल्याबद्दल उपायुक्त (पुरवठा) नागपूर विभाग यांच्याकडे तक्रार प्राप्त झाली होती. यानुषंगाने गडचिरोली जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था यांच्या स्तरावर समिती नियुक्त करून चौकशी करण्यात आली. या चौकशी समितीच्या अहवालामध्ये धान खरेदीमध्ये कोणत्याही प्रकारची अनियमितता आढळून आली नाही.याच प्रकरणी जिल्हाधिकारी, गडचिरोली यांनी दि.१६ एप्रिल २०२५ रोजी उपविभागीय अधिकारी, देसाईगंज यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमली होती. या समितीच्या अहवालात या प्रकरणी कोणत्याही प्रकारची विसंगती आढळली नाही. मंत्री छगन भुजबळ म्हणाले की, चामोर्शी तालुक्यात भूमीहीन व अल्पभूधारक शेतक-यांच्या नावे ५ एकर जमीन दाखवून सरसकट बोनस देण्यात आल्याच्या अनुषंगाने प्राप्त तक्रारींबाबत जिल्हाधिकारी, गडचिरोली यांनी उपविभागीय अधिकारी, चामोर्शी यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमली होती. या समितीच्या अहवालामध्ये खरेदी विक्री संस्था चामोर्शी यांची भूमिका संशयास्पद आहे असे आढळले आहे. या अनुषंगाने दिनांक ३० एप्रिल २०२५ रोजी संबंधित संस्थेवर गुन्हा नोंद करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून जिल्हा पणन अधिकारी यांना कळविण्यात आले.



### अवैध खनिज उत्खननावर कडक कारवाई; ३ महिन्यांत सर्वेक्षण करुन दोषींवर कारवाई करणार

**मुंबई/प्रतिनिधी :** भिवंडी परिसरासह रायगड, पालघर जिल्ह्यात सुरू असलेल्या बेकायदा खनिज उत्खनन व तस्करीविरोधात कडक कारवाई करण्यात येत आहे. पुढील तीन महिन्यांत मागील पाच वर्षांतील परवानग्यांची चौकशी करून अनियमितता आढळल्यास संबंधितांवर दंड, व्याज आणि फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येतील. तसेच संबंधित अधिकारी दोषी आढळल्यास त्यांच्यावरही कठोर कारवाई केली जाईल, अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत दिली. भिवंडी व परिसरात तसेच रायगड, पालघर जिल्ह्यात बेकायदा खनिज उत्खनन व तस्करीमुळे शासनाच्या महसूलाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. याबाबत तत्काळ चौकशी व कारवाईच्या मागणीबाबत विधासभेत सदस्य सुनील प्रभू यांनी लक्षवेधी सूचना मांडली. या चर्चेत सदस्य दिलीप लांडे, राजू खरे, नाना पटोले यांनी सहभाग घेतला.महसूलमंत्री बावनकुळे म्हणाले की, बेकायदा खाणकाम व स्टोन क्रशर प्रकल्पांवर तत्काळ बंदीची कारवाई सुरू करण्यात आली आहे. संबंधित ठिकाणी गुन्हे नोंदविणे, दंड वसुली आणि अवैध साठा जप्त करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.खननासाठी आवश्यक असलेले खाणपट्टा, पर्यावरण परवाना, स्फोटक वापर परवाना, ग्रामपंचायतीचा ना हरकत दाखला आदी नियम अनेक ठिकाणी पाळले जात नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे जीपीएस व मॅपिंगद्वारे अचूक माहिती संकलित करून अवैध उत्खननाचा संपूर्ण आढावा घेण्यात येणार आहे.ज्या ठिकाणी परवानगी नसताना खाणकाम व स्टोन क्रशर सुरू आहेत, ती तत्काळ बंद करण्यात येतील. जिल्हाधिका-यांना थेट जबाबदारी देण्यात आली असून, अवैध साठेही जप्त केले जातील. आवश्यक परवानग्या, पर्यावरण मंजुरी, मायनिंग प्लॅन, स्फोटक परवाना, ग्रामपंचायतीचा ना हरकत दाखला न घेतलेल्या प्रकल्पांवर कठोर कारवाई केली जाईल, असेही मंत्री बावनकुळे यांनी यावेळी सांगितले.



### रामगिरी येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शहिदांना अभिवादन

**नागपूर:** शहीद दिनानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रामगिरी या शासकीय निवासस्थानी शहीद भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

## खरातचा पाय खोलात !





**मुंबई/प्रतिनिधी :** स्वयंघोषित भोंदूबाबा अशोक खरात याच्यावरील नव्या आरोपांमुळे पाथर्डीत संतापाची लाट उसळली आहे. खरातसोबत जमिनीचा व्यवहार केल्यानंतर आपला मुलगा बेपत्ता झाला असल्याचा दावा एका स्थानिक शेतक-याने केला आहे. खरातवर आधीच लैंगिक शोषण आणि जादुटोण्याच्या (अघोरी विद्या) प्रयोगांचे अनेक आरोप असून त्याची चौकशी सुरू आहे त्यातच या नव्या तक्रारीमुळे तपासाची तीव्रता अधिक वाढली आहे. नाशिकच्या पाथर्डी परिसरातील शिवाजी ढगे या शेतक-याने आरोप केला आहे की, त्यांनी खरातला आपली जमीन विकली आणि नेमक्या त्याच दिवसापासून त्यांचा मुलगा बेपत्ता आहे. ढगे म्हणाले की, आपल्या मुलावर नेमका काय प्रभाव टाकला गेला हे आपल्याला माहिती नाही मात्र जमिनीचा व्यवहार आणि मुलाचे बेपत्ता होणे या दोन्ही घटना एकाच वेळी घडल्याचा त्यांचा दावा आहे.

त्यांनी खरातवर असाही आरोप केला आहे की, त्यांनी अनेक शेतक-यांकडून पूर्ण पैसे न देता त्यांच्या जमिनी हडप केल्या आहेत. स्थानिक रहिवाशांच्या म्हणण्यानुसार, खरातने आपल्या सर्व जमिनींना कुंपण घातले असून तो फक्त अमावस्या आणि पौर्णिमा या विशिष्ट दिवशीच तिथे भेट देत असे. या भेटीदरम्यान दीपक लोंढे नावाचा एक एजंट अनेकदा त्यांच्या सोबत दिसायचा. ग्रामस्थांच्या आरोपांचे स्वरूप अत्यंत गंभीर असल्यामुळे खरातभोवती तपासाचा फास आणखी आवळला जाण्याची शक्यता आहे. कारण या प्रकरणाच्या सर्व अंगांनी सखोल चौकशी करण्यासाठी प्रशासनावर मोठा दबाव वाढत आहे. अशोक खरात आणि त्यांचा कार्यालयीन सहकारी नीरज जाधव यांची समोरासमोर चौकशी करण्यात आली. चौकशी दरम्यान माहिती लपवण्यावरून दोघांमध्ये पोलिसांसमोरच शाब्दिक चकमक उडाल्याचे समजते. तपासादरम्यान आणखी एक महत्त्वाचा दुवा समोर आला आहे. नीरज जाधव याच्या काल डिटेल रेकार्डस्मधून ३० ते ४० महिलांचे संपर्क क्रमांक उघड झाले आहेत. एसआयटीने मोठी कारवाई करत खरात यांच्या ईशानेश्वर मंदिराशी संबंधित ३ व्यक्तींना ताब्यात घेतले आहे.

त्यामध्ये मंदिराचा पुजारी आणि दोन कर्मचा-यांचा समावेश आहे. खरात याच्या फार्महाउसवर नेमके कोणते प्रकार चालत होते आणि कोणत्या कारणासाठी लोकांना तिथे आणले जात होते, याचा तपास अधिकारी करत आहेत. यातून श्रद्धेच्या नावाखाली नेमके काय चालले होते, याचा पर्दाफाश होउ शकेल. दरम्यान सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी आरोप केला आहे की, तत्कालीन जलसंपदामंत्री जयंत पाटील यांनी खरात यांना अवाजवी सवलती दिल्या असून या प्रकरणी जयंत पाटील यांचीही चौकशी झाली पाहिजे. एसआयटीने खरात याच्या केबिनमधून द्रव पदार्थ, ग्लास, बाटल्या आणि इतर यंत्रसामुग्रीसह मूळ पुरावे तपासासाठी जप्त केले आहेत. खरात याच्या विरोधात आणखी एका पीडित महिलेने तक्रार दाखल केली आहे. मोठमोठ्या लोकांसोबत खरातचे उठणे-बसणे असल्यामुळे त्याच्यावर होणा-या आरोपांवर कुणाचा विश्वास बसला नसता; पण थेट व्हीडीओ समोर आल्याने त्याचे खरे रुप बाहेर आले. पीडित महिलेने दिलेल्या तक्रारीनुसार, खरातने तिच्यावर वारंवार अत्याचार केले.खरात अघोरी कृत्य करायचा आणि धमक्या द्यायचा. धक्कादायक बाब म्हणजे, ही पीडित महिला जेव्हा उपचारांसाठी येत असे तेव्हा खरात तिच्या पतीला बाहेर बसवून आतमध्ये पूजा-विधीच्या नावाखाली तिचे लैंगिक शोषण करत होता. भाविकांना घाबरवण्यासाठी तो नकली साप आणि वाघाच्या कातडीचा वापर करून अघोरी कृत्य करीत असल्याचा उल्लेख पीडितेने तक्रारीत केला आहे. जर या प्रकरणाची कुठेही वाच्यता केली तर पीडिता आणि तिच्या कुटुंबाला जीवे मारण्याची धमकीही त्याने दिली होती. तांत्रिक विद्या अवगत असल्याचा दावा करणा-या बुवाभोवती राजकारणी लोकांची गर्दी नवी नाही. तंत्रज्ञानाऐवजी तंत्रमंत्राच्या मागे धावण्याचे प्रकार स्तंभित करणारे आहेत. एकीकडे पुरोगामी महाराष्ट्राचा अभिमान मिरवायचा आणि दुसरीकडे बुवाबाबांच्या पायावर डोके ठेवत त्यांचे उद्दात्तीकरण करायचे हा नेत्यांचा दांभिकपणा जनता पाहत आली आहे. खरात याला गुरू मानणा-या रुपाली चाकणकर त्याचे पाय धुतानाची प्रसारित झालेली छायाचित्रे आणि व्हीडीओ अतिशय धक्कादायक आणि लाजीरवाणे आहेत. ही छायाचित्रे एका राजकीय पक्षाचे महत्त्वाचे पद भूषवणा-या चाकणकर यांची बुरसटलेली मानसिकताच दाखवत नाही तर आपल्या अशा वर्तनामुळे ढोंगी बुवाला समाजात प्रतिष्ठा मिळते इतकीही समज त्यांना नसल्याचे स्पष्टपणे दिसते.

चाकणकर या केवळ राजकारणीच नव्हे तर अन्यायग्रस्त महिलांना न्याय मिळवून देण्याची जबाबदारी असलेल्या राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षाही होत्या. आता हे प्रकरण भोवल्याने त्यांना पदावरून पायउतार व्हावे लागले असले तरी या प्रकरणाचे गांभीर्य तसूभरही कमी होत नाही. प्रगल्भता नसलेल्या अशा महिला नेत्याला पक्षाने आजवर महत्त्वाची पदे दिलीच कशी? अशा निर्णयामुळे महिला आयोगाच्या अध्यक्ष पदासारख्या पदांना न्याय देण्याची क्षमता असलेल्या अन्य कर्तबगार महिला कार्यकर्त्यांवर अन्याय झाला आहे. महिलांवरील हिंसाचाराचे निर्मूलन हे महिला आयोगाने निश्चित केलेले मुख्य लक्ष्य आहे. ढोंगीपणासोबत जेव्हा लैंगिक गुन्हे करणा-या बुवांना राजकारणी शरण जातात तेव्हा ती बाब समाजाच्या दृष्टीने अधिकच गंभीर असते. देशभरात बुवा आणि राजकारण्यांची युती जनसामन्यांना मूर्ख बनवत आहे आणि जनताही आनंदाने बनत आहे. आसाराम बापू आणि राम रहिम यासारख्या बाबांचे उद्धाहरण आपल्यासमोर आहे. अमृत काळाची चर्चा होत असताना दुसरीकडे समाजाला शतकानुशतके मागे नेणा-या अशा घटना घडत आहेत ही दुर्दैवाची गोष्ट म्हणावी लागेल.नेहमीप्रमाणे आता राजकारणी खरात प्रकरणापासून आपले अंग झटकतील आणि नामानिराळे राहण्याचा प्रयत्न करतील. तपास पथकाने खरातला प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मदत करणा-यांचे बुरखे फाडले पाहिजेत तरच अशा प्रकरणांना आळा बसू शकेल. दैवी शक्ती असल्याचा दावा करून अनेक महिलांचे लैंगिक शोषण केल्याचा आरोप असलेल्या भोंदूबाबा अशोक खरातला कोणत्याही परिस्थितीत सोडले जाणार नाही, त्याच्यावर कठोर कारवाई होईल, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे. या प्रकरणात हवेत बोलण्यात काहीही अर्थ नाही. अशोक खरात हे गंभीर प्रकरण आहे. आम्हीच गुप्त माहितीच्या आधारे या प्रकरणाचा भांडाफोड केला, असे मुख्यमंत्री म्हणाले. राज्यात दिवसेंदिवस महिला आणि मुलींवरील अत्याचारांत वाढ होत आहे. हा महाराष्ट्र शिवरायांचा आहे त्यामुळे खरातसारखी बलात्कारी प्रवृत्ती कायमची मोडून काढायला हवी.

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# पापभिरू 'कॅप्टन'

एखाद्याचे बिंग फुटले, नको त्या प्रकरणात कोणी अट्टल पकडला गेला, तर त्याचे 'पापाचे शंभर घडे भरले' असे म्हणण्याची पूर्वी प्रथा होती. कलियुगात हा शंभर पापांचा आकडा हजारांपर्यंत गेला असावा. अन्यथा, 'कॅप्टन' या खोट्या नामाभिधानाने वावरणाऱ्या सिन्नरच्या अशोक खरातचे बिंग फुटायला इतके दिवस लागले नसते! राजकारणी आणि वरिष्ठ-अतिवरिष्ठ अधिकाऱ्यांचे पांघरुण असूनही अशोक खरातचे बिंग फुटले ते नीरज जाधव नावाच्या त्याच्याच निकटच्या सहाय्यकाकडून. नीरजला ही उपरती सुविचारांतून झाली नाही. पापात खरात आपल्याला वाटेकरी करून घेत नाही, या रागातून त्याच्या हातून या प्रकरणाचा भांडाफोड झाला. पोलिसांकडील माहितीनुसार, या प्रकरणाचा पोलखोल होण्याला खरा कारण नीरज नाहीच. जमीन खरेदीच्या व्यवहारात ज्या अधिकाऱ्यांना खरातने आपले भागीदार केले होते, त्यापैकी दोघा अधिकाऱ्यांना आपल्या मापात पाप होत असल्याचा संशय आला, म्हणून त्यांनी या 'बाबा'चे बिंग फोडण्यासाठी त्याच्या कार्यालयात छुपे कॅमेरे लावले आणि त्यातून पुराव्यासह हजार नऊशे गैरप्रकार उघड झाले. लक्षात घ्या, पाप करणारा, पापात वाटा मागणारा, पापातही आपल्या मापात पाप होत आहे म्हणून 'बाबा'ला वठणीवर आणण्यासाठी छुप्या कॅमेऱ्यांचा डाव लावणारा यापैकी कोणालाही आपण सहभागी असलेल्या 'बाबा'च्या कृत्यांबद्दल शरम नव्हती, त्यांच्या मनात त्याबाबत किंचितही अपराधी भावना नव्हती. त्यांची तक्रार व्यावहारिक होती. 'व्यवहारा'त आपल्यावर अन्याय होतो आहे; तो अन्याय दूर करण्यासाठी 'बाबा'चे 'कार्यकर्तृत्व' उजेडात आणण्याची धमकी देऊन पापातला आपला वाटा वाढवून घेण्याचा त्यांचा अगदी सरळसाधा उद्देश होता! यातून सगळ्याचाच पर्दाफाश होईल, याची कल्पना त्यांनाही नव्हती. आज हे प्रकरण महाराष्ट्रात ज्या गांभीर्याने चर्चिले जात आहे, त्याने तेही अचंबित झाले असतील. 'बाबा'ची मनातल्या मनात क्षमा मागत असतील! त्यामुळे, जे घडले, त्याचा दोष एकट्या 'बावा'चा नाही. या सगळ्यांचाच आहे. 'बाबा'शी दीर्घकाळ संबंध असलेले जे कोणी असतील, त्या सगळ्यांनाच या प्रकरणात सहआरोपी करण्याची मागणी या अर्थाने अगदी योग्य आहे. हे प्रकरण उघड केले गेले, बरोबर वर्षभरापूर्वी. शिर्डीतील पत्रकार दत्तात्रय खेमनर यांच्याकडून. त्यांनी त्यांच्या नियतकालिकात याबाबत लिहिले, तेव्हां 'बाबा'च्या परमभक्त, 'बाबा'च्या संस्थेच्या विश्वस्त, महिला आयोगाच्या तत्कालीन आणि राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या विद्यमान अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी महिला आयोगाच्यावतीने खेमनर यांना नोटीस पाठवली होती. बाबा आणि चाकणकर यांचे संबंध किती घनिष्ठ आहेत, याचे पुरावे समाज माध्यमांवर फिरत आहेतच. पण, 'बाबा'च्या कारनाम्यांवर पांघरुण घालण्याचे काम चाकणकर किती इमानेइतबारे करत होत्या, हे त्यावरून स्पष्ट होते. तपास यंत्रणांनी या बाबीची नोंद घेतली पाहिजे. 'बाबा'चा अनुग्रह प्राप्त व्हावा आणि आपल्या राजकारणाला बरकत यावी, यासाठी राज्यातले मोठमोठे मंत्री, नेते या 'बाबा'च्या मंदिरात संस्थानात वारंवार पायधूळ झाडत होते, हे आता जगजाहीर झालेच आहे. कोणीही राजकारणी नेता इतक्या सहजासहजी, 'प्रयोग' म्हणून कोणाचा गंडा बांधत नसतो. खातरजमा करून, परिणामांची खात्री घेऊन, आधीच्या भक्तांचे अनुभव ऐकून राजकारणी अशा ठिकाणी जात असतात. त्यासाठी त्यांच्याकडे जोरदार शिफारशी करणारे, त्यांचे कान भरणारे, त्यांना त्यासाठी भरीस पाडणारे कोणी ना कोणी असतातच, सत्तेच्या वर्तुळाभोवती, मंत्रालय आणि त्या परिसरात अशा अनेक बाबा बुवा-ज्योतिषांचे एजंट फिरत असतात. सरकारला राजकारण्यांवर, प्रशासकांवर येणारे याचे किटाळ खरोखरच झटकायचे असेल, तर तपासात कोण कोणाच्या शिफारशीने तिथे गेला, 'ओश्नो तीर्था'च्या प्राशनाने कोणी कोणी आपले आत्मे पवित्र केले, त्या सगळ्यांनाच एका रांगेत बसवून त्यांच्याविरोधातही गुन्हे दाखल केले पाहिजेत. ज्या महिलांचे लैंगिक शोषण झाले, ज्यांना 'ब्लॅकमेल' केले गेले, ज्यांना या जाळ्यात खेचले गेले, त्या सगळ्यासाठी हे सारे उच्चपदस्थ अपराधी आहेत. अंधश्रद्धेच्या प्रकारात जे समजून उमजून सहभागी होतात, तेही तेवढेच दोषी असतात, असा कायदा महाराष्ट्र सरकारनेच केला आहे, हे महाराष्ट्र सरकारनेच लक्षात ठेवले पाहिजे ! अपराध जेवढा मोठा, पापकर्माची धास्ती जेवढी मोठी, तेवढ्या मोठ्या प्रमाणात माणसे अशा 'मठां' च्या पायऱ्या झिजवत असतात. बहुतेक जण हे गुपचूप करतात, पण या 'बाबा'च्या प्रकरणासारखी कुठून तरी प्रकाशाची तिरीप जाते, अन् सगळाच कारभार उघड्यावर येतो! या प्रकरणात अनेक उच्चपदस्थ स्त्री-पुरुष अधिकाऱ्यांची भागीदारी आहे, असे सांगितले जाते आहे. ते स्वतःला यापासून लपवण्याचा प्रयत्न करतीलच. जादूटोण्यावर ज्यांची बरीच भिस्त आहे, असे राजकारणी यातही दिसताहेत, यात नवल नाही. या सगळ्यांच्या दर्शनाने सामान्य माणसाला असे पक्क वाटते आहे, की यात फार काही होणार नाही. सगळेच एकमेकांवर पांघरुण घालण्याचा प्रयत्न करणार! जनमानसाचा हा विश्वास आत्मघातकी आहे. समाजाला त्यापासून रोखायचे असेल, तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कोणाचीही भीडभाड न बाळगता प्रकरण योग्य दिशेने शेवटाला जाईल, असे पाहिले पाहिजे. ज्याने सुरुवात केली, त्याच्याकडूनच शेवट झालेला चांगला!!

# युद्धामुळे जगभरातील शेतकऱ्यांची होरपळ

अमेरिका-इस्त्राईल आणि इराण यांच्यातील युद्धाला तीन आठवडे पूर्ण झाले आहेत. युद्ध एका आठवड्यात संपविण्याची भाषा करणारी अमेरिका या युद्धात दीर्घकाळासाठी अडकल्याचे दिसत आहे. पण दिवसागणिक या युद्धाचे जागतिक अर्थव्यवस्थेवरील घाव स्पष्ट दिसू लागले आहेत. सुरुवातीला या युद्धामुळे इंधन आणि नैसर्गिक वायू तुटवड्याचे संकट काही दिवस जाणवेल, अशी मांडणी केली जात होती. पण आता इंधन आणि नैसर्गिक वायूपासून सुरू झालेली टंचाई आता अन्नधान्यापर्यंत झिरपण्याची भीती व्यक्त केली जात आहे. युद्धाची झळ आता प्रत्यक्ष युद्धापासून अलिप्त असणाऱ्या जागतिक धान्य कोठाराला बसण्यास सुरुवात झाली आहे. मग भारत असो वा अमेरिका किंवा ब्राझील; या सर्व देशांमध्ये सध्या खत टंचाई, वाढता निविष्ठांचा खर्च आणि खतांविना उत्पादकता घटीची टांगती तलवार आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या अन्न आणि कृषी संघटनेनेही (एफएओ) युद्ध जास्त काळ चालल्यास याचे दूरगामी परिणाम जागतिक पातळीवर होऊ शकतात, असे म्हटले आहे. सध्या चीनसह उत्तर गोलार्धातील देशांमध्ये वसंत ऋतूतील पेरण्या सुरू आहेत. युद्ध लांबल्यास निविष्ठांचा खर्च वाढून अनेक देशांमध्ये पेरण्यांवर परिणाम होऊ शकतो, असेही या संघटनेने म्हटले आहे. मॉन्सूनवर अवलंबून असणाऱ्या भारतासह इतर देशांमध्ये पेरण्या येऊ घातल्या आहेत. युद्ध एप्रिलच्या शेवटपर्यंत किंवा त्यानंतर सुर राहिले तर त्याचे मोठे परिणाम केवळ भारतातच नाही तर जागतिक पातळीवर पाहायला मिळतील.

### खत भाववाढीचा शॉक

आखाती देश जागतिक खताचे भांडार म्हणून मागील काही वर्षांपासून ओळखले जात आहेत. होर्मूजमार्गे जगातील ३० टक्के खतांचा व्यापार होतो.

**अमेरिका- इस्त्राईल आणि इराण यांच्यातील युद्धामुळे जागतिक अन्नसुरक्षेलाच सुरुंग लागेल की काय, अशी भीती आता जागतिक पातळीवरील संस्था व्यक्त करू लागल्या आहेत. जगाच्या ऊर्जा भांडारामध्येच युद्धाचा भडका उडाल्याने याची धग जागतिक शेती क्षेत्रापर्यंत चोहोबाजूंनी पोहोचण्याचे संकेत मिळत आहेत. युद्धाचा एक एक दिवस संकटांचे ढग आणखी गडद करत आहे. विशेष म्हणजे अमेरिकेसह सर्वच प्रमुख देशांतील शेतकरी यात होरपळून निघत आहेत.**

आखाती देश अमोनिया आणि युरियाचे सर्वात मोठे पुरवठादार आहेत. युद्धामुळे जगाच्या ६५ ते ७० टक्के युरिया पुरवठ्यावर परिणाम होऊ शकतो, अशी भीती बँक ऑफ अमेरिकेने व्यक्त केल्याचे वृत्त रॉयटर्सने दिले आहे. कारण युरिया निर्मितीसाठी लागणारा नैसर्गिक वायू याच भागातून जातो. जागतिक पातळीवर इंधनाप्रमाणे खतांचेही साठे फारसे उपलब्ध नसतात. त्यामुळे खत टंचाईचे चटके केवळ एक किंवा दोन देशांपुरते मर्यादित राहत नाहीत, तर सर्वच देशांना त्याची झळ बसते. खत उत्पादनात चीन आघाडीवर असला तरी चीनला ४७ टक्के सल्फर खतांची आयात करावी लागते.

चीनलाही आखाती देशांमधूनच ही खते मिळतात. ब्राझील आणि अर्जेंटिना या देशांमध्ये खतांची सध्या जास्त टंचाई नाही, पण पर्याप्त साठाही नाही. ब्राझीलला खतांची आयात करावी लागू शकते, असे खुद्द त्यांच्या कृषिमंत्र्यांनी म्हटले आहे. तर बांगलादेश, सोमालिया, केनिया, पाकिस्तान हे देश खतांचा साठा ठेवत नाहीत. हे देश आखाती देशांमधून होणाऱ्या आयातीवरच अवलंबून असतात, असे 'एफएओ'ने म्हटले आहे. भारतासह आशियातील इतरही देश आयातीवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहेत. नैसर्गिक गॅस उपलब्ध नसल्याने सध्या भारत, बांगलादेश आणि व्हिएतनाममध्ये अनेक प्लांट्सनी खतांचे उत्पादन बंद केल्याचे निरीक्षणही या संघटनेने नोंदविले आहे.

आखाती देशांमध्ये युरियाचा भाव २६ फेब्रुवारीपासून ४५ टक्क्यांनी वाढला आहे. आखाती देशांमधून खतांची निर्यात थांबली आहे. खतांच्या उत्पादनासाठी आवश्यक असणारा कच्चा मालही निर्यात होत नाही. त्यामुळे खतांची टंचाई निर्माण होत आहे. परिणामी सर्वच देशांमध्ये खतांच्या किमती वाढत आहेत. अमेरिकेत खतांच्या किमती २० ते ३० टक्क्यांनी वाढल्या आहेत. तर युरोपियन महासंघातील अनेक देशांमध्येही खते ३० टक्क्यांपर्यंत महागली आहेत. जागतिक खत बाजाराला युद्धाचे हादरे बसत असताना भारतही यातून सुटणार नाही.

पण भारतात युरियाच्या किमती केंद्र सरकार अनुदान देऊन नियंत्रित करते. पण डीएपी, एमओपीसह इतर पोषणमूल्य आधारित खतांसाठी मर्यादित अनुदान दिले जाते. या खतांच्या किमती वाढणार आहेत. आता सरकार या खतांचे अनुदान वाढवते की थेट शेतकऱ्यांवर किंमतवाढीचा बोजा लादते, हे पाहावे लागेल. पण भारतीय शेतकऱ्यांपुढे दुहेरी संकट असणार आहे. 'एल निनो'मुळे यंदा कमी पावसाचे संकेत आहेत. त्यातच खत दरवाढीचा बोजा पडल्यास शेतकऱ्यांच्या समस्या वाढणार आहेत.

### महागाईचे सावट

युद्धाचा परिणाम केवळ इंधन, नैसर्गिक वायू, आयात-निर्यातीचा खर्च किंवा खतांचे भाव वाढीपर्यंत मर्यादित राहण्याची शक्यता कमीच आहे. शेती उत्पादनापासून ते शेतीमालाच्या भावापर्यंत हा परिणाम जाणविण्याची शक्यता असल्याचे अंदाज अनेक संस्थांनी व्यक्त केले आहेत. याचा सर्वाधिक फटका भारतासह आर्थिक विकास वेगाने करणाऱ्या अर्थव्यवस्थांना बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. वाढत्या इंधन आणि ऊर्जेच्या खर्चामुळे उत्पादन, वाहतूक आणि साठवण तसेच प्रक्रियेचा खर्च वाढत आहे. यामुळे सर्वच देशांमध्ये महागाई वाढण्याची शक्यता आहे.



स्टॅण्डर्ड चार्टर्ड रिसर्चच्या अहवालानुसार, विकसित देशांच्या तुलनेत ४० विकसनशील देशांमधील लोकांच्या एकूण उत्पन्नाचा वाटा खानपानावर जास्त खर्च होतो.

भारतीय लोक आपल्या उत्पन्नाच्या जवळपास ३८ टक्के खर्च खानपानावर करतात. बांगलादेशमध्ये हे प्रमाण ४५ टक्क्यांच्या दरम्यान आहे. चीनमधील लोकही ४२ टक्क्यांच्या दरम्यान खर्च करतात. महागाई वाढली तर या लोकांचे जास्त उत्पन्न खानपानावर खर्च होतील. याचा थेट परिणाम या लोकांच्या जीवनमानावर होऊ शकतो, असेही या अहवालात म्हटले आहे. महागाई वाढल्यानंतर महागाई कमी करण्यासाठी सरकारे आयात वाढवू शकतात. देशातील भाव कमी करण्यासाठी बाजारावर नियंत्रण घट्ट केले जाऊ शकते. तसेच निर्यातबंदीसारखेही निर्णय सरकार या काळात घेऊ शकते. याचा परिणाम शेतकऱ्यांच्या अर्थकारणावर होऊ शकतो, असे अभ्यासकांनी स्पष्ट केले आहे.

### धान्य कोठारावर संकटाचे सावट

जागतिक अन्नधान्य उत्पादनात भारत, चीन, ब्राझील, अमेरिका, अर्जेंटिना, ऑस्ट्रेलिया आणि युरोपियन महासंघ महत्त्वाची भूमिका पार पाडतात. पण हे देश खतांसाठी आखाती देशांवर अवलंबून आहेत. भारतासह आशियातील देशांचे अवलंबित्व जास्त आहे. ब्राझील, चीन, अमेरिका, इंडोनेशिया आणि व्हिएतनामलाही खतांचा पुरवठा या भागातून होत असतो. ब्राझीलची निम्मी खते होर्मूजमार्गे जातात. भारताचीही ४० ते ४५ टक्क खते इथूनच येतात. अमेरिकेलाही २० टक्के खतांचा पुरवठा या भागातून होतो. त्यामुळे जगाच्या धान्य कोठाराला खत पुरठ्यासाठी होर्मुजमार्गे होणारा व्यापार जागतिक अन्नसुरक्षेसाठी महत्त्वाचा आहे.

भारत जागतिक पातळीवर भात, गहू, कडधान्य आणि फळे उत्पादनात महत्त्वाची भुमिका पार पाडतो. भारताने २०२४ मध्ये जगाच्या २५ टक्के तांदूळ निर्यात केला होता. ब्राझील जागतिक निर्यातीच्या ६० टक्के सोयाबीन निर्यात करतो. तसेच साखर आणि मका निर्यातीत त्याची महत्त्वाची भूमिका आहे. युरोपियन महासंघ आणि ऑस्ट्रलियातूनही गहू तसेच इतर अन्नधान्याची निर्यात होते. इंडोनेशिया आणि मलेशिया पामतेल तसेच तांदूळ निर्यातीसाठी महत्त्वाचे आहेत. पण या देशांमध्ये खतांची टंचाई निर्माण झाली आणि खतांच्या किमती वाढल्या तर खत वापर कमी होऊन उत्पादकताही घटण्याची भीती आहे. असे झाल्यास जागतिक अन्नधान्य उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याचा फटका अन्नधान्यासाठी आयातीवर अवलंबून असलेल्या देशांना बसणार आहे.

### अमेरिकेलाही चटके

अमेरिकेतील शेतकरीही युद्धामुळे अधिक संकटात आले आहेत. अमेरिकेतील शेतकरी आधीच राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या आयात शुल्क धोरणामुळे अडचणीत आले होते. त्याच वेळी खतांच्या किमती, ट्रॅक्टर आणि अवजारांच्या किमती वाढल्या होत्या. मागच्या हंगामातील सोयाबीन, मका, कापूस आणि इतर शेतीमाल निर्यातीतील अडचणी कायम आहेत. त्यात आता खतांच्या आणि निविष्ठांच्या तसेच इंधनाच्या वाढत्या किमतींमुळे शेतकरी तोट्यात आले आहेत. अमेरिकेच्या नॅशनल यंग फार्मर्स कोलायशन या संस्थेच्या मते, काही खतांच्या किमती मागील तीन महिन्यांमध्ये ७० टक्क्यांपेक्षा अधिक वाढल्या आहेत. अमेरिका २० टक्के खतांसाठी कतार आणि होर्मूजमधून होणाऱ्या वाहतुकीवर अवलंबून आहे.

पण हा मार्ग बंद असल्याने खतांच्या किमती वाढल्या आहेत. मागील वर्षभरात अमेरिकेतील शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा वाढला आहे. २०२४ आणि २०२५ मध्ये दिवाळखोरीत निघालेल्या शेतकऱ्यांची संख्या दुप्पट झाली आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना सरकारच्या मदतीचाच आधार असतो. पण वाढता उत्पादन खर्च आणि कमी भाव यामुळे ही मदत अपुरी पडते. अनेक शेतकऱ्यांनी शेती सोडली आहे. असेच सुरु राहिले तर आणखी शेतकरी शेतीतून बाहेर पडतील. शेतकरी शेती सोडण्याचा विचार करत आहे, असेही या संस्थेने म्हटले आहे. यातून अमेरिकेतील शेतीपुढील आव्हानेही बिकट बनत असल्याचे दिसते. पण अमेरिकेसारखा बलाढ्य देश अनुदान देऊन आपल्या शेतकऱ्यांना सावरू शकतो. पण भारत आणि इतर देशांमधील शेतकऱ्यांना याचे चटके सहन करावे लागणार आहेत.

**अनिल जाधव**

# कृष्णाचा मुखवटा आत विकृतीचा रावण!

'देवाला देणे असल्यास तो सरळ देईल मध्ये कोणत्याही दलालाची गरज नसते!' ही साधी गोष्ट आपण विसरलो, आणि त्या विस्मरणातूनच अशा भोंदू प्रवृत्ती समाजात फोफावल्या. नाशिकमध्ये उघडकीस आलेले अशोक खरात प्रकरण हे केवळ एका व्यक्तीचे विकृत कृत्य नाही, तर आपल्या समाजाच्या अंधश्रद्धा, भीती आणि मौन यांचे भयावह प्रतिबिंब आहे.

अशोक खरात नावाचा हा व्यक्ती स्वतःला 'कृष्णाचा अवतार' म्हणवत होता. 'तू माझी राधा आहेस', 'तुझा नवरा मरेल' अशा घाणेरड्या आणि भय निर्माण करणाऱ्या वाक्यांनी तो महिलांच्या मनावर ताबा मिळवत होता. ही फक्त फसवणूक नव्हती. ही मानसिक गुलामी निर्माण करण्याची पद्धत होती. जेव्हा एखादी व्यक्ती श्रद्धेच्या नावावर दुसऱ्याच्या मनावर नियंत्रण मिळवते, तेव्हा ती व्यक्ती गुन्हेगारच नव्हे, तर समाजासाठी धोकादायक राक्षस ठरते.

या प्रकरणात पोलिसांना त्याच्याकडून ५८ पेक्षा अधिक महिलांचे अश्लील व्हिडिओ सापडले, ही बाब केवळ धक्कादायक नाही, तर संतापजनक आहे. त्या प्रत्येक व्हिडिओमागे एका महिलेचा तुटलेला विश्वास, तिचा उद्ध्वस्त सन्मान आणि समाजाच्या मौनाची काळी कहाणी दडलेली आहे. हे केवळ शरीराचे शोषण नाही हे श्रद्धेचा, विश्वासाचा आणि माणुसकीचाच बलात्कार आहे.

हे लोक अध्यात्म शिकवत नाहीत ते भीती विकतात. 'ग्रहदोष', 'शाप', 'देवाचा कोप' या नावाखाली लोकांच्या मनात असुरक्षितता निर्माण केली जाते आणि मग 'उपाय'च्या नावाखाली त्यांच्या शरीरावर, त्यांच्या आयुष्यावर हक्क गाजवला जातो. विशेषतः असाहाय्य, भावनिकदृष्ट्या कमजोर महिलांना लक्ष्य करून हा घाणेरडा व्यवसाय चालवला जातो.

याहून गंभीर बाब म्हणजे अशा लोकांच्या मागे अनेकदा राजकीय आणि सामाजिक वरदहस्त असतो. मोठ्या लोकांसोबतचे फोटो, सार्वजनिक सन्मान, आणि बनावट प्रतिष्ठा यामुळे हे भोंदू अधिकच निर्ढावतात. त्यांना वाटते की ते कायद्याच्या वर आहेत. त्यामुळे हा फक्त एका व्यक्तीचा गुन्हा नाही. ही त्या संपूर्ण व्यवस्थेची अपयशी कहाणी आहे जी अशांना वाढू देते.

समाजाचे मौन ही या सगळ्यातील सर्वात मोठी समस्या आहे. पीडित महिला बोलायला घाबरतात, कारण त्यांना न्यायापेक्षा बदनामीची भीती जास्त वाटते. आणि दुर्दैवाने, समाजही आरोपीला प्रश्न विचारण्याऐवजी पीडितेलाच दोष देतो. 'तिथे का गेलीस?', 'विश्वास का ठेवला?' अशा प्रश्नांनी आपण गुन्हेगाराला नव्हे, तर पीडितेलाच शिक्षा देतो. ही मानसिकता बदलली पाहिजे.

आज गरज आहे ती जागृतीची, विवेकाची आणि धाडसाची. देवावर श्रद्धा ठेवणे चुकीचे नाही, पण अंधश्रद्धा धोकादायक आहे. देव कधीच बंद दरवाज्यांआड, गुप्त विधींमध्ये किंवा कोणाच्या शरीराच्या बदल्यात कृपा देत नाही. जो असे काही मागतो, तो देवाचा प्रतिनिधी नसून विकृतीचा चेहरा आहे.



अशा प्रत्येक 'खरात'ला समाजाने उघडे पाडले पाहिजे, कायद्याने कठोर शिक्षा दिली पाहिजे आणि प्रत्येक नागरिकाने स्वतःचा विवेक जागा ठेवला पाहिजे. नाहीतर आज जे दुसऱ्यांच्या घरात घडत आहे, ते उद्या आपल्या घरात घडू शकते.

**श्रद्धा ठेवा पण विवेकासह!**

**ॲड. धनंजय देशमुख**

# नको नको ज्योतिष्य!माझा हात पाहू

नुकतीच एक घृणास्पद घटना उघडकीस आली. दुसऱ्याचे भविष्य सांगून जीवन उध्वस्त करणाऱ्या भोंदू बाबास पोलिसांनी अटक केली आणि महाराष्ट्राच्या राजकिय भूमीत भूकंप होण्यास सुरुवात झाली.महिला आयोगाच्या अध्यक्षांना आपल्या पदाचा राजीनामा दयावा लागला. पहिल्यांदा पुरुषामुळे बाईला राजीनामा द्यावा लागला नाहीतर आता पर्यंत बाईमुळे बुवाने राजीनामा दिला असल्याची नोंद आहे.पुढे किती राजीनामे समोर येतील याबाबत सटिक भविष्यवाणी करू शकत नाही मात्र राजकीय दडपण न येता पोलीस चौकशी सखोल व व्यवस्थित झाल्यास अनेक मासे गळतला लागू शकतात.

महाराष्ट्रामध्ये अनेक थोर पुरुष, समाजसुधारक झाल्यामुळे कृप्रथा, अंधश्रद्धेचे प्रमाण बरेच कमी झाले.पण बुवाबाजी कमी झाली झाली. महाराष्ट्रात ज्योतिषशास्त्र बऱ्याच प्रमाणात अस्तित्वात आहे.ज्योतिष्य दुसऱ्याचे भविष्य सांगतो तोच स्वतःविषयी काहीही सांगत नाही. त्याला समजले असते तर आपला भंडाफोड होणार आहे याची पुसटही कल्पना नाही .

काही दिवसांपूर्वी दुबईमध्ये ज्योतिषी संमेलन झाले आणि दुर्दैवाने इराक,अमेरिका युद्धामुळे अनेक ज्योतिषी अडकून पडले. त्यांनी भारत सरकारला देशात परत आणण्याची विनवणी केली. खरे म्हणजे जे दुसऱ्याचे भविष्य सांगतात त्यांना युद्ध होणार आणि दुबईमध्ये अडकून पडणार हे समजले नाही का? असे भविष्य वर्तविणारे शास्त्र अस्तित्वात आहे का? लोकांचे भविष्य सांगणाऱ्याला उद्या परवा आपल्या सोबत काय घडणार आहे हे कळले नाही का? याची पुसटही कल्पना नाही.जगात अशी कोणती विद्या आहे जे तुमचे अचूक भविष्य सांगू शकेल? तरी पण सुशिक्षित लोक याला बळी पडतात. अशा बोंदुबाबाकडे स्त्रिया अधिक बळी पडतात. सुशिक्षित स्त्रिया भोंदू बाबाच्या पाया पडतात, त्याच्या डोक्यावर छत्री धरतात, त्याचे मूत्र तीर्थ म्हणून पितात,योनी पूजा करून घेतात. व्यक्तिपूजा करून घेणारे हे भोंदू बाबा भोळ्या भाबडया जनतेकडून काहीही करून घेतात. आपल्या जवळ दैवी शक्ती असल्याचा दावा करून महिलांना आपल्या मोहात अडकवितात आणि त्यांचे लैंगिक शोषण करतात.महिला आपली बदनामी होऊ नये म्हणून गप्प बसतात. त्यांच्या कडून नकळत चूक झालेली असते.अशा अनेक घटना आपण ऐकतो,पाहतो, वृत्तपत्र,दूरदर्शन, समाज माध्यमातून दृष्टीक्षेपात पडतात.असे अनेक बाबा शिक्षा भोगत आहे. लैंगिक शोषण,पैशांची लूट इत्यादी करीत असून सुद्धा आमच्या लक्षात येत नाही.

कधी शाळेत न गेलेली बहिणाबाई चौधरी आपल्या कवितेत म्हणतात -

**नको नको ज्योतिष्य माझा हात नको पाहू**
**माझं भविष्य मला ठाऊक आहे माझ्या जवळ नको येऊ**

मग शिक्षित आणि अशिक्षित महिलांमध्ये फरक दिसत नाही.उलट अशिक्षित महिला कदाचित अशा भोंदूबाबाकडे कमी प्रमाणात जात असतील.

**डॉ. संजय साळीवकर**,
अमरावती.
मो.९४२३४२४८५१

जनमाध्यम

# यवतमाळ एमआयडीसीत भीषण अपघात..!

## क्षणात सर्व काही उलथलं... व्हॅगनार चालक जीवासाठी झुंजतोय!

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ - एका क्षणात... सगळं काही बदलून गेलं! यवतमाळच्या एमआयडीसी परिसरातील दारव्हा रोडवर आज घडलेल्या भीषण अपघाताने संपूर्ण परिसर हादरून गेला. भरधाव वेगात समोरासमोर आलेल्या व्हॅगनार कार आणि ट्रॅव्हल्सच्या जोरदार धडकेत धडकी भरवणारा आवाज झाला आणि काही क्षणातच शांत रस्ता भीती, धावपळ आणि हंबरडा यांनी भरून गेला.यवतमाळ वरून दारव्हाकडे निघालेली व्हॅगनार कार आपल्या मार्गाने पुढे जात असतानाच समोरून येणाऱ्या ट्रॅव्हल्सने जोरदार धडक दिली. या अपघाताची तीव्रता इतकी भीषण होती की, कारचा पुढील भाग अक्षरशः चुराडा झाला. अपघातानंतर काही क्षणांसाठी परिसरात स्तब्धता पसरली, तर प्रत्यक्षदर्शींनी अंगावर काटा आणणारा तो क्षण अनुभवला.

या भीषण धडकेत व्हॅगनारचा चालक गंभीर जखमी झाला असून तो सध्या जीवन-मरणाच्या सीमारेषेवर झुंज देत आहे. त्याला तात्काळ यवतमाळ येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्याच्या जखमा पाहून उपस्थितांच्या डोळ्यांत नकळत पाणी आले. सुदैवाची बाब म्हणजे, या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही; मात्र दोन्ही वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. लोखंडाच्या त्या वाकलेल्या तुकड्यांतून अपघाताची भीषणता स्पष्टपणे दिसत होती. घटनेची माहिती मिळताच पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी परिस्थिती नियंत्रणात आणत पंचनामा केला असून अपघातामागील नेमके कारण शोधण्यासाठी तपास सुरू केला आहे. दरम्यान, या घटनेने पुन्हा एकदा वेगावर नियंत्रण आणि सुरक्षित वाहनचालना किती महत्त्वाची आहे, याची जाणीव करून दिली आहे. एका क्षणाच्या दुर्लक्षामुळे संपूर्ण आयुष्य उद्ध्वस्त होऊ शकते, याची जाणीव या अपघाताने सर्वांना करून दिली.

# महायुद्धाने आणि अमेरिकेच्या कराराच्या नावाने शेतकऱ्याची प्रचंड लूट

जनमाध्यम प्रतिनिधी

उमरखेड - गेल्या दोन महिन्यापासून भारत आणि अमेरिकेच्या कृषी विषयक करार झाल्याची चर्चा प्रसारमाध्यमातून रंगताना दिसत आहे. तसेच इराण, इजराइल , अमेरिका या युद्धाचे सुद्धा चर्चा लोकांपर्यंत पोहोचली आहे. प्रत्यक्षात आता काय परिणाम होतो याचा विचार शासन दरबारी होतो की नाही हा विषय वेगळा. परंतु शेतकऱ्यांची मात्र कोरोना काळात झालेली लूट आता प्रत्यक्षात पुन्हा एकदा पाहायला मिळत आहे. प्लास्टिक जन्य पदार्थांमध्ये मोठ्या प्रमाणात किमती वाढवून व्यापारी आपले उखळ पांढरे करत असून शासन मात्र ॲक्शन मोडवर हा एकच शब्द वरचेवर प्रदर्शित करत असून यावर कुठलाही उपाय शासनाकडे नाही. यामुळे शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात लूट होत आहे.

आज रोजी रब्बीचा हंगाम संपण्याच्या मार्गावर असल्यामुळे प्लास्टिक जन्य पदार्थांमध्ये शेतकऱ्यांना लागणारे पोते ,फारी व पाईपलाईन साठी लागणारे पाईप या सर्वच मालाच्या किमती गगनाला भिडलेले आहेत. यामध्ये कोणताही दुकानदार युद्धामुळे 40% वाढ झाली असे उदाहरण देत आहे. परंतु त्याच्याकडे असलेला माल कधी घेतलेला आहे. त्याची मूळ किंमत काय आहे याबद्दल तो शब्दही बोलायला तयार नाही .यावर आजपर्यंत कुठल्याही अधिकारी कुठलीही कारवाई करू शकत नाही. यांचा स्टॉक तपासण्याचे अधिकार कोणाला आहेत याबद्दल शासनाने स्पष्ट परिपत्रक काढणे आवश्यक आहे त्यानंतर शेतकऱ्याची लूट थांबेल. भारत अमेरिका कृषी विषयक करारामुळे व युद्धामुळे बाकी मालांचे भाव जरी वाढत असतील तरी शेतीमालाचे भाव मात्र व्यापारी मोठ्या प्रमाणात पाडताना दिसत आहेत. यावर कुठलीही यंत्रणा काम करताना दिसत नाही. सध्या गॅस व पेट्रोल याच विषयावर सर्वत्र चर्चा चालू असून शेतकऱ्यांचा माल कवडीमोल भावाने व्यापारी विकत घेत आहेत. आज तयार झालेल्या परिस्थितीमुळे कोरोना सारखी परिस्थिती निर्माण करण्याचा प्रयत्न. अनेक लोकांकडून, व्यापाऱ्यांकडून चालू आहे. जमेल त्या पद्धतीने सामान्य माणसाला लुटायचे व शेतकऱ्यांना लुटायचे हा एकमेव कार्यक्रम चालू आहे असे दिसत आहे.

# दु:खावर मीठ चोळत आंदोलन शांत..!

## आश्वासनांची खिरापत, पण प्रश्न अनुत्तरितच

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ : सलग तीन दिवस पायी चालत कोलाम समाजाने आपल्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांसाठी उभारलेले आंदोलन अखेर आश्वासनांच्या खिरापतीत शांत झाले. मात्र या आंदोलनाने उभे केलेले मूलभूत प्रश्न अद्यापही अनुत्तरितच असल्याने शासनाच्या संवेदनशीलतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

पांढरकवडा ते यवतमाळ असा खडतर प्रवास करत आदिवासी युवा नेते अतुल आत्राम यांच्या नेतृत्वात व श्यामा दादा कोलाम ब्रिगेडच्या प्रदेशाध्यक्षा इंदिरा बोंदरे यांच्या पुढाकाराने कोलाम बांधवांनी आपल्या मागण्यांसाठी ठिय्या आंदोलन छेडले. तीन दिवसांच्या या पायी प्रवासात आंदोलकांच्या पायांना फोड आले, अंगात शक्ती उरली नाही; पण मनातील वेदना आणि अन्यायाची जाणीव त्यांना पुढे चालवत राहिली. आंदोलकांनी पालकमंत्री तथा राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांच्या कार्यालयात धडक देत आपले निवेदन सादर केले. मात्र अधिवेशनानिमित्त मंत्री मुंबईत असल्याने विशेष कार्य अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी मोहन जोशी यांनी निवेदन स्वीकारले. यावेळी हरिहर लिंगनवार, श्रीधर मोहोळ, गजानन डोमाळे, प्रद्युम्न जवळेकर, दर्शन इंगोले, संजय हदगावकर यांसह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. दरम्यान, मंत्री संजय राठोड यांनी दूरध्वनीवरून आंदोलकांशी संवाद साधत "शासन कोलाम समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असून लवकरच शिष्टमंडळासोबत बैठक घेऊन सर्व प्रश्न मार्गी लावले जातील," असे आश्वासन दिले. मात्र, हा प्रश्न केवळ आश्वासनांवर थांबणार की प्रत्यक्षात कृतीत उतरणार, याबाबत साशंकता कायम आहे. कोलाम समाजाने मांडलेल्या मागण्या केवळ तात्पुरत्या दिलास्याच्या नव्हत्या, तर त्या त्यांच्या अस्तित्वाशी निगडित होत्या. स्वतंत्र अभ्यास आयोगाची स्थापना, प्रत्येक कुटुंबाला पक्के घर, बारमाही रस्ते, पाणी व वीज, उच्च शिक्षणासाठी 'श्यामा दादा कोलाम' शिष्यवृत्ती, कोलामी भाषेसाठी साहित्य अकादमी, यवतमाळात भव्य स्मारक, महिला बचत गटांना शून्य टक्के व्याजदरात कर्ज आणि वनोपज प्रक्रिया केंद्रांच्या माध्यमातून रोजगार या सर्व मागण्या मूलभूत हक्कांच्या चौकटीत बसणाऱ्या आहेत.

आंदोलनाची दाहकता लक्षात घेऊन प्रशासनाने डॉक्टरांना पाचारण करून आंदोलकांची वैद्यकीय तपासणी केली, ही बाब नक्कीच स्वागतार्ह आहे. मात्र, पायांवरील जखमांवर मलम लावणे सोपे असते पण अनेक वर्षांपासून मनात साचलेल्या वेदना आणि उपेक्षेवर कोणते मलम लावणार, हा खरा प्रश्न आहे.आज परिस्थिती अशी आहे की, या समाजाला आपल्या मूलभूत हक्कांसाठी रस्त्यावर उतरावे लागते, पायी चालत आंदोलन करावे लागते. हीच बाब शासन व्यवस्थेच्या अपयशाची साक्ष देणारी नाही का? आता खरी कसोटी आहे ती शासनाच्या कृतीची.

## वेचक

### शिक्षकांवर ऑनलाईन कामाचा वाढता बोजा..!

यवतमाळ - महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती, यवतमाळ यांनी शिक्षकांवरील वाढत्या ऑनलाईन कामकाजाच्या ताणाबाबत शासनाचे लक्ष वेधत सकारात्मक उपाययोजनांची मागणी केली आहे. बदलत्या काळानुसार शिक्षकांनी ऑनलाईन प्रणालीचा स्वीकार करून शासकीय उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदविला असला, तरी अलीकडे ऑनलाईन कामाचा वाढलेला व्याप आणि त्यातील सक्तीमुळे अनेक व्यावहारिक अडचणी निर्माण होत असल्याचे समितीने नमूद केले आहे.निपुण चाचणी व SCAP प्रक्रियेत शिक्षकांना वैयक्तिक मोबाईलद्वारे विविध ॲप्स वापरून माहिती भरण्याची सक्ती केली जाते. मोबाईलमध्ये वैयक्तिक व संवेदनशील माहिती असल्याने शासकीय कामासाठी त्याचा अनिवार्य वापर शिक्षकांसाठी गैरसोयीचा ठरत असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. याशिवाय, मोठ्या प्रमाणात डेटा एंट्री, छायाचित्र अपलोड, पीडीएफ तयार करणे यामुळे अतिरिक्त ताण निर्माण होत असून अध्यापनावर परिणाम होण्याची शक्यता आहे. समितीने शासनाकडे शासकीय मोबाईल/टॅब व इंटरनेट सुविधा उपलब्ध करून देणे, वैयक्तिक मोबाईल वापराची सक्ती टाळणे, ऑफलाईन पर्याय कायम ठेवणे आणि ऑनलाईन कामाचा ताण कमी करण्याची मागणी केली आहे.

# रामनवमीला यवतमाळात भव्य शोभायात्रा..!

## संस्कृती, लोकपरंपरा आणि सामाजिक संदेशांचा संगम



जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ : श्रीराम नवमी निमित्त २६ मार्च रोजी यवतमाळ शहरात भव्य, दिव्य आणि आकर्षक शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले असून भारतीय संस्कृती, लोकपरंपरा आणि सामाजिक प्रबोधनाचा संदेश देणारा हा लोकोत्सव ठरणार असल्याची माहिती श्रीराम जन्मोत्सव शोभायात्रा समितीचे पदाधिकारी राम लोखंडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी भूपेंद्र परिहार, राहुल ढोके, गोविंद मून, अभिजीत डोंगरे, संतोष हरणखेडे, देव राऊत व अंकुश वाघमारे उपस्थित होते.

जयहिंद चौकातील श्रीराम मंदिरातून दुपारी ३ वाजता श्रीराम, माता सीता व लक्ष्मण यांच्या मूर्तीचे विधिवत पूजन करून शोभायात्रेला प्रारंभ होईल. यंदा दाक्षिणात्य शैलीत साकारण्यात आलेल्या सुशोभित रामरथात रामदरबार विराजमान असणार असून हा रथ रामभक्तांच्या हस्ते ओढण्यात येणार आहे. शोभायात्रेचे प्रमुख आकर्षण म्हणून गोवा येथील शिमगोत्सवातील प्रथम क्रमांक पटकाविणारा 'दुर्गासुर वध' चित्ररथ, तसेच गणपती व कार्तिकेय यांचे असुरांसोबतचे युद्ध सादरीकरण करण्यात येणार आहे. कर्नाटकातील सुप्रसिद्ध बावली नृत्य, पांढरकवडा येथील २० जणांचे आदिवासी दंडार नृत्य पथक, दारव्हा तालुक्यातील १०० सदस्यांचे भजनी मंडळ, तसेच कोलाम समाजाचे पारंपारिक डफ वादन हे विशेष आकर्षण ठरणार आहे.रामायणकालीन देखावे, सामाजिक संदेश देणाऱ्या १०० हून अधिक झांक्या, तसेच स्थानिक आखाड्यांतील बलदंड युवकांचे शौर्यप्रदर्शन यामुळे शोभायात्रेला वेगळेच स्वरूप प्राप्त होणार आहे. शोभायात्रा मार्गावर रांगोळ्या, भगवे ध्वज, पताका व भजनगायनामुळे संपूर्ण शहर राममय वातावरणात न्हाऊन निघणार आहे. सुरक्षेच्या दृष्टीने विविध समित्यांचे गठन करण्यात आले असून बजरंग दलाचे सुमारे ५०० स्वयंसेवक तैनात राहणार आहेत. जयहिंद चौक येथून निघणाऱ्या या शोभायात्रेचा समारोप संत सेना चौक येथे महाआरतीने होणार असून उत्कृष्ट चित्ररथ व झांक्यांना पारितोषिक वितरण करण्यात येणार आहे.दरम्यान, रामनवमी निमित्त सकाळी ७ वाजता दत्त चौक येथील श्री दत्त मंदिरातून मोटारसायकल प्रभातफेरीचे आयोजन करण्यात आले आहे. शहरातील विविध भागांतून रामनामाचा गजर करत ही रॅली जयहिंद चौकात समाप्त होणार आहे. या सर्व कार्यक्रमात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन श्रीराम जन्मोत्सव शोभायात्रा समितीने केले आहे.

# गांधी चौक गाळे प्रकरणी दिशाभूल..!

## सत्ताधाऱ्यांचा खुलासा, न्यायालयीन निर्णयानंतरच पुढील कार्यवाही

जनमाध्यम प्रतिनिधी



वणी - गांधी चौक येथील गाळे प्रकरणाबाबत विरोधी पक्षाकडून जनतेची दिशाभूल केली जात असल्याचा आरोप सत्ताधारी गटाने केला आहे. सोमवारी (दि. 23 मार्च) नगराध्यक्ष सौ. विद्याताई आत्राम यांच्या कॅबिनमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत या प्रकरणाची सविस्तर माहिती देण्यात आली.

नगरपरिषद वणीच्या 4 फेब्रुवारी 2026 रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत या विषयावर चर्चा झाली होती. मात्र विरोधी पक्षाचे गटनेते सुधीर थेरे यांनी माध्यमांना चुकीची माहिती देत खोट्या बातम्या प्रसारित केल्याचे सत्ताधाऱ्यांनी सांगितले. गांधी चौक परिसरातील सुमारे 160 गाळ्यांचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित असून, न्यायालयीन प्रकरणे व शासन आदेशांवरील स्थगितीमुळे कोणतीही ठोस कार्यवाही होऊ शकलेली नाही. यामुळे नगरपरिषदेला आर्थिक नुकसान सहन करावे लागत असल्याचेही नमूद करण्यात आले. सभेत मुख्याधिकाऱ्यांनी न्यायालयीन व शासनाच्या आदेशांचा विचार करून कोणताही निर्णय न घेण्याचे स्पष्ट निर्देश दिले होते. ही बाब सर्व सदस्यांना वाचून दाखविण्यात आली होती. त्यानंतर सभागृहाने कोणताही ठराव मंजूर न करता, सद्यस्थिती शासन व उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून त्यांचे मत घेण्याचा निर्णय घेतला आहे. दरम्यान, गांधी चौक परिसरात आधुनिक बहुमजली व्यापारी संकुल उभारण्याचा प्रस्ताव काही सदस्यांनी मांडला असला, तरी त्यावर अंतिम निर्णय झालेला नाही. विरोधकांचे आर्थिक गैरव्यवहाराचे आरोप निराधार असून, संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाईचा इशारा सत्ताधाऱ्यांनी दिला.वणी शहराच्या विकासासाठी कायदेशीर चौकटीत राहूनच पुढील निर्णय घेतले जातील, असेही स्पष्ट करण्यात आले.

क्रमांक/म/सहा.प्रस्तु-४/कावि/२३/२०२५
तहसिलदार उमरखेड याचे कार्यालय, उमरखेड
दिनांक:- २२/०१/२०२६

**जाहीरनामा**

उपरोक्त विषयाचे संदर्भीय शासन निर्णय व पत्रानुसार आपणांस कळविण्यात येते की, अर्जदार **नसरीन परविन शेख चांद रा. उमरखेड यांनी त्यांचे स्व:ताचे नामे नसरीन परविन शेख चॉंद मौजा** उमरखेड **ता. उमरखेड येथे दिनांक** ११.०२.२००४ रोजी झालेला आहे. जन्म अनुउपलब्धता उपलब्ध नसल्याबाबत प्रमाणपत्र व अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रकरणी अर्जदार यांना **जन्मनोद** आदेश देणे बाबतचे प्रकरणात कोणाचे आक्षेप/हरकती घ्यावयाचा असेल तर त्यांनी दिनांक २८/०२/२०२६ पर्यंत लेखी स्वरुपात या कायालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत सादर कराव्यात. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेप/हरकती अर्जाचा विचार केल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

**स्वा.**
**तालुका दंडाधिकारी**
**उमरखेड**

# उपविभागीय अधिकारी यांचे सह जिल्हा निबंधक यांना कारवाईचे पत्र

जनमाध्यम प्रतिनिधी



पुसद - येथील सह दुय्यम निबंधक श्रेणी-१ कार्यालयामध्ये श्रीमती विद्या तळेगावकर यांनी उपविभागीय अधिकारी यांच्या परवानगीविना खरेदी-विक्री परस्पर केल्याबाबत पुसद येथील काही सामाजिक कार्यकर्ते यांनी तक्रार केली आहे. त्यानुसार उपविभागीय अधिकारी पुसद यांनी दिनांक 02/02/2026 रोजी तक्रारदार यांना बोलावून सुनावणी घेण्यात आली तसेच सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी यवतमाळ यांनी दिनांक 24/02/2026 रोजी तक्रारकर्ते यांना पत्र देऊन सुनावणी घेण्यात आली.

त्या अनुषंगाने तक्रारकर्ते यांनी दोन्ही खरेदीच्या प्रत पुरावे म्हणून दस्त सह जिल्हा निबंध यवतमाळ यांना लेखी म्हणणे सोबत सादर केले परंतु अद्याप पर्यंत कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही असा आरोप तक्रारकर तयार करून होत आहे. त्यामुळे तक्रारदार यांनी उपविभागीय अधिकारी पुसद यांना भेटून तक्रारी संदर्भात विचारणा केली असता त्यांनी दिनांक 24/03/2026 रोजी सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी यवतमाळ यांना पत्र पाठवून कारवाई करण्यासंदर्भात लेखी कळविले आहे आणि केलेल्या कारवाईचा अहवाल उपविभागीय अधिकारी कार्यालयात पाठविण्यात यावे व परस्पर तक्रारकर्ते यांना कळविण्यात यावे असे लेखी पत्राद्वारे कळविले आहे. परंतु तक्रारदार यांनी या पत्रावर आक्षेप घेत सदर कारवाई उपविभागीय अधिकारी यांच्या अधिकारात असल्याचे दिसून येते परंतु सह दुय्यम निबंधक पुसद येथील श्रीमती विद्या तळेगावकर यांना वाचवण्याचा प्रयत्न होत आहे, असा आरोप सुद्धा होत आहे.

त्यामुळे हा जाणून बुजून दिशाभूल करण्याचा व कारवाईसाठी टोलवाटोलवी करण्याचा प्रकार सुरू आहे असे तक्रारकर्ते याच्याकडून बोलल्या जात आहे. त्यामुळे तक्रारकर्ते हे जिल्हाधिकारी कार्यालय यवतमाळ येथे पुढील महिन्यात उपोषणास बसण्याचा इशारा सुद्धा त्यांनी दिलेला आहे, त्यामुळे सदर प्रकरणात उपविभागीय अधिकारी यांनी सह जिल्हा निबंधक यवतमाळ यांना दिलेल्या पत्रावर कोणत्या प्रकारे कारवाई करतात याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# जगदंबा अभियांत्रिकी महाविद्यालयात "कोड उत्सव 1.0" राष्ट्रीय हॅकाथॉन

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ - जगदंबा अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, यवतमाळ येथील कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), मशीन लर्निंग (ML) व डेटा सायन्स उत्कृष्टता केंद्राच्या वतीने "कोड उत्सव 1.0" या राष्ट्रीय स्तरावरील ऑफलाइन हॅकाथॉनचे आयोजन करण्यात आले आहे. हा उपक्रम मंगळवार, 24 मार्च 2026 रोजी महाविद्यालयाच्या परिसरात पार पडणार आहे.या हॅकाथॉनच्या माध्यमातून देशभरातील विद्यार्थ्यांना आपली कोडिंग कौशल्ये, तांत्रिक ज्ञान आणि समस्या सोडवण्याची क्षमता प्रत्यक्ष सादर करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. स्पर्धेसाठी एकूण बक्षीस रक्कम एक लाख रुपयांपर्यंत ठेवण्यात आली असून प्रत्येक टीममध्ये जास्तीत जास्त पाच सदस्य सहभागी होऊ शकतात. नोंदणी शुल्क प्रति टीम 500 रुपये निश्चित करण्यात आले आहे.

"कोड उत्सव 1.0" हा उपक्रम विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रोजेक्टवर काम करण्याचा अनुभव देणारा ठरणार आहे. यामुळे नवोपक्रमाची दृष्टी विकसित होण्यासोबतच टीमवर्क, वेळेचे नियोजन आणि सर्जनशील विचारसरणी यांसारखी कौशल्येही विकसित होणार आहेत. भविष्यातील करिअरच्या दृष्टीने हा अनुभव विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. महाविद्यालयाचे सचिव डॉ. शीतल वातीले तसेच प्राचार्य यांनी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे. या कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. आशिष महल्ले असून विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून चैतन्य देशपांडे, आदर्श भांखेडे, वेदिका सावरकर, गौरवी धनोरकर, मैथिली पायताडे, योगिता कुंभारे आणि आयुष वडे कार्यरत आहेत.

क्रमांक/म/सहा.प्रस्तु-३/कावि/१८८/२०२५
तहसिलदार उमरखेड याचे कार्यालय, उमरखेड
दिनांक:- ०९/०२/२०२६

**जाहीरनामा**

उपरोक्त विषयाचे संदर्भीय शासन निर्णय व पत्रानुसार आपणांस कळविण्यात येते की, अर्जदार **शेख मुसा सदाम शेख चाँद रा. उमरखेड यांनी त्यांचे स्व:ताचे नामे शेख मुसा सदाम शेख चाँद मौजा** उमरखेड **ता. उमरखेड येथे दिनांक** १०.०७.१९९७ रोजी झालेला आहे. जन्म अनुउपलब्धता उपलब्ध नसल्याबाबत प्रमाणपत्र व अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रकरणी अर्जदार यांना **जन्मनोद** आदेश देणे बाबतचे प्रकरणात कोणाचे आक्षेप/हरकती घ्यावयाचा असेल तर त्यांनी दिनांक २८/०२/२०२६ पर्यंत लेखी स्वरुपात या कायालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत सादर करावयात. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेप/हरकती अर्जाचा विचार केल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

**स्वा.**
**तालुका दंडाधिकारी**
**उमरखेड**

# शहीद-ए-आझम भगतसिंग,राजगुरू व सुखदेव यांना अभिवादन; यवतमाळ येथे कार्यक्रम

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ - देशाच्या स्वातंत्र्यासाठी हसत हसत बलिदान देणारे क्रांतिकारक भगत सिंग,शिवराम राजगुरू,आणि सुखदेव थापर यांच्या स्मृतिदिनानिमित्त आज २३ मार्च रोजी सकाळी ठीक ९.०० वाजता यवतमाळ येथील हुतात्मा चौकात अभिवादन कार्यक्रम संपन्न झाला.

दरवर्षी २३ मार्च हा दिवस देशभर शहीद दिन म्हणून पाळला जातो.याच पार्श्वभूमीवर मराठा सेवा संघ व शहीद-ए-आझम भगतसिंग विचार मंच,यवतमाळ यांच्या वतीने हा अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी शहीद भगतसिंग,राजगुरू आणि सुखदेव यांच्या प्रतिमांना पुष्प अर्पण करून अभिवादन केले व त्यांच्या देशभक्ती,धैर्य आणि बलिदानाची आठवण करून दिली. त्यांच्या क्रांतिकारी विचारांमधून युवकांनी प्रेरणा घेऊन देशभक्ती,सामाजिक बांधिलकी आणि अन्यायाविरुद्ध लढण्याची भूमिका कायम ठेवावी,असे आवाहन यावेळी करण्यात आले. याप्रसंगी मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर गायकवाड,नंदकुमार बुटे,शशिकांत खडसे,अभिलाष खंडारे,कृष्णा पुसनाके,प्रद्युम्न जवळेकर, कृषी अधिकारी गणेश धस,उदय सरतापे,आशा काळे,अनिता गरड,स्नेहा निंबाळकर,कॉम्रेड सचिन मनवर तसेच प्रा.पंढरी पाटे यांच्यासह अनेक सामाजिक कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमात उपस्थित सर्वांनी शहीदांच्या स्मृतींना अभिवादन करून त्यांच्या बलिदानाप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

# लोहारा–पिंपळगाव बायपास रस्त्याच्या दुरुस्तीला हिरवा कंदील

## १० लाखांचा निधी मंजूर

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ - नगर परिषदेच्या विषय समितीच्या बैठकीत शहराच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. यामध्ये लोहारा बायपास ते पिंपळगाव बायपास या प्रमुख रस्त्याच्या देखभाल व दुरुस्ती कामास मंजुरी देण्यात आली असून, या कामासाठी अंदाजे १० लाख रुपयांचा निधी खर्च केला जाणार आहे.

शहरातील पायाभूत सुविधा अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने प्रत्येक नगरसेवकाला त्यांच्या प्रभागातील रस्ते व गटार बांधकामासाठी १० लाख रुपयांपर्यंत निधी उपलब्ध करून देण्याचाही महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे विविध प्रभागांतील प्रलंबित कामांना गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दरम्यान, अग्निशमन दलाच्या निविदा प्रक्रियेसंदर्भातील मुद्दा बैठकीत स्थगित ठेवण्यात आला असून, पुढील बैठकीत यावर सविस्तर चर्चा होणार असल्याची माहिती देण्यात आली. स्थायी समिती सदस्य विशाल पावडे यांनी सांगितले की, या निर्णयांमुळे शहरातील विकास कामांना चालना मिळेल आणि नागरिकांना अधिक चांगल्या व दर्जेदार सुविधा उपलब्ध होतील.

# मालमत्ता व पाणीकर वसुलीसाठी घाटंजी नगरपालिकेने 'मोहीम हाती घेतली'

जनमाध्यम प्रतिनिधी

घाटंजी - नगरपालिकेच्या वतीने मालमत्ताकर व पाणीकर वसुलीसाठी कठोर मोहीम हाती घेतली असून नागरिकांनी थकीत मालमत्ताकरांचा भरणा करावा असे आवाहन नगरपालिकेने आधीच केले होते.

मालमत्ता कर हे नगरपालिकेचे उत्पन्न आहे, त्यानंतरही नागरिकांचे मालमत्ता कर भरण्याची गती अत्यंत कमी असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे पालिकेने थकबाकीदारांना " नोटीस " बजावल्या असुन, मालमत्ता कर भरण्याचे आवाहन केले आहे,अजूनही वसुलीची टक्केवारी अत्यंत कमी आहे. परिणामी,आता पालिकेने कठोर भूमिका घेण्याची तयारी सुरू केली आहे. 50,000 रु. पेक्षा जास्त थकीत मालमत्ताकराची यादी बॅनर व्दारे प्रकाशित केली असून आता 20,000 रु.पर्यंत थकीत मालमत्ताधारकांची नावे सुध्दा वर्तमानपत्र व बॅनरव्दारे प्रकाशित करण्यात येणार आहे. तसेच पालिका प्रशासन 31 मार्चपासून प्रस्तावित केलेली जप्ती व मालमत्ता अधिग्रहण करण्याची कारवाई सुध्दा करणार आहे. या कारवाईतून सुटका करून ' घेण्यासाठी मालमत्ताधारकांनी थकीत व चालू कराचा भरणा करण्याचे तसेच काही अडचन असल्यास नगर परिषद कार्यालयाशी सपर्क करण्याचे आवाहन मुख्याधिकारी राजू घोडके यांनी केले आहे.

# 'धुरंधर'चा क्षात्रधर्म आणि हिंदुद्वेष्टया विचारवंतांचा वैचारिक विलाप!

गुरुवार, १९ मार्च २०२६. भारतीय चित्रपटसृष्टीच्या इतिहासातील एक असा दिवस, ज्याने दशकानुदशके पोसलेल्या 'सेक्युलर' वृत्तीच्या चिंध्या केल्या.'धुरंधर २: Revenge' प्रदर्शित झाला आणि एका क्षणात संपूर्ण देशातील चित्रपटगृहांचे रूपांतर 'राष्ट्रभक्तीच्या रणांगणात' झाले. ज्याप्रमाणे सूर्याच्या उदयाने अंधकाराचे साम्राज्य लयाला जाते, त्याचप्रमाणे 'धुरंधर'च्या या प्रखर राष्ट्रवादाने दशकानुदशके फोफावलेल्या हिंदुद्वेष्ट्या मानसिकतेचा थरकाप उडाला आहे. हा चित्रपट म्हणजे केवळ मनोरंजन नसून, तो या देशातील सांस्कृतिक दहशतवादाविरुद्ध पुकारलेले एक धर्मयुद्ध आहे.

**चित्रपटसृष्टीचा कायापालट !**

'धुरंधर' मालिकेने चित्रपटसृष्टीची बुरसटलेली चौकट मोडून काढली आहे.चित्रपट शुक्रवारीच प्रदर्शित झाला पाहिजे, हा पाश्चिमात्य आणि बॉलिवूडचा नियम मोडून काढत, गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर गुरुवारी चित्रपट प्रदर्शित करण्याचे धाडस आदित्य धर यांनी दाखवले.

**'खान'दानी षड्यंत्राचा अंत आणि हिंदू अस्मितेचा उदय**

दशकानुदशके बॉलिवूडने 'सलीम-जावेद' प्रवृत्तीच्या लेखणीतून एक विशिष्ट 'अजेंडा' राबवला. ज्यामध्ये 'रहीम चाचा' हा देवदूत असायचा आणि कपाळावर टिळा लावणारा हिंदू हा 'हवस का पुजारी' किंवा विश्वासघातकी असायचा. दुसऱ्या बाजूला पडद्यावरचा मुल्ला किंवा मौलवी हा नेहमीच अत्यंत 'नेक', इमानदार आणि शब्दाचा पक्का दाखवला गेला. हा जो मानसिक गुलामगिरीचा खेळ सुरू होता, त्याला 'धुरंधर'ने पूर्णविराम दिला आहे. त्याऐवजी 'धुरंधर'ने हिंदूंचे क्षात्रतेज दाखवून दिले. यामध्ये हिंसा दाखवली असली तरी यातील हिंसा ही सकारात्मक ध्येयासाठी आणि राष्ट्रहितासाठी आहे. अधर्माचा नाश करण्यासाठी केलेले शस्त्रधारण हे नेहमीच 'धर्माचे पालन' ठरते हे या चित्रपटाने दाखवून दिले आहे. आज चित्रपटगृहात जेव्हा भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार कंधहार प्रकरणातील आतंकवाद्याला गुडघ्यावर टेकवून त्याच्याकडून 'भारत माता की जय' वदवून घेतात, तेव्हा होणारा टाळ्यांचा कडकडाट हा त्या जुन्या, कुजलेल्या व्यवस्थेच्या कानशिलात लगावणारा एक सणसणीत टोला आहे.

**'घुसकर मारेगा' - हा केवळ संवाद नाही, तर वास्तव**




उरी आणि पुलवामा येथील भ्याड हल्ल्यांनंतर भारताने केलेले 'सर्जिकल स्ट्राईक' आणि 'एअर स्ट्राईक' हे जागतिक राजकारणातील मैलाचे दगड ठरले. शत्रूला त्याच्या सुरक्षित स्थळी (Safe Havens) जाऊन कंठस्नान घालण्याची जी क्षमता भारताने दाखवली, तिचेच भव्य दर्शन 'धुरंधर' घडवतो. आतंकवादाशी कोणतीही तडजोड न करण्याचे आणि शत्रूच्या भूमीवर जाऊन त्याचा समूळ नायनाट करण्याचे हे धोरण हिंदू जनमानसाला आश्वासक वाटते. प्रत्यक्ष घडलेल्या प्रसंगांची मोडतोड न करता, भारताच्या जीवावर उठलेल्या बनावट नोटांच्या व्यवसायाचा आणि आतंकवाद्यांच्या विनाशाचा जो पट यात मांडला आहे, तो प्रत्येक राष्ट्रभक्ताच्या अंगावर शहारे आणणारा आहे. 'धुरंधर' म्हणजे केवळ सुडाची आग नाही, तर तो देशावरील प्रेमाचा ओलावा आहे. यामध्ये दाखवलेली हिंसा ही नकारात्मक नसून ती 'सकारात्मक' आणि 'राष्ट्रहितासाठी' आहे. पाकिस्तानमध्ये तिथल्या सरकारने या चित्रपटावर बंदी घातली असली, तरी तिथली जनता चोरून हा चित्रपट पाहत आहे. हाच 'धुरंधर'चा आणि हिंदू विचारांचा विजय आहे.

**नव्या पिढीचे वैचारिक प्रबोधन**

'धुरंधर'ने भारतीयांना एका अत्यंत संवेदनशील आणि विस्मृतीत गेलेल्या वास्तवाची प्रखर जाणीव करून दिली आहे. ती म्हणजे, शत्रूच्या भूमीवर जाऊन स्वतःचा जीव तळहातावर घेऊन लढणारे 'अज्ञात भारतीय वीर'. असे शेकडो 'रॉ' (RAW) एजंट्स किंवा गुप्तहेर आहेत, जे आपली ओळख पुसून, कुटुंबाचा त्याग करून पाकिस्तानसारख्या नरकामध्ये भारतासाठी डोळ्यांत तेल घालून पहारा देत आहेत. या अनाम वीरांना ना कधी पदक मिळते, ना त्यांचे नाव वृत्तपत्रात येते. मात्र, भारताचे रक्षण करण्यासाठी ते शत्रूच्या गोटात शिरून बलिदान देतात. 'धुरंधर'ने या अज्ञात वीरांच्या त्यागाला वंदन केले आहे, ज्यामुळे प्रत्येक भारतीयाच्या मनात या छुप्या सैनिकांबद्दल कृतज्ञतेची भावना जागृत झाली आहे.

'धुरंधर'ने केवळ मनोरंजन केले नाही, तर 'ब्रेनवॉश' झालेल्या नव्या पिढीला त्यांच्या खऱ्या इतिहासाची आणि सामर्थ्याची जाणीव करून दिली आहे. आजपर्यंत ज्या पिढीला 'धर्मनिरपेक्षतेच्या' नावाखाली स्व-धर्माची लाज वाटायला लावली होती, तीच पिढी आज चित्रपटगृहात भगवा ध्वज आणि राष्ट्रध्वज घेऊन जयघोष करत आहे. हा 'वैचारिक पालट' हिंदुद्वेष्ट्यांच्या पोटदुखीचे खरे कारण आहे.

**विरोधकांचा जळफळाट**

हा चित्रपट मोदींचा प्रोपागंडा आहे, असे ओरडणाऱ्यांनी हे लक्षात ठेवावे की, जनतेला जे आवडते तो प्रोपागंडा नसून ते 'सत्य' असते. पुढची २५ वर्षे केंद्रात सत्ता मिळण्याची शक्यता मावळल्याने जसे राजकीय विरोधक वैफल्यग्रस्त झाले आहेत, तशीच अवस्था आज हिंदूद्वेष्ट्या निर्मात्यांची झाली आहे. हिंदू श्रद्धांची विटंबना करून हिंदूंच्याच पैशावर माजणाऱ्या या मंडळींची आर्थिक नाकेबंदी आता अटळ आहे. 'धुरंधर'ने जे यश मिळवले आहे, त्याच्या आसपासही हे 'पुरोगामी' चित्रपट फिरकू शकत नाहीत. हीच नियतीची चपराक आहे.'धुरंधर'ने सिद्ध केले आहे की, इथून पुढे चित्रपटगृहात केवळ तोच टिकेल, जो या मातीचा आणि संस्कृतीचा सन्मान करेल.

थोडक्यात सांगायचे तर, नरेंद्र मोदींनी जसे रणांगण बदलले, तसेच 'धुरंधर'ने प्रेक्षकांचे वैचारिक रणांगण बदलले आहे. ही 'हिंदुत्वाची लाट' आता थांबणारी नाही.'धुरंधर २' ने एका नव्या पर्वाचा आरंभ केला आहे! धर्मो रक्षति रक्षितः!

**अपर्णा जगताप**

# महाराष्ट्राची एपस्टीन फाईल



नाशिकचे स्वयंघोषित 'अंकशास्त्रज्ञ' अशोक खरात यांचे प्रकरण सध्या 'महाराष्ट्राची एपस्टीन फाईल' म्हणून चर्चेत आहे. या दोन्ही प्रकरणांत अनेक धक्कादायक साम्य असल्याचे दिसून येत आहे.जेफ्री एप्स्टिनप्रमाणेच अशोक खरातवरही महिलांना फसवून, त्यांना अमली पदार्थ देऊन किंवा वैयक्तिक समस्या सोडवण्याच्या बहाण्याने त्यांचे लैंगिक शोषण केल्याचा आरोप आहे.एप्स्टिनचे संबंध जगातील बड्या नेत्यांशी आणि श्रीमंत लोकांशी होते. त्याचप्रमाणे, खरातचे महाराष्ट्रातील अनेक बड्या नेत्यांशी, मंत्र्यांशी आणि सेलिब्रिटींशी जवळचे संबंध असल्याचे समोर आले आहे. काही मंत्र्यांनी आणि अधिकाऱ्यांनी त्याच्या निवासस्थानी जाऊन त्याचे पाय धुण्याचे विधी केल्याचे व्हिडिओही व्हायरल झाले आहेत.

अशोक खरातबरोबर फोटो असलेल्या राष्ट्रवादीच्या रुपाली चाकणकर सह राज्यातील अनेक मोठ्या राजकारण्यांसोबत अशोक खरात याचे संबंध असल्याचे समोर आले. याबाबत गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.नोव्हेंबर २०२२मध्ये अशोक खरात हा पहिल्यांदा चर्चेत आला. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना त्यांनी ज्येष्ठ नेते राधाकृष्ण विखे पाटील आणि दीपक केसरकर यांच्यासह श्री शिवनिका मंदिराला भेट दिली होती. त्यानंतर अनेक राजकीय नेते खरातला भेटू लागले. राज्यात राजकीय अस्थिरता असताना भवितव्य जाणून घेण्यासाठी या भेटी घेतल्या जात असल्याची चर्चा होती. त्यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) अध्यक्ष शरद पवार यांनीही शिंदे यांच्या भेटीवर प्रश्न उपस्थित करत, मुख्यमंत्री पदावर असलेल्या व्यक्तीने असा आदर्श घालणे चुकीचे असल्याचे म्हटले होते. त्यांनी शिंदे यांच्या भूमिकेबाबतही शंका व्यक्त केली होती.

खरात यांच्या मुलाच्या लग्नातील काही फोटो समोर आले असून, त्यात राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि शिवसेनेचे नेते आणि माजी मंत्री दीपक केसरकर उपस्थित असल्याचे दिसत आहे. विशेष म्हणजे, तटकरे यांच्या शेजारी अशोक खरात बसलेले असलेला फोटो आहे. हा फोटो प्रचंड व्हायरल झाल्यामुळे सुनील तटकरे यांनी याबाबत स्पष्टीकरण दिले. तटकरे यांनी एक्सवर प्रतिक्रिया देताना म्हटले, 'सार्वजनिक जीवनात वावरताना प्रत्येकाचाच अनेक व्यक्तींशी तसेच संस्थांशी संपर्क येतो. अनेकदा या संपर्काचे स्वरूप थेट स्वरूपाचे असतेच असे नाही. परंतु याचा अर्थ असा नाही की, एखादे गुन्हेगारी कृत्य करणाऱ्या व्यक्तीला पाठीशी घातले जाईल. उलट या प्रकरणातील पीडितांनी समोर येऊन पोलिसात तक्रार नोंदवावी. आमचे सरकार या प्रकरणात ठाम भूमिका घेऊन दोषींवर कठोरात कठोर कारवाई करेल.'

याव्यतिरिक्त अजूनही अनेक नेत्यांचे खरात यांच्यासोबत संबंध असल्याचे फोटो समोर येत आहेत. यात भाजपाच्याही काही नेत्यांचा समावेश आहे. हरियाणा आणि राजस्थानमधील काही मंत्री आणि नेते 'अंकशास्त्र' आणि 'भविष्यवाणी'च्या आधारावर आपल्या राजकीय वाटचालीसाठी खरातचा सल्ला घेत असल्याचे बोलले जात आहे. या संपर्कामुळेच खरातचे धागेदोरे थेट दिल्लीच्या सत्ताकेंद्रापर्यंत पोहोचले असावेत, अशी शक्यता आता व्यक्त होत आहे.सरोज अहिरे, जयंत पाटील, निलेश लंके या नेतेमंडळींचा भोंदू बाबा कॅप्टन अशोक खरात यांच्याशी संपर्क होता.याबाबत अनेक फोटो, तसेच व्हिडीओ देखील व्हायरल झाले होते. जयंत पाटील, मिलिंद नार्वेकर यांचेही खरातासोबतचे काही फोटो समोर आल्याचे वृत्त आहे.

आक्षेपार्ह व्हिडिओ आणि पुरावे: तपासादरम्यान खरातच्या पेन ड्राईव्हमध्ये ५८ हून अधिक आक्षेपार्ह व्हिडिओ सापडले आहेत, ज्यांचा वापर ब्लॅकमेलिंगसाठी केला जात असावा असा संशय आहे.स्वयंघोषित अंकशास्त्रज्ञ अशोक खरात या भोंदू बाबाला लैंगिक शोषणाच्या आरोपाखाली अटक करण्यात आली आहे. त्याच्या मोबाईलमध्ये आक्षेपार्ह क्लिप्स सापडल्या असून त्याचे अनेक बडे नेते, सेलिब्रिटींशी संबंध समोर आले आहेत.एपस्टीनच्या बाबतीतही अशाच प्रकारे गुप्त कॅमेऱ्यांद्वारे चित्रीकरण करून प्रभावशाली लोकांना जाळ्यात अडकवल्याचे आरोप होते. या प्रकरणाचे गांभीर्य पाहून महाराष्ट्र सरकारने तेजस्विनी सातपुते यांच्या नेतृत्वाखाली विशेष तपास पथक स्थापन केले आहे, जे खरातच्या राजकीय संबंधांची आणि ब्लॅकमेलिंग नेटवर्कची चौकशी करत आहे. सध्या अशोक खरात पोलीस कोठडीत असून, या प्रकरणातून महाराष्ट्रातील अनेक बड्या नावांचे खुलासे होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल,**
वर्धा
मो.९५६१५९४३०६

# भोंदूबाबा कॅप्टन अशोक खरात

प्रतिबंधक कायदा २०१३ हा महाराष्ट्रात जादूटोणा, अघोरी प्रथा आणि नरबळी यांसारख्या अंधश्रद्धेवर आधारित अमानवीय कृतींना प्रतिबंध करणारा आणि गुन्हा ठरवणारा एक महत्त्वाचा फौजदारी कायदा आहे.आज महाराष्ट्रात लॉजिस्टिक्सच्या गप्पा मारल्या जात आहेत.महाराष्ट्रात मात्र हा कायदा चक्क धाब्यावर बसवून राज्यातील स्वयंमघोषित भोंदूबाबा कॅप्टन अशोक खरात याने फसवेगिरी करुन अनेक महिलांना लुबाडल्याचे आणि अत्याचार केल्याचे प्रकरण पुढे आले आहे.यामध्ये अनेक राजकीय धेंडे देखिल सहभागी असल्याचे बोलले जात आहे जर कुंपणच शेत खात असेल तर गरीब माय बाप जनता न्याय कुणाकडे मागायची ? असा सवाल उपस्थित होतो.विशेष म्हणजे महाराष्ट्राच्या राष्ट्रवादी महिला प्रदेश आघाडीच्या अध्यक्षा तसेच राज्य महिला आयोगाच्या तत्कालीन अध्यक्षा रुपाली चाकणकर यांची या प्रकरणात संशयास्पद भुमिका असल्यामुळे त्यांना या प्रकरणात सहआरोपी करुन तत्काळ अटक करणे गरजेचे आहे. राज्यातील महिलांना ज्या पदावरुन न्यायदान करायचे असते त्याच पदाचा गैरवापर करुन खरातच्या आश्रमात चालणाऱ्या अमानवी कृत्यांना खतपाणी घातले आहे त्यामुळे त्यांना कोणत्याही महत्वाच्या पदावर राहण्याचा अधिकार नाही. भोंदूबाबा अशोक खरात याने अनेक महिलांना, अल्पवयीन मुलींना करंट देवून अत्याचार केल्याचे अनेक कारनामे पुढे येत आहेत महिला, मुलींचे जिवन बरबाद करणाऱ्या या स्वयंमघोषित भोंदूबाबा कॅप्टन अशोक खरात यासह त्याच्या चरणी लीन होणाऱ्या अनुयायांवर आणि राजकीय नेत्यांवरही कठोर कारवाई व्हायला पाहिजे.

**राजू जाधव**

# 'सखी गं सखी' नाट्य प्रयोगाने जिंकली प्रेक्षकांची मने

७१ वा कामगार कल्याण मंडळ हौशी मराठी नाट्य स्पर्धा ललित कला भवन येथे लेखक डॉ. पराग घोंगे लिखित आणि किशोर श्रीरामजी पाचकवडे दिग्दर्शित, भाऊसाहेब लिमयें सभागृहात झालेल्या 'सखी गं सखी' सन्मान स्त्री शक्तीचा या नाट्य प्रयोगाने जिंकली प्रेक्षकांची मने.

'सखी गं सखी' नाट्यप्रयोगाची सुरुवात रंगमंचावर एक कार्यक्रम दाखवला जातो. 'सखी गं सखी', जो केवळ स्त्रियांसाठी आणि स्त्रियांच्या अनुभवांवर आधारित आहे.तो एक टॉक शो आहे, जिथे स्त्रियांच्या संघर्ष, अनुभव, आणि दृष्टिकोनाचा आर्त, जिवंत आणि सर्जनशील आवाज समोर येतो.प्रतिमा १ कार्यक्रमाची सूत्रसंचालिका. ती प्रगल्भ, समजूतदार आहे. ती विचारपूर्वक प्रश्न विचारते, पण कधीमधी टीव्ही शोच्या शैलीत थोडा 'glamourised' टोनही आणते.प्रतिमा २ तिचे नावही प्रतिमा. ही एक विचारवंत, माध्यमातून स्त्रीवाद जपणारी, अनुभवांनी परिपक्व झालेली स्त्री आहे. ती अभिनय, सिनेमा, दूरदर्शन यातून स्त्रीच्या भूमिका सशक्त करते.यात नाटकाचा आशय असा आहे की,स्त्रीच्या व्यावसायिक आणि वैयक्तिक प्रवासातले सत्य माध्यमांचा प्रभाव आणि स्त्रीच्या प्रतिमेवरचा परिणाम, संघर्ष, वाट पाहणे, प्रामाणिकपणा, आणि आकांक्षा यांचा संगम आहे.'सखी गं सखी' सन्मान स्त्री शक्तीचा हे एक संवादप्रधान नाटक आहे, जिथे फक्त दोन पात्रांमधून संपूर्ण स्त्रीविश्व उभे राहते.त्यात नाट्यमय उतार-चढाव आहेत, सोबतच विचारांचा खोल झरा आहे जो थेट मनात जातो. आणि प्रेक्षकांच्या मनात जावून बदल घडवतो.ही नाट्य रचना नाटककाराच्या मते स्त्रीच्या वास्तव जीवनातील अनुभव, गोंधळ, संघर्ष, आणि तिचा अंतर्मनाशी चाललेला संवाद हे सर्व प्रामाणिकपणे मांडणे म्हणजेच 'सखी गं सखी' सन्मान स्त्री शक्तीचा.



या नाट्यप्रयोगत एकूण ८ प्रवेश आहेत. प्रत्येक प्रवेश स्त्रीच्या आयुष्यातील वेगवेगळे पात्र, प्रतिमांचा उलगडा होत जातो.यात नाटकाची सुरुवात एका मुलाखतीने होते.बोलता बोलता प्रतिमा पुढील प्रतिमेत स्वतःला त्या त्या पात्राच्या साच्यात एका आगळ्या वेगळ्या प्रयोगात सादर करताना दिसतात. याचे सगळे श्रेय नाटकाच्या दिग्दर्शकांना जाते. प्रतिमा आपला प्रवास,कधी आई आणि मुलगी, कधी सुन आणि सासू, तर कधी ऐकाच सोसायटीतील शेजारण, तर कधी वृद्धाश्रमातील आपल्या मरणाची वाट बघणाऱ्या दोन म्हाताऱ्या,कधी सख्ख्या दोन बहिणी,कधी समाजाला भ्रमिष्ट करणारी साध्वी आणि शिष्या, किंवा सगळ्यात शेवट फक्त आणि फक्त निखळ स्त्री जी फक्त स्वतःच्या जगण्याकरिता धडपडते आहे.

यातील प्रत्येक प्रवेश कलाकार जिवंत करण्यात यशस्वी ठरले आहे. दोनच पात्र असूनही पाठांतर अगदी चोखंदळ होते. संपूर्ण संहिता दोन्ही पात्रांनी अगदी सहजरित्या सादर केली जणू ही काही त्यांचेच कथानक आहे,असे प्रखरतेने जाणवले. म्हणूनच लेखकांच्या लेखणीतूनच जसे, गुरु फक्त तुम्हांला मार्ग दाखवत असतो पण चालावे तर तुम्हांलाच लागते.दिग्दर्शन अती उत्तम झाले, सोबतच सादरीकरण छान होते.

या नाटकात कुठलाही वरवरचा संघर्ष,जसे की भांडण, घटना, वा दुःखद प्रसंग नाही.हा नाट्य प्रयोग जणू समाजाचा खरा खुरा आरसाच आहे हेच या नाटकात दाखविण्याचा चोखंदळ प्रयत्न केलेला आहे.नाटकाचा शेवट एखाद्या निष्कर्षावर होत नाही.ते संपताना प्रेक्षकांच्या मनात अनेक प्रश्न सोडून जाते.स्त्री आजही दुसऱ्याच्या चौकटीत राहते का? तिची स्वतंत्र ओळख तयार झाली आहे का? माध्यमे तिची मदत करता की वापर? हा शेवट म्हणजे विचार करायला लावणारी शांतता आहे.'सखी गं सखी' सन्मान स्त्री शक्तीचा हा नाट्य प्रयोग म्हणजे स्त्रीच्या आयुष्याच्या चढउतारांचा, संघर्षांचा आणि स्वत्वाच्या शोधाचा एक प्रामाणिक, सुसंवादी आणि विचारप्रवृत्त करणारा नाट्यप्रवास आहे.पण या दोघींच्या संवादात 'विचारांचा संघर्ष' आहे.यात प्रतिमा १ च्या भूमिकेमध्ये आचल गजभिये, २ मध्ये अल्केशा खलोकर या कलाकारांनी आपली कला सादर केलेली आहे.

किशोर पाचकवडे या नवोदित नव्या दमाचा तरुण दिग्दर्शकाने दाखवून दिले की संयम आणि मेहनतिने आपले काम केले तर काहीच अशक्य नाही. नाटकात मृणाली मेश्राम. प्रतिका तेलगोटे,कल्पना पुरोहित. प्रकाश योजना : किशोर पाचकवडे . रंगभूषा : कुंदा वंजारी..वेशभूषा मृणाली मेश्राम. पार्श्व संगीत सागर उदासी. नैपथ्य रविना भुरभुरे आदी कलाकारांचा सहभाग आहे.

**शेखर श्रीराम**

## आशेच्या किरणात प्रेमाची चादर ओढणारे

# 'अजूनही चांदरात आहे'



## एक टक नाटक

**समीक्षण**

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ अंतर्गत, ७१ वा प्राथमिक नाट्य महोत्सव २०२५-२६. स्व.भाऊसाहेब लिमये सिपना कॉलेज अमरावती, येथे १८ वे नाटक कामगार कल्याण केंद्र करंजा यांनी 'अजूनही चांदरात आहे' हे इरफान मुजावर लिखित नाटक सादर केले.

गायन रियाज करणारी सकाळ प्रहरी मधुरा व ऑफिसच्या तयारीत काही तरी शोध घेणारा मिहीर. नाटकाचा आरंभ आनंदी कुटुंब विनोदी संवादाने करतात. मध्यमवर्गीय कुटुंबाचे शहरीकरणात जगण्याचे स्वप्न,पती-पत्नी शेअर करताना प्रेमाची घट्ट नाती मदुरा व मिहीर यांच्या संसारात सुरू.घाईत पोळी जळाली आणि हात पोळला त्यावर मिहिरची प्रेमळ फुंकर.ऑफिसला निघून गेल्यानंतर मधुरा घर आवरते.मिहिर परत येऊन टीव्हीवर मनोरंजन करीत असताना मधुरा वडिलाचे बद्दल काळजी व्यक्त करते, आजारपणात पैसे अभावीची विवंचना.मिहीर सांत्वन करून तरतूद करणाची तयारी दर्शवून मधुरा आणखीच मिहीरबद्दल लाडीक होते.एवढ्यात मोबाईल वरील मॅसेजने मिहीर शंका व्यक्त करते.साहेब कोण? मिस यू कुणाला म्हणतो? मधुरावर संशय.ती सर्व खुलासा करून वडीलांना साहेब म्हणून सन्मान देते अशी स्पष्टता करून मिहीरचे लग्नापूर्वीचे लफडे व त्यात मिहीर करीत असलेल्या हरकती,मात्र प्रेम करून मधुराने त्याला ही समजून घेऊन थाटलेला संसार.शहरी जीवनात स्वप्न थाटायला मेहनत अन् पैसा हवा. दोघांनी जॉब करावा हा प्रस्ताव. अचानक मधुरा चक्कर येऊन पडणार तोच मिहिर तिला सावरतो.पित्त वाढले असणार म्हणून औषधी देतो तेव्हा मधुरा गोड बातमी सांगते.

मिहीर आनंदी होतो पण एकट्याचे पगारात हे सर्व सावरणार नाही म्हणून गर्भपात करायला लावतात.मित्राला गोळ्या मागतो.एवढ्यात ऑर्डर केलेला पिझ्झा येतो.गर्भपातची गोळी व पिझ्झाचे बिल सारखेच.मधुरा अस्वस्थ किती सामंजस्यने घ्यायचे या भूमिकेत स्वतःला सावरते.मधुराचा जॉब सुरू,मिहीर ऑफिसातून परत आल्यावर अस्वस्थ असतो. ऑफिसमध्ये मिहिर बॉसचे पत्नीला मिहिर आवडतो त्यात ती त्याला ब्लॅकमिलिंग करते असे मधुराला सांगतो.हातून घडलेली चूक बॉसचे पत्नी सोबत लैंगिक संबंध झाल्याचे कबूल. मधुरा तुटून जाते पण सावरते. मात्र मिहीर फार अस्वस्थ, बॉसने केलेली शिक्षा मधुरा सोबत एक रात्र घालण्याची अट. ऑफिसचे सर्व प्रकरण निस्तारण्याबद्दल विनंती.त्यावेळी मधुराच्या आयुष्यातील ही सत्व परीक्षा. मिहीरसाठी ती तयार, बॉसकडे गुलाबी साडी नेसून मिहीर अस्वस्थपणे तिची पाठवणी करतो.मधुरा बॉस ला भेटून येते.पाठोपाठ बॉस येतो. मुंगूस व कुंभारीनची गोष्ट सांगून गैरसमजबद्दलची शिकवण देऊन, झालेल्या प्रसंगातून मधुराची भूमिका स्पष्ट करतो. बॉस मिहीरला संसार सांभाळण्याची समज देतो.पुन्हा नव्याने मधुरा-मिहीर स्वप्न रंगवते.

शहरी जीवन जगताना..स्वप्न साकारताना..प्रेमात सर्वस्व उधळून देणारी स्त्री किती सामंजस्य करून स्वतःची आहुती देते ह्या शिखर बिंदूवर नाटकाचे कथानक, मात्र मिहीर हा गावरान कलाकार भाषा संवादातून दिसत होता.अभिनयात घुसण्याचा प्रयत्न कुणाचाच झाला नाही.डिलिवरी बॉयचे स्थळी मॅन व बॉस एन्ट्री करून बैठक घेण्याऐवजी थेट संवाद.नेपथ्य अगदी साधे.नाटकात फक्त पाठांतर,अभिनयावर काम नाही.प्रकाश योजना जागोजागी स्थिरावली नाही.संगीत शून्यावत या नाटकाचा प्रयोग.मिहीर सतीश पवार,मधुरा आरु राठोड, बॉस रोनल फुलझेले व डिलिवरी मॅन अक्षय मिश्रा यांनी भूमिका केल्या. सतीश पवार यांच्या दिग्दर्शनात 'अजूनही चांदरात आहे' ऐवजी अनुस्वाराच्या अनुपस्थितीत 'अजूनही चांदरात आहे' अशा दिशेने नाटक घासले.कामगार कल्याण मंडळ हौशी कलाकारांना देत असलेल्या संधीचे सोने करा असे आवाहन करतो.

**कबीर फादर**
मो.७७९८६४५५६५

# शेत रस्त्याच्या कामात अनियमिततेचा आरोप ; चौकशीकडे दुर्लक्ष



■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील मळसूर येथे सुरू असलेल्या शेत रस्त्याच्या कामात अनियमितता होत असल्याचा आरोप पुढे आला असून, याबाबत करण्यात आलेल्या तक्रारीनंतरही प्रशासनाकडून चौकशीकडे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे.

सामाजिक कार्यकर्ते शुभम थिटे यांनी ६ मार्च रोजी पातूर तहसीलदारांकडे लेखी तक्रार करून संबंधित कामाची चौकशी करण्याची मागणी केली होती. मात्र दोन आठवड्यांहून अधिक कालावधी उलटूनही कोणतीही ठोस कारवाई अथवा पत्रव्यवहार झालेला नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे. तक्रारीनुसार, मळसूर येथे सुमारे दीड किलोमीटर लांबीच्या शेत रस्त्याचे काम मनरेगा अंतर्गत मंजूर असताना, नियमांनुसार मजुरांचा वापर न करता थेट जेसीबी मशीनद्वारे काम करण्यात येत आहे. तसेच मोठ्या प्रमाणात मुरूम व गिट्टीचा वापर करूनही केवळ ४० ते ५० ब्रास इतकीच रॉयल्टी दाखवण्यात आल्याने महसूल विभागाचे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा दावा करण्यात आला आहे. या प्रकरणात संबंधित कंत्राटदार व अभियंता यांची मिलीभगत असल्याचाही संशय व्यक्त करण्यात आला आहे. दरम्यान, तहसीलदारांनी या प्रकरणी चौकशी अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते. मात्र अद्याप अहवाल प्राप्त न झाल्याने आदेशांची अंमलबजावणीच होत नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे शासनाच्या निधीचा दुरुपयोग होत असल्याची चर्चा असून, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.

### तहसीलदारांच्या आदेशाची पायमल्ली?

तक्रारीनंतर तहसीलदारांनी चौकशीचे निर्देश दिले होते. मात्र दोन आठवडे उलटूनही संबंधितांकडून अहवाल सादर न झाल्याने आदेशांची पायमल्ली होत असल्याचे स्पष्ट होत आहे.

'रस्त्याचे काम थातूरमातूर करून देयक हडपण्याचा प्रयत्न होत असल्याबाबत ६ मार्च रोजी तक्रार केली होती. मात्र अद्याप कोणतीही चौकशी किंवा पत्रव्यवहार झालेला नाही. शासनाचे लाखो रुपये हडपण्याचा प्रयत्न होत आहे,' असे सामाजिक कार्यकर्ते शुभम थिटे यांनी सांगितले.

# खरुजग्रस्त मोकाट कुत्र्यांचा कहर
## विव–यात त्वचारोगांचा वाढता धोका

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील विवरा गावात गेल्या काही महिन्यांपासून खरुजग्रस्त मोकाट कुत्र्यांचा त्रास मोठ्या प्रमाणात वाढला असून, यामुळे गावातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेषतः लहान मुलांच्या आरोग्यावर याचा विपरीत परिणाम होत असल्याचे समोर आले आहे.

गावात रस्त्यावर व वस्तीभागात मोठ्या संख्येने भटक्या कुत्र्यांची वर्दळ आहे. अनेक कुत्र्यांना त्वचारोग (खरुज) झालेला असून, हे कुत्रे मुक्तपणे फिरत असल्याने मुलांचा त्यांच्याशी संपर्क येत आहे. परिणामी काही मुलांमध्ये खाज, पुरळ तसेच त्वचेच्या इतर तक्रारी वाढत असल्याचे पालकांनी सांगितले.



या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांनी स्थानिक प्रशासन, ग्रामपंचायत व पशुवैद्यकीय विभागाकडे तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. संबंधित कुत्र्यांवर उपचार, लसीकरण व त्यांचे नियंत्रण करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याची गरज व्यक्त होत आहे. तसेच आरोग्य विभागाने गावात तपासणी शिबिर घेऊन नागरिकांना मार्गदर्शन करावे, अशी मागणीही होत आहे.

दरम्यान, परिस्थिती गंभीर होत असतानाही प्रशासनाकडून ठोस पावले उचलली जात नसल्याची नाराजी ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

### संसर्गाचा धोका वाढला; प्रशासनाचे दुर्लक्ष

विवरा गावात खरुजग्रस्त मोकाट कुत्र्यांमुळे त्वचारोगाचा संसर्ग वाढण्याची भीती व्यक्त होत आहे. काही मुलांवर उपचार सुरू असून, परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाण्यापूर्वी प्रशासनाने तातडीने दखल घेण्याची गरज असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

# रामत्व जागवा, संकटांवर विजय मिळवा' - डॉ. भूषण फडके

■ प्रतिनिधी | अकोला ■

जीवनातील प्रत्येक संघर्ष हा राम-रावण युद्धासारखाच असतो. या युद्धात विजय मिळवायचा असेल, तर दृढनिश्चय, विवेक आणि समर्पण या तीन गोष्टी अंगी बाळगाव्या लागतात. 'रामत्व' जागृत केल्याशिवाय जीवनातील संकटांवर मात करता येत नाही, असे प्रभावी प्रतिपादन रामकथाकार डॉ. भूषण फडके यांनी केले.

जठारपेठ येथील बिर्ला मंदिरात निलेश देव मित्र मंडळातर्फे आयोजित संगीत श्रीरामकथेचा पाचवा व अंतिम दिवस अभूतपूर्व उत्साहात पार पडला. 'श्रीरामांच्या' घोषात संपूर्ण परिसर दुमदुमून गेला आणि भाविक अक्षरशः भक्तिरसात तल्लीन झाले. अनेक भाविकांच्या मनात 'हा दिवस संपूच नये' अशी भावना निर्माण झाली. आजच्या निरूपणात युध्दकांड आणि उत्तरकांडातील अत्यंत हृदयस्पर्शी प्रसंगांची प्रभावी मांडणी करण्यात आली. कुंभकर्ण आणि इंद्रजिताचा पराभव, रावणवध, सीतेचे अग्निदिव्य, श्रीरामांचे अयोध्येत पुनरागमन आणि रामराज्याची स्थापना — या सर्व घटनांमधून 'सत्याचा विजय आणि अहंकाराचा अंत' हा संदेश अधोरेखित करण्यात आला. रामराज्याचे वर्णन



करताना त्यांनी सांगितले की, 'रामराज्य म्हणजे केवळ शासनव्यवस्था नाही, तर प्रत्येक व्यक्तीच्या मनातील संतुलन, कर्तव्य आणि नैतिकतेचा उत्सव आहे.' प्रभू रामांनी स्थापन केलेले 'रामराज्य' पुढे कलियुगात छत्रपती शिवाजी महाराजांनी 'हिंदवी स्वराज्य' म्हणून उभे केले. रामाचा आदर्श घेऊन शिवरायांनी अन्यायाविरुद्ध तलवार उचलली आणि धर्मवीर संभाजी महाराजांनी स्वतःचे बलिदान देऊन स्वधर्म टिकवला. डॉ. फडके यांनी सांगितले की, 'रावण हा केवळ एक व्यक्ती नसून तो अहंकार, लोभ आणि अन्यायाचे प्रतीक आहे; तर राम हे सत्य, संयम आणि कर्तव्याचे प्रतीक आहेत.' म्हणूनच प्रत्येकाच्या मनात चालणाऱ्या या युद्धात रामाला जिंकवणे म्हणजेच खरे जीवन जिंकणे होय. हनुमंताने संजीवनी आणून लक्ष्मणास जीवनदान दिले, हा प्रसंग सांगताना त्यांनी 'संकटसमयी धैर्य, वेगवान निर्णय आणि निःस्वार्थ भाव' यांचे महत्त्व स्पष्ट केले.

# ग्राहक हक्क संरक्षणासाठी सजगता महत्वाची -जिल्हाधिकारी

■ प्रतिनिधी | अकोला ■

ग्राहक संरक्षण कायद्यानुसार प्रत्येकाला ग्राहक म्हणून सुरक्षेचा, माहितीचा, म्हणणे मांडण्याचा, निवड करण्याचा अधिकार आहे. ग्राहक हक्कांच्या संरक्षणासाठी सजगता महत्वाची आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज येथे केले.

जिल्हा प्रशासन व जिल्हा पुरवठा विभागाच्या वतीने जागतिक ग्राहक दिनाचा कार्यक्रम काटेपूर्णा सभागृहात झाला, त्यावेळी त्या बोलत होत्या. अकोला जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे अध्यक्ष श्रीपाद कुलकर्णी, जिल्हा पुरवठा अधिकारी रवींद्र यन्नावार, सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी अर्चना निमजे यांच्यासह ग्राहक संघटनेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

**जिल्हा प्रशासनाच्या वतीने जागतिक ग्राहक दिन साजरा**



ग्राहकांचे हक्क राखून व्यवहारातील विश्वासार्हता टिकवणे, वृद्धिंगत करणे ही सशक्त समाजाची ओळख असते. ग्राहकांमध्ये जागरूकता वाढविण्यासाठी सर्वत्र प्रयत्न व्हावेत, असे आवाहन जिल्हाधिका-यांनी यावेळी केले. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे अध्यक्ष कुलकर्णी म्हणाले की, तंत्रज्ञानाच्या माध्यमातून विविध ग्राहक सेवा एका क्लिकवर आल्या असून ग्राहकांना कालबद्ध सेवा पुरवणे ही प्रत्येक विभागाची जबाबदारी आहे. ग्राहक जागरूकतेविषयी एक लघुनाट्यही यावेळी सादर करण्यात आले. यावेळी ग्राहक संघटनांचे प्रतिनिधी, विविध अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.


**अकोला महानगरपालिका, अकोला**
**विद्युत विभाग**

**निविदा सुचना क्र. ०८, (सन२०२५-२६) दुसरी वेळ**

अकोला महानगरपालिकेच्या विद्युत विभागा मनपा निधी (२०२५-२६) अंतर्गत स्वयंचलीत वाहतुक नियंत्रकाची (Automatic Traffice Signal) वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणे या कामा करीता स्वयंचलीत वाहतुक नियंत्रक (Automatic Traffice Signal) दुरुस्ती करण्याचा अनुभवधारक कंत्राटदार यांचे कडुन निविदा मागविण्यात येत आहे. संबंधीत इच्छुकांनी विस्तृत माहीती करीता खालील नमुद संकेत स्थळावर भेट द्यावी.

Portal https://amcakola.in

स्वा/ -
**शहर अभियंता**
अकोला महानगर पालिका, अकोला

जा.क्र./ अमनपा/विद्युत/२५०/२०२६,
विद्युत विभाग अकोला महानगरपालिका, अकोला
दिनांक : २३/०३/२०२६


# श्री आरएलटी विज्ञान महाविद्यालयात 'जागतिक वन दिन' निमित्त व्याख्यान संपन्न



■ प्रतिनिधी | अकोला ■

स्थानिक श्री आरएलटी विज्ञान महाविद्यालयाच्या पर्यावरण कक्ष, वनस्पतीशास्त्र विभाग आणि निसर्ग कट्टा अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक वन दिनानिमित्त 'वन, पर्यावरण आणि वन्यजीव' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम दिनांक २३ मार्च २०२६ रोजी महाविद्यालयाच्या सभागृहात संपन्न झाला.


या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. डी. चंद्रवंशी होते. प्रमुख वक्त्या म्हणून सामाजिक वनीकरण विभाग, अकोला येथील सहाय्यक वनसंरक्षक कु. सुवर्णा इंगोले उपस्थित होत्या. त्यांनी आपल्या मार्गदर्शनात वनांचे पर्यावरणीय महत्त्व, जैवविविधतेचे संवर्धन, सध्याची पर्यावरणीय आव्हाने तसेच शाश्वत विकासासाठी सामाजिक वनीकरणाची भूमिका याविषयी सविस्तर माहिती दिली. यावेळी निसर्ग कट्टा संस्थेचे अध्यक्ष श्री अमोल सावंत यांनी वन विभागाच्या भूमिकेविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची सुरुवात स्वागत व प्रास्ताविकाने झाली. प्रास्ताविकात पर्यावरण कक्षाचे समन्वयक व वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. पी. एम. खडसे यांनी कार्यक्रमाचे उद्दिष्ट स्पष्ट केले. या प्रसंगी वन विषयावर उत्कृष्ट प्रकल्प सादर केलेल्या ६ विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. व्याख्यानानंतर प्रश्नोत्तर सत्रात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून विविध शंका मांडल्या. या कार्यक्रमाचे आयोजन सचिव म्हणून डॉ. शैलेंद्र व्ही. मडावी यांनी काम पाहिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री निलेश सोनोने यांनी केले, तर आभार प्रदर्शन शुभांगी काळे यांनी केले. या कार्यक्रमास आयक्यूएसी समन्वयक डॉ. आर. एल. रहाटगावकर, डॉ. अंजली ए. सांगोळे, डॉ. वैशाली एन. बडगुजर, तसेच वनस्पतीशास्त्र विभागाचे सर्व प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन पर्यावरण कक्ष व वनस्पतीशास्त्र विभागाच्या सहकार्याने करण्यात आले.

# 'वंदे मातरम' गीताला दीडशे वर्षे पूर्ण
## नियोजनभवनात सामूहिक गायन; शहिदांना अभिवादन

■ प्रतिनिधी | अकोला ■

'वंदे मातरम' गीताला दीडशे वर्षे पूर्ण झाल्याबद्दल जिल्ह्यात विविध ठिकाणी सामूहिक गायन आयोजित करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयात नियोजनभवनात 'वंदे मातरम'चे सामूहिक गायन झाले.

थोर क्रांतिकारक शहीद भगतसिंग, राजगुरू व सुखदेव यांच्या स्मृतीदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. अपर जिल्हाधिकारी प्रमोद गायकवाड , मनपा आयुक्त डॉ सुनील लहाने, निवासी उपजिल्हाधिकारी गजेंद्र



मालठाणे यांच्यासह जिल्ह्यातील तहसीलदार उपस्थित होते.

सर्व जनमानसात देशभावना जागृत होण्यासाठी या गीताने महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. हे गीत स्वातंत्र्यलढ्याचा आत्मा ठरले. आजही व सदैव हे गीत युवकांसाठी स्फूर्तीदायी आहे, अशी भावना विविध मान्यवरांनी यावेळी व्यक्त केली.


**जाहीर नोटीस**

सर्वत्र जनतेस वित्तीय संस्थाना बँकांना या जाहीर नोटीस द्वारे कळविण्यात येते कि आमचे पक्षकार पिरामल फायनान्स लि. शाखा - अकोला ता. जि अकोला यांनी ग्राहक नामे श्री. संजय गुलाबसिंग राठोड रा. बोरमाळी ता. बार्शीटाकळी जि. अकोला यांनी आमचे पक्षकाराकडे सदरची मिळकत गहाण ठेऊन कर्ज मिळण्या करीता अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन :**

मौजे -बोरमाळी मालमत्ता क्र.१२१, क्षेत्रफळ १०८९ चौ.फु. (१०१.१४ चौ.मी.) व त्यावरील बांधकामा सह ग्रा. पंचायत बोरमाळी, हद्दीतील, ता. बार्शीटाकळी जि. अकोला.

त्यास चतुर्सिमा : पूर्वेस :- खुली जागा आणि रंजीत राठोड यांचे घर पश्चिमेस :-ग्राम पंचायत रस्ता उत्तर :- खुली जागा आणि पातूर रस्ता दक्षिण :- वत्सलाबाई राठोड यांचे घर, वरील सदरहू मालमत्ता हि. श्री. संजय गुलाबसिंग राठोड यांच्या नावे आहे. तरी वरील मालमत्तेवर आज रोजी कुणाचाही कसल्याही प्रकारचा हक्कसंबंध, खरेदी, गहाण, बोजा व ईसार व इतर काही व्यवहार असल्यास वर दिलेल्या पत्यावर ७ दिवसाच्या आत लेखी हरकत नोंदवावी अन्यथा कोणाचाही कसल्याही प्रकारचा आक्षेप नाही. असे समजून आमचे पक्षकार पिरामल फायनान्स लि. शाखा -अकोला वरील मालमत्ता गहाण ठेऊन वरील ग्राहक यांना कर्जाची रक्कम वितरित करतील त्या नंतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा उजर चालणार नाही करीता जाहीर नोटीस.

दिनांक : २३/०३/२०२६
ठिकाण : अकोला

**अधिवक्ता रुपेश ना. इस्तापे**
(नोटरी भारत सरकार)
ऑफीस: आनंद बेकरी जवळ, रामदास पेठ, अकोला मो. ९४२३४३०१७१



**Change In Name**

I Have Changed My Name From
**FATHIMA**
-TO-
**FATHIMA MOHAMMAD HANIF**
Passport No :- M4761036
My Residential Address in:- Neeta Guest House ke Piche Kalal Ki Chal Akola 444001

**Change In Name**

I Have Changed My Name From
**MOHAMMAD MALK**
-TO-
**MOHAMMAD MALIK MOHAMMAD HANIF**
Passport No :- P7167737
My Residential Address in:- Neeta Guest House ke Piche Kalal Ki Chal Akola 444001

**Change In Name**

My Old passport Name
**MOHAMMAD SABIR**
my new name is
**MOHD SABIR MOHD ZAHEER**
Old passport no J8885950
Address - Bada Alawa Akot Dist Akola 444101 (MS)

**Change In Name**

My Old passport name
**SHAHNAZ BI**
my new name is
**SHAHNAZ BI MOHD SABIR**
Old passport no J8885951
Address Bada Alawa Akot Dist Akola 444101 (MS)



**जाहीर नोटीस**

**वि. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ३५९/२०२६ प्रोसेस नं.३२५०/२०२६
चौ.ता. १३/०४/२०२६ दिनांक : १०/०३/२०२६

**अर्जदार :** १. मीरा सुनिल खेडकर २. सुनील महादेव खेडकर ३. अंकीता सुनिल खेडकर सर्व रा. वडद, बु, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : गौरव सुनिल खेडकर
**पत्ता :-** रा. वडद, बु, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत गौरव सुनिल खेडकर यांचे दि. ०८/११/२०२५ रोजी आयकॉन हॉस्पिटल, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १३/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १०/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला



**जाहीर नोटीस**

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ३३९/२०२६ प्रोसेस नं.३०७४/२०२६
चौ.ता. १५/०४/२०२६ दिनांक : ०६/०३/२०२६

**अर्जदार :** १. हाजरा बी सैय्यद इशाक रा. रेल्वे स्टेशन जवळ, बोरगाव मंजू, ता. जि. अकोला. २. सैय्यद नौशद सैय्यद इशाक रा. बोरगांव मंजू, ता. जि. अकोला. ३. शाहेदा परवीन शेख लियाकत रा. रझा किरण जवळ, बोबडे कॉलनी, खामगांव, ता खामगांव जि. बुलढाणा. ४. निगार बी शेख कलिम रा. रझा किरण जवळ, बोबडे कॉलनी, खामगांव, ता खामगांव जि. बुलढाणा.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : सैय्यद इशाक सैय्यद याकुब
**पत्ता :-** रा. बोरगांव मंजू, ता. जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सैय्यद इशाक सैय्यद याकुब यांचे दि. १२/१०/२०२१ रोजी अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १५/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०६/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला



**जाहीर नोटीस**

**अकोला येथील वि. ०९ वे सह दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ३४/२०२६ प्रोसेस नं.१४०२ (A)/२०२६
चौ.ता. १०/०४/२०२६ दिनांक : ०२/०२/२०२६

**वादी :-** श्रीकांत नंदकिशोर सदाबल
रा. फ्लॅट नं. ६०१ बी विंग, ६ वा माळा, कॉसमॉस बिल्डिंग, वृंदावन फ्लोरा, व्हीटीसी, चांबरली, पो. मोहापाडा, जि. रायगड.

**विरुध्द**

**प्रतिवादी:-** महाराष्ट्र सरकार तर्फे जिल्हाधिकारी अकोला
जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला. ता. जि. अकोला.

ज्याअर्थी उपरोक्त वादी श्रीकांत नंदकिशोर सदाबल यांचे पिता नंदकिशोर पांडुरंग सदाबल हे दिनांक २५/१०/२००७ रोजी मृत झाले आहेत. वादीच्या वडिलांना सुभाष पांडुरंग सदाबळ नावाचे भाउ होते व ते वादीचे सख्खे काका होते. सदर सुभाष पांडुरंग सदाबल हे ०७.११.२००७ पासुन बेपत्ता आहेत आणि तेव्हापासून ज्यांना त्यांची खबरबात होती किंवा आहे अशा कोणालाही त्यांची माहिती मिळालेली नाही. त्यामुळे उपरोक्त वादी यांनी सुभाष पांडुरंग सदाबल यांना विधीदृष्टया मयत घोषीत करणेसाठी या न्यायालयात दावा दाखल केला आहे.

त्याअर्थी उपरोक्त दाव्यास कोणाची कसल्याही प्रकारची काहिही हरकत असल्यास त्यांनी दिनांक १०/०४/२०२६ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत वि न्यायालयामध्ये हजर होवून आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०२/०२/२०२६ रोजी अकोला येथे माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला



**जाहीर नोटीस**

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ४१९/२०२६ प्रोसेस नं.३६९९/२०२६
चौ.ता. २८/०४/२०२६ दिनांक : १७/०३/२०२६

**अर्जदार :** १. विमलबाई क्रांतीकुमार लास्कर रा. कॅनवल जवळ, गायत्री नगर, बाळापुर नाका, अकोला. ता. जि. अकोला. २. सुनिता यशवंत खापरे रा. हनुमान मंदिर जवळ, औतकरवाडी, गायत्री नगर, बाळापुर रोड, जुने शहर,अकोला. ता. जि. अकोला. ३. सुनिल क्रांतीकुमार लास्कर रा. बाळापुर रोड, गायत्री नगर, औतकरवाडी, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला. ४. दिपक क्रांतीकुमार लास्कर रा. बाळापुर रोड, हनुमान मंदिराजवळ, गायत्री नगर, औतकरवाडी, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : क्रांतीकुमार वामनराव लास्कर
**पत्ता :-** रा. गायत्री नगर, औतकरवाडी, बाळापुर रोड, जुने शहर, अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत क्रांतीकुमार वामनराव लास्कर यांचे दि. ०५/०८/२०१८ रोजी राहते घरी गायत्री नगर, औतकरवाडी, बाळापुर रोड, जुने शहर, अकोला. येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २८/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १७/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला



**जाहीर नोटीस**

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ४३५/२०२६ प्रोसेस नं.३७०७/२०२६
चौ.ता. २९/०४/२०२६ दिनांक : १७/०३/२०२६

**अर्जदार :** १. ईश्वरी प्रतिभा डांगे (ईश्वरी गणेश डांगे) २. कांचन गणेश डांगे सर्व रा. चैतन्यवाडी, लहान उमरी, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : प्रतिभा रामभाउ डांगे
**पत्ता :-** रा. चैतन्यवाडी, लहान उमरी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत प्रतिभा रामभाउ डांगे यांचे दि. १६/०१/२०२६ रोजी राहते घरी चैतन्यवाडी, लहान उमरी, अकोला, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २९/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १७/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला



जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ११०**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम



# मातीच्या कुशीतला अखेरचा श्वास...!

## पवनारने आपल्या लेकराला दिला अश्रुपूर्ण निरोप



पवनार आज शब्दांच्या पलीकडे गेले आहे. गाव शांत आहे, पण त्या शांततेत एक गहिवर दडलेला आहे. वाऱ्याची झुळूकही जणू थबकली आहे, कारण आज या मातीने आपल्या लेकराला दत्ता राघोबाजी मेघे शेवटचा निरोप दिला आहे.ही केवळ एका नेत्याच्या अंताची बातमी नाही,हा एका काळाचा, एका भावनेचा, एका आधारवडाचा अस्त आहे.

**जन्मभूमीतच शेवटचा विसावा आयुष्याचा पूर्णविराम**

पवनार हे त्यांचे जन्मगाव. इथेच त्यांनी बालपणाचे कष्ट अनुभवले, दहावीपर्यंत शिक्षण घेतले आणि आयुष्याची पहिली स्वप्नं पाहिली. हीच माती त्यांच्या संघर्षाची साक्षीदार होती. आणि म्हणूनच त्यांनी एक इच्छा मनात जपून ठेवली होती, माझा शेवटचा निरोप माझ्या गावीच व्हावा.त्या इच्छेनुसार, त्यांच्या स्वतःच्या शेतात अंत्यसंस्काराची तयारी करू आज त्यांना अखेरचा निरोप शासकीय इतमामात देण्यात आला.

**पवनार मेघे' : एक नातं, जे कधी तुटलं नाही**

या गावाची ओळखच पवनार-मेघे अशी बनली होती.लहानपणीच्या हलाखीच्या परिस्थितीत त्यांनी आईस्क्रीम विकून दिवस काढले, हे ते स्वतः सांगत. संघर्षाच्या त्या वाटेवरून चालत ते पुढे यशाच्या शिखरावर पोहोचले पण त्या प्रवासात त्यांनी कधीही आपल्या मुळांचा विसर पडू दिला नाही.वर्ध्यात एका छोट्याशा खोलीतून सुरू झालेलं आयुष्य,पुढे मोठ्या घरात, मोठ्या संस्थांमध्ये आणि मोठ्या नावात परिवर्तित झालं. पण पवनारमध्ये उभारलेलं त्यांचं घर हे केवळ निवासस्थान नव्हतं ते गावकऱ्यांसाठी आधाराचं केंद्र होतं.गावातील कोणताही कार्यक्रम असो साहेबांची उपस्थिती आणि मदतीचा हात नेहमी तयार असायचा. त्यांच्या वागण्यात कधीही दुरावा नव्हता, ते प्रत्येकाशी 'आपलेच' म्हणून वागत.

**अश्रूंनी भारलेला निरोप घोषणांमध्ये दडलेली वेदना**

आज पवनारच्या शिवारात हजारो लोकांची गर्दी उसळली होती. 'मेघे साहेब अमर राहो'च्या घोषणांनी वातावरण दुमदुमलं, पण त्या घोषणांमागे एक खोल पोकळी होती.अनेकांच्या डोळ्यांतून अश्रू वाहत होते,कारण हा निरोप फक्त एका व्यक्तीला नव्हता, तर एका जिव्हाळ्याच्या नात्याला होता.त्यांच्या पार्थिवावर स्वतःच्या शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले. जिथून त्यांनी आयुष्याची सुरुवात केली, तिथेच त्यांनी शेवटचा श्वास घेतला हीच त्यांच्या आयुष्याची खरी ओळख ठरली.

**दानशूरतेचा वारसा माणुसकीची उभी शिदोरी**

दत्ता राघोबाजी मेघे यांचा खरा ठेवा म्हणजे त्यांनी उभारलेली माणसं. शिक्षण संस्था, वैद्यकीय महाविद्यालये आणि सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून त्यांनी हजारो कुटुंबांना नवा श्वास दिला.त्यांचं देणं कधीच प्रसिद्धीसाठी नव्हतं ते मनापासून होतं.एखाद्या गरजूला मदत करताना त्यांनी कधीच कॅमेऱ्याचा विचार केला नाही; त्यांनी फक्त माणुसकी जपली.त्यांच्या संस्थांमधून घडलेले डॉक्टर, अभियंते आणि कर्मचारी हेच त्यांच्या कार्याचं जिवंत स्मारक आहेत.

**आधारवड कोसळला पण सावली अजूनही आहे**

आज विदर्भाने आपला आधारवड गमावला आहे.पवनारने आपला लेकरू हरवला आहे.पण हा अंत नाही,कारण त्यांनी पेटवलेला शिक्षणाचा दीप, समाजसेवेची ज्योत आणि माणुसकीची ओळख अजूनही जिवंत आहे.त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी कधीच भरून निघणार नाही, पण त्यांच्या आठवणी प्रत्येकाला उभं राहण्याची ताकद देतील.

**शेवटचा शब्द जो कधीच संपणार नाही**

पवनारच्या मातीवर आज एक ठसा उमटला आहे, अश्रूंचा, अभिमानाचा आणि कृतज्ञतेचा.काळ पुढे सरकेल आठवणी धूसर होतील पण काही माणसं अशी असतात, जी काळाच्या पलीकडे जातात.दत्ता राघोबाजी मेघे हे त्यापैकीच एक जे 'इतिहासात' नव्हे, तर 'मनात' कायम जिवंत राहतील.भावपूर्ण श्रद्धांजली

■ रवींद्र लाखे

# २५ वर्षांची फसवणूकः एकाच भागात काहींना पट्टे, काहींना केवळ आश्वासने

## देवळीत पट्टेप्रश्न ऐरणीवर; नागरिकांची खासदारांकडे धाव

**देवळी/जनमाध्यम**

शहरालगतच्या वार्ड क्रमांक ३ मधील रहिवाशांचा दीर्घकाळ प्रलंबित असलेला पट्टे नियमाकुलीकरणाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. गेल्या २५ ते ३० वर्षांपासून या भागात वास्तव्यास असलेल्या अनेक नागरिकांना अद्याप मालकी हक्काचे कागद मिळाले नसल्याने त्यांनी खा.अमर काळे यांची भेट घेऊन आपली व्यथा मांडली.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित परिसर शासकीय नोंदीत 'झुडपी जंगल' म्हणून दर्शविण्यात आला आहे. मात्र, प्रत्यक्षात येथे अनेक वर्षांपासून नागरिकांचे वास्तव असून मोठ्या प्रमाणावर घरे उभी राहिली आहेत.



विशेष म्हणजे, याच भागातील काही घरांचे पट्टे नगर परिषदेकडून नियमाकुल करण्यात आले आहेत, तर अनेक नागरिकांचे प्रस्ताव अजूनही प्रलंबित आहेत.या भागात सुमारे ९०० च्या आसपास पट्टेधारक असल्याचे नागरिकांनी सांगितले. एकाच क्षेत्रात काहींना पट्टे मंजूर होणे आणि काहींना वारंवार नगर परिषदेकडे चकरा माराव्या लागणे, यामुळे रहिवाशांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक वर्षांपासून अर्ज करूनही ठोस निर्णय होत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

दरम्यान, नागरिकांनी खा.अमर काळे यांची भेट घेऊन हा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावण्याची मागणी केली. खासदारांनी या प्रकरणाची दखल घेत देवळी नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांशी संपर्क साधून वस्तुस्थिती जाणून घेतली. तसेच, संबंधित प्रकरणात तातडीने योग्य तो मार्ग काढण्याचे निर्देश दिले. नागरिकांनी खासदारांनी घेतलेल्या पुढाकाराबद्दल समाधान व्यक्त केले असून, प्रश्न पूर्णतः निकाली निघेपर्यंत पाठपुरावा सुरू ठेवण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.

देवळीतील हा प्रश्न आता स्थानिक प्रशासनासाठी महत्त्वाचा ठरत असून, यावर लवकर निर्णय होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# पाणी जपा, भविष्य वाचा; सामूहिक प्रयत्नांची गरज-डॉ.मनोहर नरांजे

**हिंगणघाट/जनमाध्यम**

जीवनाचा मूलाधार असलेल्या पाण्याचे जतन आणि संवर्धन ही केवळ गरज नसून सामूहिक जबाबदारी असल्याचे प्रतिपादन वणा नदी संशोधक डॉ. मनोहर नरांजे यांनी केले. जागतिक जल दिनानिमित्त वणा नदी संवर्धन समिती आणि नगरपरिषद हिंगणघाट यांच्या संयुक्त विद्यमाने संत गाडगेबाबा समाधी स्थळ परिसरात आयोजित जलपूजन कार्यक्रमात ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष डॉ. नयना तुळसकर होत्या. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते जलपूजन करण्यात आले. पक्षी अभ्यासक प्रवीण कडू यांनी जलसंवर्धनाची प्रतिज्ञा उपस्थितांकडून घेतली.डॉ. नरांजे यांनी जलसाक्षरतेचे महत्त्व अधोरेखित करत 'पाणी ही निसर्गाची अमूल्य देणगी असून, पुढील पिढ्यांसाठी त्याचे संवर्धन अत्यावश्यक आहे, असे सांगितले.जलतज्ज्ञ किशोर वरंभे यांनी पाणी आहे तर जीवन आहे, हा संदेश देत पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन केले. कार्यकारी अभियंता सुनील रहाणे यांनी प्रदूषित पाण्यामुळे होणाऱ्या आजारांबाबत माहिती दिली.नगराध्यक्ष तुळसकर यांनी शहरातील जलव्यवस्थापन, सांडपाणी प्रक्रिया व पाणीटंचाई टाळण्यासाठी उपाययोजना सुरू असल्याचे सांगितले. पर्यावरणपूरक उपक्रमांना नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले.यावेळी स्वच्छता अभियानात योगदान देणाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. विविध सामाजिक संस्था, विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# साहित्यविश्वात मानाचा मुजरा, मारोतराव नारायणे राज्यस्तरीय वाङ्मय पुरस्कार जाहीर

## 'पीळ' कादंबरीला सर्वोच्च बहुमान ; विविध साहित्यप्रकारांतील दिग्गजांचा गौरव

**वर्धा/जनमाध्यम**

महाराष्ट्राच्या साहित्यविश्वात सातत्याने नावीन्यपूर्ण उपक्रम राबवणाऱ्या मारोतराव नारायणे स्मृती प्रतिष्ठानतर्फे सन २०२६ चे राज्यस्तरीय वाङ्मय पुरस्कार जाहीर करण्यात आले असून यंदा विविध साहित्यप्रकारांतील गुणवंत लेखकांना सन्मानित करण्यात येणार आहे. यंदाच्या पुरस्कारांमध्ये उत्कृष्ट कादंबरी पुरस्कार दिवाकर कृष्ण आचार्य (अकोला) यांच्या 'पीळ' या कादंबरीला जाहीर झाला आहे. तर उत्कृष्ट कथासंग्रह पुरस्कार सूरज चौगुले (इस्लामपूर,











सांगली) यांच्या 'काठावरच्या चेहऱ्यांच्या कथा' या संग्रहाला मिळाला आहे.कवितेच्या क्षेत्रातही दमदार छाप उमटवत सखाराम डाखोरे (वसई, पालघर) यांच्या 'हूलबिगूल' या कवितासंग्रहाला उत्कृष्ट कवितासंग्रह पुरस्कार जाहीर झाला आहे. वैचारिक साहित्य क्षेत्रात आलोक जत्राटकर (कोल्हापूर) यांच्या 'समाज आणि माध्यमं' या लेखसंग्रहाची निवड झाली आहे.विशेष म्हणजे, 'एक होती हिडिंबा' या कादंबरीच्या लेखिका डॉ. स्मिता दातार (मुंबई) यांना राज्यस्तरीय उत्कृष्ट लेखिका म्हणून गौरविण्यात येणार आहे.प्रत्येक पुरस्कारामध्ये ६,००० रुपये रोख, मानपत्र आणि सन्मानचिन्ह असे स्वरूप असून, यंदा महाराष्ट्रासह राज्याबाहेरील साहित्यिकांकडून एकूण २५२ ग्रंथ परीक्षणासाठी प्राप्त झाले होते.या पुरस्कारांची निवड करताना नाशिक येथील प्रसिद्ध साहित्यिक राकेश वानखेडे, नागपूर येथील समीक्षक डॉ. प्रकाश राठोड, तसेच संयोजन समितीचे सदस्य श्रीकांत पेटकर, डॉ. संदीप भेले, किशोर पेटकर आणि सूर्यकांत पाटील यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

**२५ एप्रिलला भव्य पुरस्कार सोहळा**

मारोतराव नारायणे यांच्या स्मृतिदिनानिमित्त शनिवार, दि. २५ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ६.३० वाजता वर्ध्यातील सार्वजनिक बजाज वाचनालयाच्या सभागृहात पुरस्कार वितरण सोहळा पार पडणार आहे. या सोहळ्यात सुप्रसिद्ध साहित्यिक लक्ष्मण माने यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार असून, अनेक मान्यवर साहित्यिक उपस्थित राहणार आहेत.या संदर्भात प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. डॉ. प्रमोद नारायणे, सचिव हेमलता नारायणे आणि कार्यकारिणी सदस्यांनी माहिती दिली.साहित्यविश्वातील या मानकरी लेखकांवर राज्यभरातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, या पुरस्कारांमुळे नव्या साहित्यनिर्मितीला निश्चितच नवी दिशा मिळणार आहे.

# आर्वीत चैत्र नवरात्र उत्सवाला भक्तिमय प्रारंभ

## रेणुका देवी मंदिरात उत्साह

**आर्वी/जनमाध्यम**

शहरातील श्री यंत्र मंदिर श्री रेणुका देवी मंदिर येथे चैत्र नवरात्र उत्सवाला भक्तिभावपूर्ण वातावरणात प्रारंभ झाला असून, परिसरात आध्यात्मिक उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. नवरात्राच्या शुभमुहूर्तावर शुभदा सव्वालाखे व प्रा. प्रशांत सव्वालाखे यांच्या हस्ते विधिवत घटस्थापना करण्यात आली. पारंपरिक पद्धतीने गुढी उभारून उत्सवाची सुरुवात करण्यात आली. मंत्रोच्चार, वेदघोष आणि देवीच्या जयघोषाने मंदिर परिसर दुमदुमून गेला.

नवरात्रोत्सवानिमित्त मंदिरात



दररोज विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. पहाटे महापूजा, देवीचा शृंगार, आरती, तसेच दुपारच्या सत्रात देवीपाठ, भजन व कीर्तन होत आहे. सायंकाळी आरतीनंतर प्रसाद वितरण करण्यात येत असून भाविक मोठ्या श्रद्धेने सहभाग घेत आहेत.मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी योग्य व्यवस्था करण्यात आली असून, स्वयंसेवकांकडून सेवाकार्य पार पाडले जात आहे. विश्वस्त मंडळ व सेवेकऱ्यांच्या समन्वयातून उत्सव सुरळीतपणे सुरू आहे.या नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून देवीची आराधना करावी, असे आवाहन मंदिर समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# रामनवमीच्या पार्श्वभूमीवर 'आनंद मेळावा'

## योगा शेड व ग्रीन जिमचे लोकार्पण

**वर्धा/जनमाध्यम**

मराठी नूतन वर्ष, गुढीपाडवा आणि रामनवमीच्या पार्श्वभूमीवर शहरात उत्सवी वातावरण निर्माण होत असताना त्रिमूर्ती नगर, उमरी (मेघे) येथे 'आनंद मेळावा' आणि उद्यानातील नव्याने उभारण्यात आलेल्या योगा शेड व ग्रीन जिमच्या लोकार्पणाचा भव्य सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

त्रिमूर्ती उद्यान विकास व व्यवस्थापन समितीच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाला राज्याचे राज्यमंत्री तथा वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री पंकज भोयर यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उमरी (मेघे) ग्रामपंचायतीचे उपसरपंच सचिन खोसे राहणार आहेत.लोकार्पणानंतर सायंकाळी 'आनंद मेळावा' रंगणार असून, नागरिकांसाठी विविध आकर्षणांची मेजवानी असणार आहे. चटपटीत खाद्यपदार्थांचे स्टॉल्स, ज्वेलरी, हस्तकला व विविध उपयुक्त वस्तूंचे प्रदर्शन यामुळे मेळाव्याला उत्साही वातावरण लाभणार आहे. स्थानिक व्यावसायिकांना व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.या सोहळ्याच्या निमित्ताने परिसरात सामाजिक, सांस्कृतिक आणि आरोग्यदायी उपक्रमांना चालना मिळणार असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून मेळाव्याचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# महिलेची गळफास घेऊन आत्महत्या

**देवळी-** राहत्या घरी गळफास घेऊन महिलेने आत्महत्या केल्याची घटना देवळी तालुक्यातील नाचणगाव येथे उघडकीस आली. दीपा दीपक ढिंग (४३) असे मृत महिलेचे नाव आहे. त्यांनी घरात गळफास घेतल्याचे समोर आले. घटनेनंतर परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. आत्महत्येमागील कारण अद्याप स्पष्ट झाले नसून या प्रकरणी पुलगाव पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे. वाढत्या आत्महत्यांच्या घटनांमुळे चिंतेचे वातावरण आहे.

**नावात बदल**

माझे पूर्वी SHAIKH ZEEBA KADIR असे नाव होते. आता माझ्या आधार कार्ड वरील ZEBA KADIR SHAIKH हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता : स्टेशनफैल वर्धा 442001**

# खरात प्रकरणाचे पडसाद; संपूर्ण जाळ्याचा पर्दाफाश कराः अंनिसची मागणी

**वर्धा/जनमाध्यम**

नाशिकमधील भोंदू अशोक खरात प्रकरणाने राज्याच्या सामाजिक विवेकाला हादरा दिला असून, या प्रकरणाची व्याप्ती केवळ एका व्यक्तीपुरती मर्यादित नसल्याचा दावा महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने केला आहे. सत्ता, संपत्ती, लैंगिक शोषण आणि बुवाबाजी यांच्या संगनमतातून उभ्या राहिलेल्या या जाळ्याचा सखोल तपास करण्याची मागणी समितीने केली आहे. समाजातील भीती, असुरक्षितता आणि अज्ञानाचा फायदा घेत तथाकथित अध्यात्म व फलज्योतिषाच्या आडून शोषणाचे प्रकार वाढत असल्याचे समितीने नमूद केले. अशी बुवाबाजी एखाद्या व्यक्तीपुरती मर्यादित नसते; तिच्यामागे सामाजिक मान्यता, आर्थिक स्वार्थ आणि अनेकदा राजकीय व प्रशासकीय संरक्षण असते, असा आरोपही करण्यात आला.या पार्श्वभूमीवर अंनिसने स्वतंत्र विशेष तपास पथकाकडून (SIT) निष्पक्ष चौकशीची मागणी केली आहे. अंधश्रद्धा विरोधी कायद्याची काटेकोर अंमलबजावणी, तसेच फलज्योतिषाचा कायद्यात समावेश करून नियंत्रण आणावे, अशीही मागणी पुढे आली आहे.पीडित महिलांना संरक्षण, कायदेशीर मदत व गोपनीयता मिळावी, तसेच आरोपींचे राजकीय संबंध उघड करून दोषींवर कारवाई करावी, असे समितीने स्पष्ट केले. राजकीय पक्षांनी बुवा-बाबा व तथाकथित ज्योतिषींशी संबंध तोडावेत, अशी आचारसंहिताही सुचवण्यात आली.दरम्यान, नाशिकमध्ये लवकरच बुवाबाजीविरोधी संघर्ष परिषद आयोजित केली जाणार असून, राज्यभर जनजागृती मोहिमेची आखणी करण्यात येत आहे.अंधश्रद्धा, सत्तेचा गैरवापर आणि सामाजिक शोषण यांचा संगम असलेल्या या प्रकरणाने व्यापक धोरणात्मक बदलांची गरज अधोरेखित केली आहे.

# महिलेला जीवे मारण्याची धमकी

वर्धा - किरकोळ कारणावरून महिलेला शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना शहरातील स्टेशनफैल परिसरात उघडकीस आली. बाबूसिंग ठाकूर याने संबंधित महिलेला धमकावत तिच्या घराच्या दरवाजावर दगड व काठ्यांनी हल्ला करून नुकसान केल्याचे तक्रारीत नमूद आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तक्रारीवरून शहर पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून अशा घटनांवर कठोर कारवाईची मागणी केली जात आहे.

**नावात बदल**

माझे पासपोर्ट नंबर K8199157 वरील माझे NARESHKUMAR CHUNILAL NACHWANI असे नाव होते. माझ्या आधार व पॅन कार्ड वरील NARESH CHUNNILAL NACHWANI हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता :- वैद्य नगर यवतमाळ 445001**

**नावात बदल**

माझे पासपोर्ट नंबर K8195961 वरील माझे RONY JAMES असे नाव होते. माझ्या आधार व मतदान कार्ड वरील RONY JAMES KAKKANATTE हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता :- सावंगी मेघे वर्धा 442001**

# गुरुकुल'चा मंत्र पुन्हा जागा करा

## संस्कारांशिवाय शिक्षण अपूर्णः रामप्रियाश्रीजी(माई)

**हिंगणघाट/जनमाध्यम**

आधुनिक शिक्षणाच्या झगमगाटात भारतीय संस्कृतीचा आत्मा हरवत चालल्याची खंत व्यक्त करत 'गुरुकुल' परंपरेचे पुनरुज्जीवन ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन सुश्री रामप्रियाश्रीजी (माई) यांनी केले. छत्रपती शिवाजी उद्यानासमोरील 'भक्तीधाम' श्री शिव भवानी हनुमान मंदिर परिसरात सुरू असलेल्या श्रीराम कथेत त्या बोलत होत्या. संजय माडे मित्रपरिवाराच्या वतीने आयोजित या रामकथेत 'श्रीराम विवाह महोत्सव' प्रसंगाचे औचित्य



साधून त्यांनी भारतीय शिक्षण व्यवस्थेचा वेध घेतला. एकेकाळी सात लाख गुरुकुलांच्या माध्यमातून भारतात शास्त्र आणि शस्त्र या दोन्हींचे शिक्षण दिले जात होते. मात्र पाश्चात्य शिक्षण पद्धतीच्या प्रभावामुळे ही समृद्ध परंपरा खंडित झाली, असे त्या म्हणाल्या.आजची तरुण पिढी पदवीच्या मागे धावत असताना संस्कारांपासून दूर जात असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. संस्कारक्षम शिक्षणाशिवाय समाजाची घडी मजबूत राहू शकत नाही,असे ठाम मत त्यांनी मांडले.श्रीराम विवाह प्रसंगाचे ओजस्वी वर्णन करताना त्यांनी कौटुंबिक मूल्यांवर विशेष भर दिला. मुलींना केवळ शिक्षण नव्हे, तर अहिल्याबाई होळकर आणि जिजाऊंसारख्या आदर्शांचे संस्कार देणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले. रामायण हे केवळ ग्रंथ न राहता जीवनमूल्यांचा दीपस्तंभ आहे, असे सांगत त्यांनी उपस्थितांना त्यातील शिकवण आचरणात आणण्याचे आवाहन केले. रामकथेच्या निमित्ताने मंदिर परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले असून, रामायणातील वेशभूषा आणि सादरीकरण भाविकांचे लक्ष वेधून घेत आहे. या उपक्रमाचे शहरात कौतुक होत असून, भाविक उपस्थित राहत आहेत.

पत्ता सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय तथा दुसरा माळा, हिरो शोरूमच्या मागे, राजेश नरहस्फेट्टीवार याची इमारत, मोहन नगर, नागपुर रोड, वर्धा,

**चौकशीची जाहीर नोटीस**

अर्ज क्रमांक ८६/२६ कलम-१९
अर्जदार श्री अंकुश दिलीपराव राउत
सार्वजनिक न्यासाचे जांच व नोदंणी क्रमांक हनुमान मंदिर समिती धाडी ता. आष्टी जि वर्धा

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, धर्मादाय उपआयुक्त सहायक धर्मादाय आयुक्त, वर्धा विभाग वर्धा हे वर नमूद केलेल्या नोंदणी अर्ज यासंबधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत ,

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणी सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय ?

(२) खाली निदीष्ठ केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकिची आहे काय ?

(अ) जंगम मिळकत ५५००/- अंकुश दिलीपराव राउत यांच्याकडे जमा आहे स्थावर मिळकत (वर्णन) निरंक

सदरच्या चौकशी प्रकणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यानी त्यांची लेखी कैफीयत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून ३० दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे, नंतर आलेल्या कैफीयतीचा विचार केला जाणार नाही तसेच वरील मुदतीत कैफीयत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पूर्ण केली जाईल व नोंदणी अर्जाची निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील

हि नोटीस माझे सहीनिशी व मा सहायक धर्मादाय आयुक्त, वर्धा यांवि शिक्यानिशी आज दिनांक २०/०३/२०२६ रोजी दिली

**अधिक्षक**
**(न्याय शाखा) सार्वजनिक न्यास नोदंणी कार्यालय,**
**वर्धा विभाग वर्धा**

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक ११६**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.३६४/२०२६
**श्री.अरुण अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.२०.०३.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Shri Arun Pundalikrao Choudhary, Age 75 Yrs. Occu.: Nil
2. Ashwini Tayade, Age 46 Yrs. Occu.: Household
   Both R/o Sukhakarta Enclave, Flat No.101, 17 Modern Society, Chatrapati Square, Vivekanand Nagar, Tq.Dist.Nagpur-440015
3. Apara Arun Chaudhary, Age 44 Yrs. Occu.: Household
   R/o Sanjeevan Plot No.7, Shivshakti Colony, Shivshakti Basti, Ukali, Amt.
4. Milind Arun Choudhary, Age 42 Yrs. Occu.: Business
   R/o 7, Sanjeevan Near Swastik Nagar, Shivshakti Nagar, Sai Nagar, Amravati. Tq. Dist.Amravati

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **साधना अरुणराव चौधरी** हे दिनांक 25.01.2026 रोजी **नागपूर, ता.जि.नागपूर** येथे मयत झाले. अर्जदार **अरुण आधिक तीन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अरुण आधिक तीन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०२.०३.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

## तहसिलदार मोर्शी यांचे कार्यालय

**क्र. रामाक्र/३३/एमआरसी-८१/बोडणा/२०२५-२०२६**

## जाहीरनामा

या कार्यालयाचे ज्ञापनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **शेवंता दिलीप जांभुळकर**, रा.बोडणा, ता.मोर्शी, जि.अमरावती यांनी त्यांचे आई नामे **जयना चिरकुट शेंडे** मृत्यूची नोंद ग्रामपंचायत **बोडणा** ला करण्यास आदेश मिळण्याबाबत या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. त्यांनी अर्जासोबत ग्रामपंचायत निबंधक, ग्रा.पं.**बोडणा** येथील जन्म/मृत्यू नोंदवही अनुपलब्धता प्रमाणपत्र प्रतिज्ञापत्र व इतर अनुषंगीक पुरावे दाखल केले आहेत.

त्यार्थी प्रकरणात ज्या कोणास आक्षेप वा हरकती घ्यावयाच्या असेल त्यांनी सदर जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत लेखी स्वरुपात आक्षेप वा हरकती दाखल कराव्या. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा वा हरकतीचा विचार करणत येणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक २५.०२.२०२६

शिक्का

**स्वा/-**
**तहसीलदार, मोर्शी**

---

## जाहीरनामा

चांदूर बाजार येथील विद्यमान श्रीमती पी.एम.चव्हाण सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) यांचे न्यायालयात

नियमित दिवाणी दावा क्र.१३६/२०२४ ने.ता.२०.०४.२०२६

**वादी** - १. वंदना दिलीपराव राऊत
२. वृषभ दिलीपराव राऊत
३. मयुरी अतुल सोनोने,
अर्जदार नं.१ व २ रा.खराळा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
अर्जदार नं.३ रा.पावनूर, ता.जि.वर्धा

**-विरुध्द-**

**प्र.वादी** - **सचिव / सरपंच**
**ग्रामपंचायत खराळा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती**

**बनाम -** दिलीप मोतीरामजी राऊत,
रा.खराळा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

ज्याअर्थी वादी **वंदना दिलीपराव राऊत अधिक दोन** रा.खराळा, ता.चांदूर बाजार जि.अमरावती प्रतिवादी सचिव/सरपंच ग्रामपंचायत खराळा यांचे विरुध्द सह दिवाणी न्यायालय, चांदूर बाजार यांचे न्यायालयात दिलीप मोतीरामजी राऊत मागील १२ वर्षाहून अधिक काळापासून बेपत्ता असल्यामुळे त्यांना दिवाणी मृत घोषित करुन मिळण्यासाठी दावा दाखल केला आहे.

त्याअर्थी दिलीप मोतीरामजी राऊत यांना या जाहीरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, यांनादाव्याचे सुनावणीसाठी दिनांक २०.०४.२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता सह दिवाणी न्यायाधीश, चांदूर बाजार यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे. वरील नेमलेल्या तारखेस कोणीही हजर न झाल्यास सदरहू दाव्याची एकतर्फी सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक १३.०३.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय,
चांदूर बाजार

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.४३३/२०२६
**श्रीमती निता अधिक एक -वि- निरंक**
पुढील ता.०६.०४.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** १. श्रीमती निता सारंगधर वानखडे, वय ४६ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
२. शुभम सारंगधर वानखडे, वय २८ वर्षे, व्यवसाय - शेती
दोघेही रा.कठोरा गांधी, पो.सालोरा खुर्द, ता.जि.अमरावती-४४४९०१

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **सारंगधर मोतीरामजी वानखडे** हे दिनांक 6.01.2026 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **निता अधिक एक विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **निता अधिक एक विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **११.०३.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक १९५**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :-** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६९
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

---

# अल्पवयीन मुलगी बेपत्ता

**समुद्रपूर जनमाध्यम :** तालुक्यातील हळदगाव येथे अल्पवयीन मुलगी बेपत्ता झाल्याची घटना समोर आली असून तिला फुस लावून पळवून नेल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. या प्रकरणी मुलीच्या आईने समुद्रपूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

अमरावती, अचलपूर व वरूड येथे नामांकित लॉ फर्म मध्ये युवक व युवतींना पार्ट टाईम काम करण्याची संधी.
शिक्षण- १२ वी पास पगार- १०,००० + टिए डिए + कमीशन
(ट्रेनिंग झाल्यावर पगार वाढ व ईतर इन्क्रिमेंट्स)
**संपर्क - ९६०७५८२०९४**

## Change of name

I, **Mohan Sureshkumar Takhnani** (Old Name as per Birth Certificate) residing at Rampuri Camp, Amravati-444 603 hereby declare that I have changed my name as **Mohan Sureshkumar Takhtani** (New Name as per Aadhar Card).
Date 24.03.2026

---

**स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा**

दिनांक

आज दि.२३.०३.२०२६ रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती** निबंधक, जन्म नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **घाटलाडकी** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **वसीम अहेमद अब्दुल करीम** अर्जात नमूद जन्म दिनांक **०१.१२.१९८४** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार **वसीम अहेमद** हे **घाटलाडकी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.

२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.

३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **नोंदणीबाबत माहिती नसणे** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण,इतर योग्य ते नमुद करा).

४) आम्ही सदर चौकशी व पडताळणी पंचनामा आमच्या माहितीवरुन व स्थानिक चौकशी करुन देत आहे.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) शिवानंद ए.मदने (सरपंच) | १) शिवानंद ए.मदने (सरपंच) |
| २) श्री.अब्दुल हाफिज शे.रसूल (उपसरपंच) | २) श्री.अब्दुल हाफिज शे.रसूल (उपसरपंच) |
| ३) श्री.सागर रविंद्र शिरभाते (तं.मु.अ.) | ३) श्री.सागर रविंद्र शिरभाते (तं.मु.अ.) |
| ४) श्री.गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) | ४) श्री.गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) |
| ५) सुधाकर गा.माहोरे | ५) सुधाकर गा.माहोरे |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा**
**ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत घाटलाडकी**

---

## तहसिलदार मोर्शी यांचे कार्यालय

**क्र. रामाक्र/२४/एमआरसी-८१/अंबाडा/२०२५-२०२६**

## जाहीरनामा

या कार्यालयाचे ज्ञापनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **शेख जाबीर शेख सादिक** त्यांचे जन्माची नोंद ग्रामपंचायत **अंबाडा** ला करण्यास आदेश मिळण्याबाबत या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. त्यांनी अर्जासोबत ग्रामपंचायत निबंधक, ग्रा.पं.**अंबाडा** येथील जन्म/मृत्यू नोंदवही अनुपलब्धता प्रमाणपत्र प्रतिज्ञापत्र व इतर अनुषंगीक पुरावे दाखल केले आहेत. तसेच ग्रामपंचायत कार्यालय, **अंबाडा** येथे स्वतःचे जन्म दि.०१.०२.१९७९ रोजीचे जन्माची नोंद घेण्याकरीता आदेश मिळण्याबाबत विनंती केली आहे.

त्यार्थी प्रकरणात ज्या कोणास आक्षेप वा हरकती घ्यावयाच्या असेल त्यांनी सदर जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत लेखी स्वरुपात आक्षेप वा हरकती दाखल कराव्या. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा वा हरकतीचा विचार करणत येणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक

शिक्का

**स्वा/-**
**तहसीलदार, मोर्शी**

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.११४/२०२६ ने.ता.१७.०४.२०२६

**अर्जदार :**
**१.** सुशिला रमेश सातपुते, वय ६८ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
रा.ठाकूर वाडी, शिरजगांव कसबा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
२. शरद रमेश सातपुते, वय ४० वर्षे, व्यवसाय - मजुरी
रा.वार्ड नं.२, पो.शिरजगांव कसबा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
३. अर्चना राजुराव पोटे, वय ४७ वर्षे, व्यवसाय - मजुरी
रा.बिलनपुरा, अचलपूर, ता.अचलपूर, जि.अमरावती
४. देवकन्या अविनाशराव भाष्कर, वय ४३ वर्षे, व्यवसाय - गृहिणी

**-- विरध्द --**

**गैरअर्जदार :** **निरंक**

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मयत रमेश महादेव सातपुते** यांचा मृत्यू दिनांक **२२.१२.२०२४** रोजी रा.शिरजगांव कसबा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला. तसेच मयताची आई **सावित्री महादेव सातपुते** ही बऱ्याच वर्षापुर्वी मरण पावली. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.११४/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााणपत्र देण्यात येईल.

आज दि.**११.०३.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

---

## जाहीर नोटीस

माझे पक्षकार **१) सौ.रश्मी राजेंद्र इंगळे,** रा.माया नगर, एमआयडीसी जवळ, अमरावती ता,जि.अमरावती व **२) सौ.प्रेरणा राजेश सांगोले,** रा.नागसेन नगर, नागपूर, ता.जि.नागपूर यांनी मला दिलेल्या माहिती व अधिकारावरुन सर्वांना या जाहीरनोटीसद्वारे सुचित करण्यात येते की, माझ्या पक्षकाराचे वडिलोपार्जित घर नोंदणी पोट तुकडी अमरावती शहर कचेरीचे कक्षेतील व मनपा अमरावतीचे हद्दीतील मौजे सातुर्णा, प्र.बडनेरा, ता.जि.अमरावती येथील पवन नगर या नावाने ओळखल्या जाणाऱ्या जागेतील शेत सर्व्हे नं.२२ मधील जमिनीतील मा.उपविभागीय अधिकारी साहेब यांच्याकडील आदेश क्र.एन.ए.पी.३४/सातुर्णा-१०३/१९७५-७६, दिनांक ०३.१२.१९७६ नुसार लेआऊट कन्व्हर्शन मंजूर झालेल्या जागेतील प्लॉट नं.५१-ए, यामधील माझ्या मालकीचा व ताब्यातील उत्तरेकडील भाग याची साईज मंजूर नकाशाप्रमाणे ३० **X** बाय ५० असून याचे क्षेत्रफळ १३९.४० चौ.मी. (१५०० चौ.फुट) आहे. यावर आर.सी.सी.कॉलम पध्दतीमध्ये मकान यामध्ये एक हॉल, किचन, व्हरांडा, संडास-बाथरुम याचे बांधकामाचे एकुण क्षेत्रफळ ६९.७०३ चौ.मी. (७५० चौ.फुट) असून ज्याच्या चतुःसिमा-- **पुर्वेस -** सर्व्हीस लाईन, **पश्चिमेस -** लेआऊट मधील रोड, **उत्तरेस -** प्लॉट नं.५२, **दक्षिणेस -** प्लॉट नं.५१-बी आहे. वरील नमुद घर हे माझे पक्षकार यांच्या मालकीचे व ताब्यात असून सदरहू घर मालमत्ता कोणीही कोणत्याही प्रकारे विकण्याचा सौदा करु नये.

तरी या नोटीसद्वारे सर्वांना सुचित करण्यात येते की, कोणीही कोणासोबतही खरेदी-विक्रीचा किंवा कोणत्याही प्रकारे हस्तांतरणाचा व्यवहार करु नये. व्यवहार केल्यास तो गैरकायदेशीर ठरेल व तो माझे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही व तो गैरकायदेशीर व अवैध ठरेल व माझे पक्षकार संबंधितांविरुध्द कायदेशीर कार्यवाही करतील, याची नोंद घ्यावी.

दिनांक २३.०३.२०२६
ठिकाण - अमरावती

सौ.रश्मी रा.इंगळे व सौ.प्रेरणा रा.सांगोले यांचेतर्फे
अधिवक्ता **(जी.एस.तांबटकर)**
खंडेलवाल कॉम्प्लेक्स, सुंदरलाल चौक, अमरावती
मो.९४२२८५५३४८, ९०७५२७५४२०

---

स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक

आज दि............... रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **निमखेड, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **निमखेड** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **मोहीबुरहेमान हबीबुरेहमान** अर्जात नमूद जन्म दिनांक **२५.०३.१९८३** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **घाटलाडकी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.

२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.

३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **माहिती नसणे** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण,इतर योग्य ते नमुद करा).

४) ------------------------------------------------------------------------------------------------------------------------------.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) पंकज ना.राऊत (पो.पाटील) | १) पंकज ना.राऊत (पो.पाटील) |
| २) जे.व्ही.यावले (ग्रामसेवक) | २) जे.व्ही.यावले (ग्रामसेवक) |
| ३) प्रल्हाद प.शिरसाठ (सरपंच) | ३) प्रल्हाद प.शिरसाठ (सरपंच) |
| ४) जी.डी.फुटाणे (तलाठी) | ४) जी.डी.फुटाणे (तलाठी) |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा**
**ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत निमखेड**

---

**स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा**

दिनांक

आज दि.२३.०३.२०२६ रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **घाटलाडकी** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **मोहम्मद आसिफ अब्दुल करिम** अर्जात नमूद जन्म दिनांक **१२.०८.१९८१** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **घाटलाडकी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.

२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.

३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **माहिती नसणे** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण,इतर योग्य ते नमुद करा).

४) आम्ही सदर चौकशी व पडताळणी पंचनामा आमच्या माहितीवरुन व स्थानिक चौकशी करुन देत आहे.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) शिवानंद ए.मदने (सरपंच) | १) शिवानंद ए.मदने (सरपंच) |
| २) श्री.अब्दुल हाफिज शे.रसूल (उपसरपंच) | २) श्री.अब्दुल हाफिज शे.रसूल (उपसरपंच) |
| ३) श्री.सागर रविंद्र शिरभाते (तं.मु.अ.) | ३) श्री.सागर रविंद्र शिरभाते (तं.मु.अ.) |
| ४) श्री.गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) | ४) श्री.गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) |
| ५) सुधाकर गा.माहोरे | ५) सुधाकर गा.माहोरे |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा**
**ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत घाटलाडकी**

---

## जाहीर नोटीस

**जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, अमरावती**

क्र.न.भू-१/अपील अर्ज क्र.२७०७/२०२५ ने.ता.....०२.२०२६

**अपिलार्थी :**
**१.** सुरेश बापुरावजी पुनसे, रा.गुरुदेव नगर, तिवसा, ता.तिवसा, जि.अमरावती
२. प्रविण दादाराव दारव्हेकर,
३. प्रशांत दादाराव दारव्हेकर,
अनु.नं.१ व २ रा.होली क्रॉस हायस्कूल रोड, झंझाडपुरा, नवी वस्ती बडनेरा-४४७०१.
४. गजानन प्रल्हाद पाचपोर,
रा.प्लॉट नं.१५-बी गणपती टेंपल,दुसरी लाईन, मालु नगर, गोपाल नगर परिसर, साईनगर अमरावती

**-- विरुध्द --**

**उत्तरार्थी :**
१. उपअधीक्षक, भूमि अभिलेख, अमरावती
२. किसन उत्तम गायगोले, रा.मु.पो.लोणी (टाकळी) ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती
३. सौरभ बबन कडू, रा.मु.भारत नगर, साईनगर, अकोली रोड, अमरावती
४. फिरोज खान बाबा खान पठाण,
५. नाजिश बेगम मोहम्मद फारुक
६. रईस खान बाबा खान पठाण
७. शाजिया तलन शेख
८. सनोफिया अन्वर शेख
अनु.नं.४ ते ८ रा.मु.पो.लोणी (टाकळी) ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती

ज्याअर्थी अपिलार्थी यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अंतर्गत मौजे लोणी टाकळी, ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती येथील सर्व्हे नं.५६, गट नं.११८ चे बाबत उत्तरार्थी यांचे विरुध्द अपिल सादर केलेले आहे. परंतु उत्तरवादी नं.३ ते ६ हे सुनावणी वेळी उपस्थित राहत नसल्यामुळे उत्तरार्थी यांना याद्वारे कळविण्यात येते की, दिनांक २४.०३.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायासनासमोर आपण स्वतः किंवा आपले अधिवक्ता मार्फत सदर अपिलास उत्तर देण्यासाठी हजर रहावे. आपण वरील तारखेस सदर अपिलकामी न्यायासनासमोर गैरहजर राहिल्यास एकतर्फी निकाल देण्यात येईल.

आज दि.**१८.०३.२०२६** रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

---

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती,
अमरावती

## चौकशीची जाहीर नोटीस

(नमुना क्र.०२)

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 27/2026

सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **श्री.संत रोहिदास महाराज ट्रस्ट, मोचीपुरा, चांदूर बाजार, जि.अमरावती**

बाबत अर्जदार - **रवी सुभाष डिठोर**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?

(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**(अ) जंगम मिळकत (वर्णन)** 11,000/-

**(ब) स्थावर मिळकत (वर्णन) - काही नाही**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **२०.०३.२०२६** रोजी दिली.

शिक्का

अधीक्षक,(न्याय शाखा)
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**अमरावती**

---

**जाहीर नोटीस**

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की मी, माझे पक्षकार नामे **किरण रमेशराव वडनारे** यांचे वतीने सादर जाहीर नोटीस देतो ती येणेप्रमाने,

मिळकतीचे वर्णन : **मौजे - पेठ अमरावती, प्रगणे - बडनेरा, शेत सर्वे क्रं.६७/२, ६३,६५,६६,२,८१,प्लॉट क्रं.९६, सबडीवायडेड प्लॉट क्रं. ९६/१, ता. आणि जिल्हा. अमरावती.**

सदर मिळकत माझे पक्षकार नामे **किरण रमेशराव वडनारे** यांच्या मालकीची आहे. तदनंतर **किरण रमेशराव वडनारे** यांनी **VASTU HOUSING FINANCE CORPORATION LTD BR. AMRAVATI.** येथे गृह कर्जासाठी अर्ज केला असता, **सदर मिळकतीचे पूर्वीचे मूळ खरेदी खत दि. ११/०३/१९८८ रोजीचे दस्त क्र. ११७१ सदर मुळ खरेदी खत गहाळ झालेले आहे.**

तसेच सदर खरेदीखत कोणाला सापडल्यास किवा कुठे गहान, पतसंस्था/राष्ट्रीयकृत/सहकारी अथवा खाजगी बँक, संस्था बोजा, या मालमत्तेविषयी शासकीय निमशासकीय काही भानगड, कोणाचा मालकी किवा वारस हक्क असल्यास, इतर कोणती हरकत असल्यास त्यांनी खाली दिलेल्या माझ्या मोबाईल नं. वर हि जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या ३ दिवसाच्या आत पुराव्यानिशी हरकत नोंदवावी. तदनंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही करिता हि जाहीर सूचना देत आहे.

२३/०३/२०२६

**आपला**
**ADVOCATE**
**रवींद्र रु. वाटाणे**
**स्नेहगंधा कॉलोनी, अमरावती**
**मो.नं.-९८२३६९८७४५**

---

**स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा**

दिनांक

आज दि.२३.०३.२०२६ रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **घाटलाडकी** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **मोहम्मद मुजम्मील अब्दुल करिम** अर्जात नमूद जन्म दिनांक **२५.०३.१९९०** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **घाटलाडकी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.

२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.

३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **माहिती नसणे** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण,इतर योग्य ते नमुद करा).

४) आम्ही सदर चौकशी व पडताळणी पंचनामा आमच्या माहितीवरुन व स्थानिक चौकशी करुन देत आहे.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) शिवानंद ए.मदने (सरपंच) | १) शिवानंद ए.मदने (सरपंच) |
| २) श्री.अब्दुल हाफिज शे.रसूल (उपसरपंच) | २) श्री.अब्दुल हाफिज शे.रसूल (उपसरपंच) |
| ३) श्री.सागर रविंद्र शिरभाते (तं.मु.अ.) | ३) श्री.सागर रविंद्र शिरभाते (तं.मु.अ.) |
| ४) श्री.गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) | ४) श्री.गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) |
| ५) सुधाकर गा.माहोरे | ५) सुधाकर गा.माहोरे |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा**
**ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत घाटलाडकी**

---

**स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा**

दिनांक

आज दि.२३.०३.२०२६ रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **घाटलाडकी** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **मुजीबूर रहेमान अब्दुल करिम** अर्जात नमूद जन्म दिनांक **१५.०५.१९७८** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **घाटलाडकी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.

२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.

३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **माहिती नसणे** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण,इतर योग्य ते नमुद करा).

४) आम्ही सदर चौकशी व पडताळणी पंचनामा आमच्या माहितीवरुन व स्थानिक चौकशी करुन देत आहे.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) शिवानंद ए.मदने (सरपंच) | १) शिवानंद ए.मदने (सरपंच) |
| २) श्री.अब्दुल हाफिज शे.रसूल (उपसरपंच) | २) श्री.अब्दुल हाफिज शे.रसूल (उपसरपंच) |
| ३) श्री.सागर रविंद्र शिरभाते (तं.मु.अ.) | ३) श्री.सागर रविंद्र शिरभाते (तं.मु.अ.) |
| ४) श्री.गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) | ४) श्री.गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) |
| ५) सुधाकर गा.माहोरे | ५) सुधाकर गा.माहोरे |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा**
**ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत घाटलाडकी**

---

## जाहीर नोटीस

**जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, अमरावती**

क्र.न.भू-१/अपील अर्ज क्र.२५८०/२०२५ ने.ता.१७.०२.२०२६

**अपिलार्थी :** **१.** गोपाल सुधाकर देशमुख
रा.श्रमसाफल्य, राठोड हॉस्पीटल समोर,
रामनगर, अकोला, ता.जि.अकोला

**-- विरुध्द --**

**उत्तरार्थी :**
१. तहसीलदार, मोर्शी, जि.अमरावती
२. उपअधीक्षक, भूमि अभिलेख, मोर्शी
३. श्रीमती विलासिनी मधुकर देशमुख (मयत)
३अ) रोशनी वैभव देशमुख
३ब) मृणाली सौरभ देशमुख
रा.राणा नगर, कॉंग्रेस नगर रोड, रुपा भारत गॅस मागे, अमरावती
४. श्री.राहूल मधुकर देशमुख
अनु.नं.३ व ४ रा.खेड, ता.मोर्शी, जि.अमरावती
५. सरपंच ग्रामपंचायत खेड, ता.मोर्शी, जि.अमरावती
६. श्री.चंद्रशेखर उर्फ सूर्यकांत देवराव देशमुख
रा.खेड, ता.मोर्शी, जि.अमरावती

ज्याअर्थी अपिलार्थी यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अंतर्गत मौजे खेड, ता.मोर्शी, जि.अमरावती येथील भूमापन नं.१६८/१,चे बाबत उत्तरार्थी यांचे विरुध्द अपिल सादर केलेले आहे. परंतु उत्तरवादी नं.३ ते ६ हे सुनावणी वेळी उपस्थित राहत नसल्यामुळे उत्तरार्थी यांना याद्वारे कळविण्यात येते की, दिनांक २४.०३.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायासनासमोर आपण स्वतः किंवा आपले अधिवक्ता मार्फत सदर अपिलास उत्तर देण्यासाठी हजर रहावे. आपण वरील तारखेस सदर अपिलकामी न्यायासनासमोर गैरहजर राहिल्यास एकतर्फी निकाल देण्यात येईल.

आज दि.**१८.०३.२०२६** रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

---

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती,
अमरावती

## चौकशीची जाहीर नोटीस

(नमुना क्र.०२)

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 27/2026

सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **कृष्णामृत गौरक्षण, मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती जि.अमरावती**

बाबत अर्जदार - **कृष्णराव चंद्रभानजी सोनटक्के**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?

(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**(अ) जंगम मिळकत (वर्णन)** 11,000/-

**(ब) स्थावर मिळकत (वर्णन) - काही नाही**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **२३.०३.२०२६** रोजी दिली.

शिक्का

**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

---

## जाहीर सुचना

या जाहीर सुचनेव्दारे सुचित करतो की, माझे पक्षकार राजेश बबनराव गदर, रा. पेठ अमरावती, ता. जि. अमरावती यांनी ईसारचिठ्ठी नुसार मौजे - पेठ अमरावती, प्रगणे - बडनेरा, ता., जि. अमरावती येथील सर्व्हे नं. ८१ / १ मधील प्लॉट नं. २१- ए क्षेत्रफळ १४० चौ. मि. म्हणजेच १५०६ चौ. फु. चा प्रदिप कमलाकर घोंडगे आणि कल्पना प्रदिप घोंडगे यांचे कडून विकत घेण्याचा सौदा केलेला आहे. त्यापूर्वी सदर प्लॉट त्यांनी सुनील वासुदेवराव खंडारे यांचे कडून दि.१२/०४/२०२३ रोजी खरेदी दस्त अ.क्र. १९८६ नुसार खरेदी केलेला होता व त्यानुसार त्यांच्या मालकीत व ताब्यात आहे.

दि. १२/०४/२०२३ रोजी खरेदी दस्त अ.क्र. १९८६, आणि दि.२४/११/२०१७ रोजी खरेदी दस्त अ.क्र. २४२१, चे **मुळखरेदी दस्त** माझे पक्षकाराचे विक्रेते प्रदिप कमलाकर घोंगडे व ईतर यांचे कडे जमा आहे.

परंतु **दि.११/०७/२०१३ रोजी खरेदी दस्त अ. क्र. १६०५, चे मुळखरेदी दस्त** माझे पक्षकाराचे वरील नामे विक्रेते यांचे कडून गहाळ झालेली आहेत व इतर मुळ दस्त यांच्याकडे आहे.

तरी याबाबत कोणाचेही, कोणत्याही प्रकारचे कर्ज, गहाण, बोजा, हक्क, हितंसंबंध व इतर कोणतीही भानगड, कायदेशीर वाद, लवाद, दावा असल्यास किंवा त्याबाबत कोणतीही हरकत असल्यास जाहीर सुचनेपासून १५ दिवसांचे आंत खालील पत्त्यावर लेखी स्वरुपात संपर्क साधावा, त्यानंतर आक्षेप आल्यास याची नोंद घेतली जाणार नाही.
अमरावती.
दिनांक: २१/०३/२०२६

**राहूल व्ही. मोहोड,**
**प्रेरणा कॉलनी, राधा नगर,**
**अमरावती - ४४४६०३**
**मो.९०९६४६०६७०.**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालयाचे सात प्राध्यापक विद्यापीठाच्या आचार्य यादीत

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती द्वारा नुकतीच आचार्य मार्गदर्शकांची यादी जाहीर करण्यात आली. यामध्ये स्थानिक श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी येथील एकूण सात प्राध्यापकांना नव्याने आचार्य मार्गदर्शक म्हणून मान्यता प्रदान करण्यात आली. यामध्ये डॉ. समीर बिजवे (संचालक, शारिरीक शिक्षण विभाग), डॉ.नविता मालाणी (इंग्रजी), डॉ.अनिकेत भुयार (इंग्रजी), डॉ.सतिष मार्डीकर (रसायनशास्त्र), डॉ. नितिन घोडीले (रसायनशास्त्र), डॉ. विवेक पाटील (वाणिज्य विभाग) व डॉ. संगीता छाबा (प्राणिशात्र) आदींना विद्यापीठाद्वारे मान्यता प्रदान करण्यात आली.

सदर मान्यतेमुळे अंजनगाव परिसरातील विद्यार्थ्यांना पदव्युत्तर शिक्षणांनंतर संशोधन करण्यास मार्गदर्शन प्राप्त करता येणार आहे. ज्यामुळे परिसरातील शैक्षणिक गुणवत्ता वर्धित होण्यास मदत होणार आहे. विशेष



बाब म्हणजे याआधीच विद्यापीठाद्वारे महाविद्यालायातील प्रयोगशाळांना संशोधन प्रयोगशाळा म्हणून मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.या आधीही महाविद्यालयामध्ये कला, वाणिज्य व विज्ञान शाखांमिळून एकूण ११ प्राध्यापक आचार्य मार्गदर्शक म्हणून कार्यरत असून यामध्ये प्रा.डॉ.ताई उके, प्रा.डॉ. सत्येंद्र गडपायले, प्रा.डॉ.नितिन सराफ, डॉ.इंदल जाधव, डॉ.जुगल मालधुरे, डॉ.सुवर्णा झिलपे, डॉ.ममता येवतकर, डॉ. पवन राऊत, डॉ.प्रेरणा भटकर व डॉ.चतुरानंद केदार आदींचा समावेश आहे. सदर आचार्य मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनात विविध विषयांमध्ये संशोधक विद्यार्थी मार्गदर्शन प्राप्त करत आहेत.

`महाविद्यालायातील आचार्य मार्गदर्शकांची संख्या आता १९ वर पोहोचली असून अंजनगाव परिक्षेत्रातील ग्रामीण विद्यार्थ्यांना संशोधनावर आधारित पदवी प्राप्त करणे आता सहज शक्य झाले आहे.नव्याने आचार्य मार्गदर्शक म्हणून मान्यता प्राप्त प्राध्यापकांचे महाविद्यालयातील डॉ.महेंद्र गिरी, डॉ.कविता मलोकार तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची अभिनंदन व शुभेच्छा दिल्या आहेत.

# सांज वेळी सुरांनी दरवळला ‘सांज पाडवा’

## सलग २६ वे वर्ष, हौशी कलावंताचे स्नेहमिलन आणि अमरावतीकरांचा उत्साह

**अमरावती/का.प्र.**

पहाट परिवार, शिव टेकडी अमरावती गेल्या अनेक वर्षांपासून दरवर्षी सांगितिक कार्यक्रम सादर करतात. गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर शिवटेकडी या ठिकाणी ‘सांज पहाट’ हा उपक्रम शिवटेकडी रंगमंचावर पार पाडण्यात आला. संकल्पना होती, ‘बहती हवा सा था वो’.यंदा पहाट परिवारातील सदस्य स्व.भूषण बनसोड, स्व.वीरभान याना ही एकार्थी स्वरांजली. यावेळी मान्यवरांच्या हस्ते गुढी उभारण्यात आली. या कार्यक्रमात जवळपास तीस ते चाळीस हौशी कलावंत यांनी आपली कला सादर केली.

यामध्ये मराठी- हिंदी गाणी, एकल व समुह नृत्य सोबतच मनोरंजक निवेदनाची जोड होती. संगीत संयोजनाची जबाबदारी ‘रंगत सांगत’ चे संतोष मानकर आणि कामिनी खैरे यांनी पार पाडली. दीप प्रज्वलन आ. सुलभा खोडके, आ.संजय खोडके, आ.सुनील देशमुख, डॉ सोनाली देशमुख यांनी केले. कामिनी खैरे,मिलिंद व हेमांगी डोंगरकर, चंद्रकांत पोपट, डॉक्टर राजा नवथे, मनोहर लाल बजाज,राजश्री पाटिल,पल्लवी शिंदे, वैशाली हिरूळकर, विजय जाधव, वैशाली नालसे, डॉ किरण वाडेकर, मनोहर शेगोकर, चिमोटे, डॉ.सरिता कडू, रोमहर्षक बुद्रुक पाटील यांनी गायनात सहभाग घेतला.समूह गान सादरीकरण मधुसूदन संगित विद्यालय तर्फे डॉ गजानन केतकर डॉक्टर वनिता भोपत-केतकर यांनी सादर केले. समुह नृत्यात डॉ श्रीकांत- डॉ उषा देशमुख, चिमोटे, अर्चना चिठोरे, अशोक मेहता,हेमांगी डोंगरकर, धनश्री बनसोड,किरण बनसोड, श्रावणी काकड, नितीन बोबडे, सुधीर मानसी मोरे, जया डवरे, सुरेखा त्यागी, गोपाल मांजलवर आणि संच, संध्या राठोड, विदिशा, स्मिता अंबाडे, उत्कल नृत्य निकेतन च्या शितल मेटकर आणि संच, डॉ नेहा देशमुख, ईशान्वी देशमुख यांनी नृत्य सादर केले.उत्कल नृत्य निकेतन च्या सामूहिक ओडिसी नृत्याने मन जिंकले आणि एकल नृत्य डॉक्टर नेहा देशमुख उत्तमरीत्या सादर केले. निवेदन किरण बनसोड ,प्रा मोनिका उपम,अशोक मेहता यांनी संतोष सुरकर यांनी कोरिओग्राफी सांभाळली. महेश अडवाणी, निलिमा देशमुख, मिश्रा, विक्रम मामर्डे, रंजना मामर्डे, अमोल पाटील, संदिप सोसे यांनी रंगमंच व्यवस्था सांभाळली. प्रा.वर्षा देशमुख, प्रीती बंड, दिनेश बूब, डॉ रंजन दारव्हेकर, शशी प्रभा, नंदकिशोर काळे, कल्पना व नितीन देशमुख, विनायक कडू, दिपक वर्षा तिवारी, राजा देशमुख- तळवेलकर, सुधीर जगताप, डॉ.नरेशचंद्र काठोळे, डॉ.बी.डी बेलसरे, सुलभा खोडके, गौरव जवंजाळ, डॉ अजय डफळे, डॉ शशी चौधरी, डॉ उल्हास संघई, नितिन देशमुख, विधितज्ञ प्रदीप महल्ले, डॉ पृथ्वीराज राजपूत, संजय जाधव, राजेंद्र जाधव, विजय जाधव, संजय शेळके सर्वपरिचित आ. संजय खोडके वं सुलभा खोडके यांच्या योगदानाबद्दल त्यांचा या प्रसंगी स्मृती भेट देऊन सत्कार करण्यात आला. सुमारे दोन तासांच्या या रंगतदार कार्यक्रमात सुमारे १५०० मंडळी उपस्थित होती.यंदा रंगोली समुह यांचे नितीन देशमुखं, एस मनोहर लाल, जना स्मॉल फायनासन बँक, निखिल बेलसरे यांचे ड्रिफ्टर्स पब स्टेशन,दैनिक हिंदुस्थान यांचे विलास मराठे या प्रतिष्ठानचे सहयोग लाभले.आयोजकांच्या वतीने संपूर्ण अमरावतीकर मंडळी ना या कार्यक्रमाच्यासाठी सहकार्या साठी धन्यवाद या माध्यमातून दिले जात आहे.



## महावितरणची ग्राहकांसाठी व्हॉट्सअॅप सेवा सुरू

**अमरावती-** वीज ग्राहकांच्या सोयीसाठी महावितरण ने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत व्हॉट्स अॅपसेवा सुरू केली आहे. या सेवेमुळे ग्राहकांना आता घरबसल्या वीज बिल पाहणे, भरणा करणे तसेच पावती डाऊनलोड करणे सहज शक्य होणार आहे. ग्राहकांनी हा क्रमांक आपल्या मोबाईल मध्ये Mahavitaran या नावाने सेव्ह करून व्हॉट्सअॅपवर Hi असा मेसेज पाठवायचा आहे. त्यानंतर मिळणाऱ्या मेनूमधून विविध सेवा निवडता येतात. या सेवेत View Bill द्वारे चालू महिन्याचे वीज बिल पाहता येते, Bill Payment पर्यायातून थेट भरणा करता येतो, तर Download Receipt मधून भरलेल्या बिलाची पावतीही सहज मिळते. याशिवाय, महावितरणकडून ग्राहकांसाठी २४७ टोल फ्री सेवा देखील सुरू असून १८००-२३३-३४३५ किंवा १८००-२१२-३४३५ या क्रमांकांवर संपर्क साधता येतो. तक्रारींसाठी १९१२ किंवा १९१२० हे शॉर्ट कोड उपलब्ध आहेत. तसेच ०२२-५०८९७१०० या क्रमांकावर मिस्ड कॉल देऊनही नोंदणीकृत मोबाईलवर वीज बिलाची माहिती मिळू शकते. डिजिटल सुविधांमुळे ग्राहकांना जलद, सोयीस्कर व पारदर्शक सेवा मिळणार असून या उपक्रमाचे स्वागत होत आहे.

# कौंडण्यपूर मार्गावर बसविले गतिरोधक

## नागरिकांच्या मागणीला यश

**कुऱ्हा/वार्ताहर**

आर्वी-अमरावती मुख्य राष्ट्रीय महामार्गावरील वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर स्थानिक नागरिकांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश आले आहे. ५ डिसेंबर २०२५ रोजी सार्वजनिक बांधकाम उपविभाग, तिवसा यांना सादर करण्यात आलेल्या निवेदनाची दखल व घेत श्री क्षेत्र कौंडण्यपूर मार्गावर गतिरोधक बसविण्यास मंजुरी देण्यात आली असून, संबंधित काम पूर्णत्वास नेण्यात आले आहे. या महामार्गावर कंपनीपूर हद्दीत वारंवार होणारे अपघात, तसेच खंडणीपूर बस स्टॉप, अंजनसिंग रोड, प्रस्तावित नवीन बस स्टॉप (मुर्तीजापूर मार्ग), तरोडा चौफुली व मुख्य गावात येणाऱ्या टी-पॉईंट परिसरात वाहतूक वेगाने धावणाऱ्या वाहनांमुळे नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होत होता. विशेषतः या मार्गावरून दररोज मोठ्या संख्येने विद्यार्थी, नागरिक आणि भाविक भक्तांची ये-जा असल्याने सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता. याच पार्श्वभूमीवर नागरिकांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे गतिरोधक बसविण्याची मागणी केली होती. विभागाने या निवेदनाची गांभीर्याने दखल घेत अमरावती-आर्वी मार्गावरील श्री क्षेत्र कौंडण्यपूर येथे सुसाट वाहनांना आळा घालण्यासाठी गतिरोधक उभारण्यास मंजुरी दिली आणि प्रत्यक्षात काम पूर्ण केले. या सकारात्मक निर्णयामुळे परिसरातील अपघातांवर नियंत्रण येण्याची अपेक्षा व्यक्त होत असून, नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, या कामासाठी सहकार्य केल्याबद्दल सार्वजनिक बांधकाम उपविभाग, तिवसा यांचे श्री क्षेत्र कौंडण्यपूर येथील पवन अर्मळ, चंदू ठाकरे, मंगेश गोरडे, पवन नागमाते, अंकुश देऊळकर, पांडुरंगजी सराडे, गणेशराव ब्राह्मणकर, प्रफुल देऊळकर तसेच ग्रामसेवक यांच्यावतीने आभार मानण्यात आले.



# अमरावती विभागात उन्हाळी हंगामाच्या पेरणीचा वेग मंदावला

**अमरावती/का.प्र.**

उन्हाळी मका, मुगाकडे शेतकऱ्यांचा कल. मागील वर्षाच्या तुलनेत यंदा केवळ ६७ टक्केच पेरणी झाली आहे.राज्यात उन्हाळी हंगामाच्या पेरणीने वेग धरला असताना, अमरावती विभागात मात्र चित्र काहीसे संमिश्र दिसत आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा पेरणी क्षेत्रात मोठी घट झाली असून, विभागातील सरासरी पेरणी आतापर्यंत ६८ टक्क्यांवर पोहोचली आहे.

अमरावती विभागात उन्हाळी पिकाचे सरासरी क्षेत्र ६४ हजार ४६७ हेक्टर आहे.आकडेवारीनुसार १८ मार्च २०२६ पर्यंत विभागात एकूण ४३,९३२ हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे. मागील वर्षी याच कालावधीत हा आकडा ६५,३८९ हेक्टर इतका होता. म्हणजेच मागील वर्षाच्या तुलनेत यंदा केवळ ६७ टक्केच पेरणी झाली आहे.विभागात पिकांनुसार विचार केला तर उन्हाळी मका आणि उन्हाळी मुगाकडे शेतकऱ्यांचा कल दिसून येतो. अमरावती विभागात तृणधान्यांची पेरणी १०६ टक्के झाली असून मक्याने सरासरी ओलांडली आहे. एकूण कडधान्यांची पेरणी ५५ टक्के झाली असून प्रामुख्याने मुगाची पेरणी ५ हजार २७८ हेक्टरवर झाली आहे. उन्हाळी भुईमुगाची लागवड १० हजार ९५८ हेक्टरवर (४१ टक्के) झाली आहे. तर सोयाबीनची पेरणी केवळ ६ टक्क्यांवर रेंगाळली आहे.विभागातील ज्वारीचे सरासरी क्षेत्र ७ हजार ९३० हेक्टर इतके आहे. या हंगामात आतापर्यंत ६ हजार ४१ हेक्टर क्षेत्रावर प्रत्यक्ष पेरणी पूर्ण झाली आहे. सरासरी क्षेत्राच्या तुलनेत विभागात तब्बल ७६ टक्के पेरणी झाली आहे. ज्वारी बहुतांशी खरीप हंगामात घेतली जाते. अलीकडे या हंगामातील ज्वारीच्या क्षेत्रात कमालीची घट होऊ लागली आहे.

वातावरणीय बदल आणि पक्ष्यांचा त्रास यामुळे शेतकऱ्यांनी ज्वारी पिकाचे क्षेत्र कमी केले आहे. मात्र ज्वारीला वाढलेली मागणी आणि पशंसात चारा यामुळे शेतकऱ्यांनी रब्बी आणि उन्हाळी हंगामात ज्वारीच पेरणीकडे लक्ष दिले आहे. वाशीममध्ये ८ हजार ७१२ हेक्टर सरासरी क्षेत्रापैकी केवळ २६४ हेक्टरवर प्रत्यक्ष पेरणी झान आहे. यामध्ये एकूण अन्नधान्या पेरणी केवळ ३ टक्के असून तेलबियांनीही ३ टक्क्यांचाच आकडा गाठला आहे. यवतमाळ आणि बुलढाणा जिल्ह्यांनी आप सरासरी राखली असली, तरी अमरावती, अकोला आणि वाशिममध्ये सिंचनाच्या मर्यादांम पेरणी पिछाडीवर असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. येत्या काही दिवसांत ही तूट भरून निघते क उन्हाळी हंगाम यंदा उत्पादनात नोंदवतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



# इस्कॉनतर्फे श्री रामनवमी महामहोत्सव

**अमरावती/का.प्र.**

राठी नगर स्थित सरस्वती कॉलनी येथील श्री रुक्मिणी आध्यात्मिक संस्कार केंद्र (इस्कॉन) अमरावती तर्फे विविध कार्यक्रमांचे वेळोवेळी आयोजन करण्यात येते. या कार्यक्रमांचा उद्देश जनमानसात आणि समाजात अध्यात्मिक ज्ञानाचा प्रचार प्रसार करणे, जीवनातील मूल्यांचे असंतुलन रोखण्यासाठी आणि जगामध्ये खरी एकता आणि शांती प्राप्तीसाठी सर्व लोकांना अध्यात्मिक जीवनात तंत्रशिक्षित करणे, समाजातील सदस्यांना एकत्र करून मानवतेचा विकास करणे, समाजामध्ये संकीर्तन चळवळ शिकवून एकत्रितरित्या कृष्ण नामाचा सामूहिक जप करणे हे होय.

या सर्व उद्देशांना अनुसरून इस्कॉन संस्थापक आचार्य ए. सी. भक्तिवेदांत स्वामी प्रभुपाद यांचे वरिष्ठ शिष्य, इस्कॉन पदयात्रा मिनिस्टर, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाद्वारे जीवन गौरव सन्मानाने पुरस्कृत, विश्वविख्यात कीर्तन सम्राट, त्रीदंड संन्यासी परम पूज्य लोकनाथ स्वामी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्रेरणेने २७ मार्च २०२६ रोजी श्री रामनवमी महामहोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.महाप्रभू सांगतात की, श्रीराम हे ‘धर्माचे साक्षात प्रतीक’ आहेत. त्यांनी आपल्या जीवनातून सत्य, कर्तव्य आणि आदर्श राज्यकारभाराचे दर्शन घडवले.महोत्सवाची सुरुवात २७ मार्च २०२६ रोजी पहाटे ४:३० वाजता श्री रुक्मिणी द्वारकाधीश यांच्या मंगल आरतीने होईल. त्यानंतर ‘हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे, हरे राम हरे राम राम राम हरे हरे’ या महामंत्राचा सामूहिक जप होईल. सकाळी ७:३० वाजता दर्शन आरती आणि त्यानंतर गुरुपूजा संपन्न होईल. सकाळी १०:०० ते १०:३० या वेळेत भक्तवृंदाद्वारे हरिनाम संकीर्तन होईल. त्यानंतर १०:३० ते ११:३० या वेळेत श्रीराम कथा होईल. पुढे ११:३० ते १२:३० दरम्यान श्री श्री सीताराम लक्ष्मण हनुमान यांचा महाअभिषेक संपन्न होईल. दुपारी १२:३० ते १:०० या वेळेत ५६ भोग दर्शन व महाआरती होईल. त्यानंतर दुपारी १:०० वाजता महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता होईल.या संपूर्ण महामहोत्सवाचा लाभ सर्वांनी घ्यावा, असे आवाहन इस्कॉनचे अध्यक्ष श्रीमान अद्वैत आचार्य प्रभुजी यांनी केले आहे.




## शिराळा ग्रामपंचायतमध्ये शहिद दिन



**शिराळा -** येथील ग्रामपंचायत मध्ये शहिद दिन साजरा करण्यात आला. ग्रामपंचायत सदस्य मिंलिद तायडे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी कृउबास संचालक तथा माजी जिल्हा परिषद समाजकल्याण सभापती ग्रामपंचायत सदस्य मिंलिदभाऊ तायडे, मुर्तीकार उत्तमराव धंदर, डॉ अवधूतराव शेंडे, चंदुभाऊ कांबळे ग्रामपंचायत कर्मचारी मधुकरराव खेडकर, योगेंद्र तायडे निखिल गावंडे, प्रविण भागवत दिनेश मुंदाने रविंद्र मोहोड, रुपालीताई कुसटकर, उज्वला मोहोड ग्रामस्थ विनोद घुघुलमाने रामदास चव्हाण आदी उपस्थित होते.

GHARKUL Masale
पाहिजेत
ब्रँडेड अगरबत्ती घरोघरी विक्रीकरिता महिला व पुरुष पाहिजे.
: संपर्क :
घरकुल मसाले फॅक्टरी,
एमआयडीसी. अमरावती

## संक्षिप्त



### विद्यापीठात शहीद दिन साजरा

**अमरावती-**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात २३ मार्च हा दिवस शहीद दिन म्हणून पाळण्यात आला. याप्रसंगी भारतीय स्वातंत्र्य युध्दातील योध्दा तसेच थोर क्रांतीकारक भगतसिंह, राजगुरू व सुखदेव यांचा शहीद दिन विद्यापीठात झाला. याप्रसंगी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक तथा प्रभारी कुलसचिव डॉ. नितीन कोळी यांनी शहीद भगतसिंग, राजगुरू व सुखदेव यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करून विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले.शहीद दिन कार्यक्रमाला आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, कार्यकारी अभियंता शशीकांत रोडे, उपकुलसचिव (आस्थापना) मंगेश वरखेडे, उपकुलसचिव डॉ. दादाराव चव्हाण, उपअभियंता (विद्युत) राजेश एडले, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर तसेच विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी संख्येने उपस्थित होते.



### रावसाहेब इंगोले यांना अभिवादन

**अमरावती-**श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे दिवंगत माजी अध्यक्ष भगवंतराव उपाख्य रावसाहेब मारोतराव इंगोले यांच्या जयंती निमित्त डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख यांचे प्रमुख उपस्थितीत तसेच प्रभारी रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. मेघा नंदनवार, डॉ. क्रिष्णा विल्हेकर, डॉ. सोमेश्वर निर्मळ, डॉ. स्वप्नील मोहोड, डॉ.प्रसाद तोरकडी, डॉ. गौरव दुबे, डॉ. अनिल रोहणकर, डॉ. सुबोध निवाणे, डॉ. अमोल बारब्दे, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत अभिवादन व आदरांजली कार्यक्रम महाविद्यालयाच्या सभागृहात झाला. यावेळी दिवंगत रावसाहेब इंगोले यांच्या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक कृषी व क्रीडा क्षेत्रातील जीवनकार्याला उजाळा देण्यात आला.यावेळी मोठ्या संख्येने प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित राहून त्यांनी अभिवादन व आदरांजली अर्पण केली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता किशोर इंगळे, राहूल लकडे, प्रफुल्ल इंगळे, रवि मानकर, शुभम ठवकर, यश तिवारी यांनी कर्तव्य पार पाडले.



### दहावीनंतरच्या वाटचालीसंदर्भात मार्गदर्शन

**अमरावती-** एडिफाय शाळा अमरावती येथे इयत्ता दहावीनंतरच्या शैक्षणिक वाटचालीसंदर्भात ‘What’s Next After 10th?’ या विषयावर पालक व विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून पवन पांडे उपस्थित होते. त्यांनी दहावीनंतरच्या शैक्षणिक वाटचालीसंदर्भात मार्गदर्शन केले. शाळेचे निदेशक प्राचार्य डॉ. जेकब दास यांनी विद्यार्थ्यांना व पालकांना शालेय शिक्षणाचे महत्त्व, करिअर निवड आणि योग्य निर्णय घेण्याबाबत सखोल मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाला पालक व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.या मार्गदर्शन सत्रातून उपस्थितांना ११-१२ वी साठी शालेय शिक्षणाचे महत्त्व व पुढील शिक्षणासाठी योग्य दिशा मिळाली.कार्यक्रमात वर्ग दहावीच्या शिक्षकांशी पालकांनी संवाद साधला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रिया खरबडे यांनी प्रभावीपणे केले. कार्यक्रमाच्या शेवटी ममता ददलानी यांनी आभार प्रदर्शन करून उपस्थितांचे मनःपूर्वक आभार मानले.



### बस स्थानक परिसराची पाहणी व सर्वेक्षण

**कुऱ्हा-** चांदूर रेल्वे आगारा अंतर्गत कुऱ्हा येथील बसस्थानक येथे हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे बस स्थानक अभियान पाहणी व सर्वेक्षण करण्याकरिता वर्धा विभाग नियंत्रक शंकरराव जगनोर व विभाग वाहतुक अधिक्षक वर्धा यांनी दि. २३ मार्च २०२६ ला सर्व बस स्थानकाच्या परिसरातील पाहणी करून स्वच्छता पाहून समाधान व्यक्त केले. तसेच सर्वेक्षण दरम्यान बसस्थानकाची मागणी करण्यात आली. कारण बसस्थानका एसटी बस जाणे-येणे अतिशय अडचण होतात. याबाबत सुचना करण्यात आल्या.या कार्यक्रमाला चांदुर रेल्वे आगार व्यवस्थापक जयंत झाडे, कुऱ्हा बस स्थानक प्रमुख जयसेन इंगळे, पत्रकार तथा केंद्रीय सचिव अशोक पवार, प्रवासी मित्र पाणपोई चालक अनुप जयस्वाल, विजय सुने, सफाई कामगार चरणदास वानखडे उपस्थित होते.



### आयुक्तालयात शहीदांना अभिवादन

**अमरावती-**शहीद दिनानिमित्त विभागीय आयुक्तालयात आज विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांनी भारताचे स्वातंत्र्य सेनानी शहीद भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरु यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.अपर आयुक्त सुरज वाघमारे, संजय जाधव, उपायुक्त रविंद्र हजारे, संतोष कवडे, राजीव फडके, सहाय्यक आयुक्त वैशाली पाथरे, तहसीलदार प्रज्ञा काकडे यांच्यासह अन्य अधिकारी-कर्मचारी यावेळी उपस्थित होते. उपस्थितांनीही शहीद भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरु यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन आदरांजली वाहिली.

# विदर्भातील वन्यजीवांचे रक्षण करण्यासाठी ठोस पाऊले उचला -आ.संजय खोडके

## महाराष्ट्र वन्यजीव संरक्षण दुरुस्ती विधेयक २०२६ वर चर्चा

**मुंबई/प्रतिनिधीः-** महाराष्ट्राच्या भौगोलिक परिस्थितीचा विचार केल्यास विदर्भात सर्वाधिक वनपरिक्षेत्र असून वन्यजीवांचा मोठा अधिवास आहे. वन्यजीवांच्या अधिवासाचे संरक्षण करण्यासह मानवांना सुद्धा वन्यप्राण्यांपासून धोका पोहोचू नये म्हणून महाराष्ट्र शासनाने पारित केलेल्या वन्यजीव संरक्षक दुरुस्ती विधेयक २०२६ चा उपयोग खऱ्या अर्थाने विदर्भाला होण्यासाठी ठोस पाऊले उचलण्याची सुचना आ.संजय खोडके यांनी विधान परिषदेतून केली आहे.

महाराष्ट्र विधानसभेने वन्यजीव संरक्षण संशोधन विधेयक २०२६ पारित केले आहे. या शासकीय विधेयकावर आज अधिवेशनाच्या अठराव्या दिवशी विधानपरिषदेमध्ये चर्चा होत असतांना आ.संजय खोडके यांनी या विधेयकाला पाठिंबा जाहीर करीत समर्थन दिले. तसेच सदर केंद्र शासनाच्या वन्यजीव संरक्षण कायद्यामध्ये राज्यशासनाच्या वतीने दुरुस्ती करण्यात येत असतांना त्यामध्ये



विदर्भातील वन्यजीव परिक्षेत्राला चांगला उपयोग होण्यासाठी गांभीर्याने लक्ष देण्याची सुचना आ. संजय खोडके यांनी सभागृहासमक्ष केली.

आ.संजय खोडके यांनी विधान परिषदेमध्ये सांगितले कि, भारतीय वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ ,मध्ये दुरूस्ती करण्याचे विधेयक महाराष्ट्र शासनाने आणले आहे. यामध्ये वन्यजीव संरक्षण अधिनियम च्या कलम १२ अंतर्गत ज्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये मुख्य वन्यजीवांचे पर्यायी अधिवास स्थानांतरण करणे, वनजीवन संख्येचे व्यवस्थापन करणे यासाठी हे विधेयक आणले असून या विधेयकामुळे वन्यजीव व मानव या संघर्षाला आळा बसणार असल्याचे सांगून आ.संजय खोडके यांनी राज्यशासनाचे अभिनंदन केले. आमदार संजय खोडके यांनी सभागृहाचे ध्यानाकर्षण करतांना सांगितले कि, नुकतेच काही दिवसांपूर्वी राज्यात वन संरक्षक निधी मधून निधीचे वाटप करण्यात आले. ज्यामध्ये पुण्याला १७ कोटी , कोल्हापूर १४ कोटीचा निधी वितरित करण्यात आला. तर नाशिकला १९ कोटी , ☞(पान २ वर)

# चना खरेदी वरून वाद

## शेतकऱ्यांच्या फसवणुकीवरून प्रहार आक्रमक

### -काही वेळयासाठी प्रक्रिया ठप्प



**धामणगाव/प्रतिनिधीः-** धामणगावमध्ये चना खरेदी प्रक्रियेवरून मोठा वाद उफाळून आल्याचे आज सोमवारी दिसून आले. नाफेड मार्फत सुरू असलेल्या खरेदी प्रक्रियेत शेतकऱ्यांची फसवणूक होत असल्याचा आरोप करत प्रहार पदाधिकारी कार्यकर्ता आक्रमक झाले. त्यामुळे येथे मोठा गोंधळ झाला होता. गोंधळ होताच काही काळासाठी खरेदी विक्री प्रक्रिया ठप्प पडली. धामणगाव परिसरात गुरु गजानन ॲग्रो प्रोडूसर कंपनीच्या वतीने चना खरेदी सुरू आहे मात्र काही शेतकऱ्यांकडून तक्रारी समोर आल्यानंतर वातावरण तापले. प्रहार जनशक्ती पक्षाचे तालुकाप्रमुख सुरज गंधळे यांनी खरेदी केंद्रावर नाफेड चे अधिकारी उपस्थित नसल्याचा आरोप करत शेतकऱ्यांची फसवणुक होत असल्याचे म्हटले. यानंतर पदाधिकारी थेट खरेदी केंद्रावर दाखल झाले आणि कंपनीच्या संचालकांना जाब विचारला. या दरम्यान वाद चिघळत गेला आणि काही काळासाठी खरेदी प्रक्रियेतील काटा बंद ठेवण्यात आला. घटनेची माहिती मिळताच दत्तापूर पोलीस ठाण्याचे निरीक्षक गिरीश ताथोड कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांच्या हस्तक्षेपानंतर परिस्थिती नियंत्रणात आली आणि वाद निवळल्यानंतर खरेदी प्रक्रिया पुन्हा सुरू करण्यात आली. दरम्यान कंपनीचे संचालक कमल टावरी यांनी सर्व आरोप फेटाळून नाफेडच्या. ☞(पान २ वर)

# भारत मुक्ती मोर्चाची जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक



## ओबीसीची जातीनिहाय जनगणना करण्याची मागणी

**अमरावती/प्रतिनिधीः-** ओबीसीची जातनिहाय जनगणना करण्याच्या प्रमुख मागणीसाठी भारत मुक्ती मोर्चाच्या वतीने आज सोमवार २३ मार्च रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर विशाल मोर्चा काढला. केंद्र शासनाने ओबीसी जातीनिहाय जनगणना करण्याचा निर्णय कॅबिनेटमध्ये झालेला असताना जनगणणेचे नोटिफिकेशन मध्ये ओबीसीच्या जातीचा स्वतंत्र कॉलम न देणे ही ओबीसी समाजाशी केंद्र शासनाने केलेली धोखेबाजी आहे.यामध्ये कॉलम वाढविण्यात यावा. २०११ पूर्वी नियुक्त केलेल्या सर्व व्यवस्थापन व माध्यमाच्या शिक्षकांना शिक्षक पात्रता परीक्षेतून वगळण्यात यावे. यासाठी हा मोर्चा काढण्यात आला. भारत मुक्ती मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष वामन मेश्राम यांनी तीन मुद्द्यावर चार चरणबद्ध आंदोलन घोषित केले आहे. त्यानुसार पहिल्या चरणात जिल्हाधिकारी कार्यालयावर निवेदन देण्यात आले. तसेच आज ☞(पान २ वर)

# अडीच वर्षाच्या बालीकेवर सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये यशस्वी कॉक्लियर इम्प्लांट

**अमरावती/प्रतिनिधीः-** विभागीय संदर्भ सेवा (सुपर स्पेशालिटी ) रुग्णालयामध्ये २.५ वर्षांच्या बालिकेवर अत्यंत महत्त्वपूर्ण व आव्हानात्मक कॉक्लियर इम्प्लांट शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली. ही शस्त्रक्रिया सार्वजनिक आरोग्य विभागातील चौथी यशस्वी कॉक्लियर इम्प्लांट सर्जरी ठरली असून, बालिकेला नव्या ऐकू येण्याच्या जगाची दारे खुली झाली आहेत. सदर रुग्ण ही अडीच वर्षांवरील असल्याने



कुठल्याही योजने मध्ये बसत नसल्यामुळे या शस्त्रक्रियेसाठी संपूर्ण निधी ची उपलब्धता अमरावती जिल्हा नियोजन समिती मार्फत केलेली आहे व शस्त्रक्रियेनंतर स्पीच थेरपी मध्ये आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत पुढील एक वर्ष स्पीच थेरपी विनामूल्य करण्यात येणार आहे. महाराष्ट्रामधील पहिली कॉक्लियर इम्प्लांट शस्त्रक्रिया आहे जी आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेमधून शस्त्रक्रियेनंतर स्पीच थेरपी चा लाभ या योजनेतून रुग्णास देण्यात येणार आहे. दोन्ही योजनांच्या माध्यमातून शस्त्रक्रिया व स्पीच थेरपी याचा लाभ विनामूल्य रुग्णास मिळणार आहे.

सदर रुग्ण ही रा. ब्राह्मणवाडा थळी ता. चांदूरबाजार जि. अमरावती येथील रहिवाशी असून जन्मतः ☞(पान २ वर)

# भातकुली येथे दुचाकी चोरांना अटक

**अमरावती/प्रतिनिधीः-** एका लग्न समारंभातून दुचाकी चोरी गेली आणि भातकुली पोलिसांनी अवघ्या तीन तासात आरोपींना गजाआड केले. सुरज उर्फ भोला मुन्नालाल सकवार (वय ३०, रा. नांदेडा, दर्यापुर) व गौरव विठ्ठल ढोणे (वय ३०, रा. म्हैसपुर, भातकुली) अशी आरोपींची नावे असून, त्यांच्या ताब्यातून दुचाकी जप्त करण्यात आली आहे.

२१ मार्च रोजी पराग अशोकराव कडु (वय ३२, रा. अशोक नगर, धामणगाव) माउली मंगल कार्यालयात लग्न समारंभासाठी पोहोचले. त्यांनी



आपली हिरो होंडा पेंशन (एम-एच ३२-एन-१११६) पार्किंगमध्ये ठेवली, पण समारंभ संपल्यावर बाहेर आल्यानंतर दुचाकी गायब होती. घाबरलेल्या पराग यांनी तात्काळ भातकुली पोलीस स्टेशनला धाव घेतली. पोलीसांनी ☞(पान २ वर)

### प्लॉट व्यवसायात नफ्याचे आमिष

# ३८.७० लाखाची फसवणुक

### पिता-पुत्रांविरुद्ध गुन्हा

**अमरावती/प्रतिनिधीः-** राजापेठ पोलीस स्टेशन क्षेत्रात प्लॉट खरेदी-विक्रीच्या व्यवसायात मोठ्या नफ्याचे आमिष देऊन एका व्यक्तीने आणि त्याच्या वडिलांनी ३८ लाख ७० हजार रुपयानी फसवणूक केल्याचा प्रकार २२ मार्च रोजी उघड झाला आहे. अभिजीत विनायकराव गुल्हाने (वय ३२, श्रीहरी विहार, अमरावती) यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीसांनी संतोष रामकृष्ण दहीकर (वय ५६) आणि त्यांचा पुत्र ऋत्विक संतोष दहीकर (वय २१, अकोली



रोड,) यांच्यावर कलमांअंतर्गत गुन्हा नोंदवला.

अभिजीत गुल्हाणे यांच्या तक्रारीनुसार, आरोपी संतोष दहीकर आणि त्यांचा पुत्र ऋत्विक दहीकर यांनी अभिजित यांना प्लॉट खरेदी-विक्रीच्या व्यवसायात पैसा गुंतविल्यास आकर्षक नफा मिळेल ☞(पान २ वर)

# वडाळीत बाळासाहेब ठाकरे स्मारक व शिवाजी महाराज पुतळ्याचे सौंदरीकरण करा

## शिवसेनेची महानगरपालिकेवर धडक

**अमरावती/प्रतिनिधीः-** महानगरपालिका अंतर्गत वडाली गार्डन येथील प्रस्तावित हिंदू हृदय सम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारक व शिव टेकडी मध्ये शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे सौंदर्यीकरण करून परकोटेचे बांधकाम जलद गतीने करण्यात यावे या मागणीसाठी आज सोमवार २३ मार्च रोजी शिवसेनेच्या वतीने महानगरपालिकेवर धडक देण्यात आली.

मनपा आयुक्तांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की,



राष्ट्रीय स्तरीय प्रस्तावित बाळासाहेब ठाकरे पर्यटन उद्यानाचे काम महापालिकेत करणेबाबत ठराव मंजूर करण्यात आला होता, परंतु चार वर्ष होऊन सुद्धा अद्यापही कामाची सुरुवात झाली नाही. तरीही कार्यवाही का थांबली आहे व ती लवकरात लवकर करण्याबाबत योग्य मार्गाने पाठपुरावा करून हे प्रलंबित राहिलेले काम पूर्ण करण्यात यावे. या संदर्भात ☞(पान २ वर)

# लग्नाचे आश्वासन देऊन विवाहितेचे शोषण

**अमरावती/प्रतिनिधीः-** प्रेम, विश्वास आणि आयुष्याची नवी सुरुवात यांचे स्वप्न दाखवत एका विवाहित महिलेची फसवणूक केल्याचा गंभीर प्रकार बडनेरा परिसरात उघडकीस आला आहे. लग्नाचे आमिष देत आरोपीने केवळ तिचे लैंगिक शोषणच केले नाही, तर तिला पतीपासून घटस्फोट घेण्यासही भाग पाडल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. या प्रकरणी बडनेरा पोलीस ठाण्यात आरोपी विवेक पुरुषोत्तम उगले याच्याविरुद्ध गुन्हा दाखल



करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, काही दिवसांपूर्वी पीडित महिला आणि आरोपी यांच्यात ओळख झाली. ही ओळख लवकरच जवळिकीमध्ये बदलली. याचाच फायदा घेत आरोपीने लग्नाचे आश्वासन देत ☞(पान २ वर)

# पत्नीवर केला प्राणघातक हल्ला, प्रकृती गंभीर

## नागपूर गेट अंतर्गत घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** नागपूर गेट पोलीस ठाणे हद्दीत पारिवारिक वादात पत्नीवर पतीने काठीने हल्ला करून गंभीर जखमी केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणात पोलिसांनी जखमी महिला मेहनाज नईमुद्दीन पठाण (वय ३८, गुलिस्ता नगर ) यांच्या तक्रारीवरून पती सह चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. माहितीनुसार जखमी महिला आणि आरोपी यांच्यात पटत नसल्याने दोघे वेगवेगळे राहतात. आरोपी मुलासोबत राहतो तर जखमी महिला आपल्या मुली सोबत राहते. शनिवारी सायंकाळी पिडितेचा पती नईमुद्दीन पठाण मुलीला मोटर सायकलवर घेऊन भावाला भेटण्यासाठी घेऊन गेला होता.या दरम्यान पिडितेने त्यांचा पाठलाग केला. पिडितेला पाहताच आरोपी आणि इतरांनी तिला शिवीगाळ केली. आरोपीने काठीने तिच्या डोक्यावर हल्ला करून तिला जखमी केले. घटनेची माहिती मिळताच पोलीस तिथे पोहचले. पोलिसांनी जखमी मेहनाजला उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले.जिथे तिच्यावर उपचार सुरू आहे. तिची प्रकृती गंभीर आहे. पिडितेच्या बयानाच्या आधारावर पोलिसांनी आरोपी ☞(पान २ वर)

# अत्याचारी भोंदूबाबा खरातविरोधात युवक काँग्रेस आक्रमक, चौकशीची केली मागणी



**अमरावती/प्रतिनिधीः-** नाशिक येथील भोंदूबाबा अशोक खरात याने महिलांवर केलेल्या अत्याचाराच्या गंभीर घटनेच्या निषेधार्थ अमरावती विधानसभा युवक काँग्रेस तर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे जोरदार आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत संताप व्यक्त केला.

घटनेच्या पार्श्वभूमीवर संतप्त झालेल्या कार्यकर्त्यांनी रस्त्यावर उतरून घोषणाबाजी केली व दोषींविरोधात कडक कारवाईची मागणी केली. 'महिलांवरील अत्याचार बंद करा', 'दोषींना अटक करा', 'न्याय मिळेपर्यंत लढा सुरूच राहील' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.

यावेळी आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, राज्यात महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला असून अशा ☞(पान २ वर)

# रूपाली चाकणकर व भोंदूबाबा अशोक खरातवर कठोर कारवाई करा

## महिला काँग्रेस कमिटीचे आंदोलन

**अमरावती/प्रतिनिधीः-** भोंदू बाबा अशोक खरात यांच्या फसवणूक प्रकरणात महिला आयोगाच्या माजी अध्यक्ष रुपाली चाकणकर व इतर नेत्यांवर कठोर कार्यवाही करून त्यांना तात्काळ अटक करण्याच्या मागणीसाठी आज सोमवार २३ मार्च रोजी महिला काँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर जोडे मारो आंदोलन करण्यात आले.

जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, भोंदू बाबा अशोक खरात याच्या फसवणूक व ब्लॅकमेलिंग



प्रकरणात रूपाली चाकणकर यांचा प्रत्यक्ष सहभाग असल्याचे अनेक पुरावे व्हिडिओ ऑडिओ समोर आले आहे. रूपाली चाकणकर यांचे भोंदू बाबा हे गुरु असल्याचेही स्पष्ट झाले आहे. रूपाली चाकणकर यांनी राजीनामा दिला असला तरी केवळ राजीनामा देऊनही ही बाब संपणार नाही. ☞(पान २ वर)

# मनपात शहीद दिनानिमित्त अभिवादन

## अमर शहीद हेमू कलानी जयंती साजरी



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहीद दिनानिमित्त भगतसिंग, सुखदेव व राजगुरु यांना अभिवादन करताना अमरावती महानगरपालिकेत अमर शहीद हेमू कलानी यांची जयंतीही उत्साहात साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाचे आयोजन सोमवार, दि. २३ मार्च,२०२६ रोजी सकाळी ११ वाजता महानगरपालिकेच्या विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात करण्यात आले. यावेळी महापौर श्रीचंद ☞(पान २ वर)

# जिल्ह्यात एल.पी.जी. गॅसचा मुबलक साठा

## तक्रारीसाठी तालुकानिहाय संपर्क क्रमांक जाहीर

**अमरावती/प्रतिनिधीः-** मध्यपूर्व आशिया, अमेरिका व युरोपियन खंडात सध्या सुरू असलेल्या युद्ध परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर अमरावती जिल्ह्यातील इंधन पुरवठ्याबाबत खबरदारीचा उपाय म्हणून जिल्हा प्रशासनाने जिल्ह्यात कार्यरत असलेल्या बीपीसीएल (BPCL), एचपीसीएल (HPCL), व आयओसीएल (IOCL) या तिन्ही कंपन्यांच्या एल.पी.जी. गॅस सिलेंडर वितरकांची बैठक घेऊन आढावा घेतला. जिल्ह्यामध्ये एल.पी.जी. गॅस सिलेंडर साठा पुरेसा उपलब्ध असून नागरिकांना बुकिंगनंतर लवकरात लवकर 'फर्स्ट इन फस्ट आउट' (FIFO) ऑर्डरनुसार सिलेंडर उपलब्ध होईल. तसेच गॅस एजन्सीवर गर्दी होऊ नये, यासाठी टोकन सिस्टीम लागू करावी. तसेच बुकिंगनंतर ८ दिवसांचे आत ग्राहकाला सिलेंडर उपलब्ध होईल, असे नियोजन करण्याबाबत संबंधित यंत्रणेला सूचना करण्यात आल्या आहेत. जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन तसेच ऑईल कंपन्या मिळून जिल्ह्यातील एल.पी.जी. गॅस सिलेंडर साठा पुरेसा उपलब्ध राहील याबाबत कटीबद्ध आहेत. त्यामुळे गॅस एजन्सीवर अनावश्यक गर्दी टाळावी तसेच कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये. जिल्ह्यात पुरेसा साठा उपलब्ध असून त्याचा नियमित व सुरळीत पुरवठा करण्यात येईल. सिलेंडरच्या वितरणात काही अडचणी उद्भवल्यास नागरिकांनी तात्काळ संबंधित तालुकानिहाय ☞(पान २ वर)